# तीर्थरूप महाराष्ट्र



पं. महादेवशास्त्री जोशी

१

# तीर्थरूप महाराष्ट्र

पं. महादेवशास्त्री जोशी

REFBK-0007510

प्रथमावृत्ति
१९५०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6570

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
सौ. सुधा महादेव जोशी,
ज्ञानराज प्रकाशन,
४२१ शनवार पेठ, पुणें २

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

मुद्रक :
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें २

★

माझे कृपावंत सासू-सासरे

ती. श्री. दत्तात्रय घनश्याम फडके

आणि

ती. सौ. जानकीबाई फडके

यांस सादर समर्पण

★

# ज्ञानराज प्रकाशनाकडे मिळणारी ग्रंथसंपदा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | खडकांतले पाझर ( कथासंग्रह ) | ... | २– ८–० |
| २ | ज्ञानेश्वरी-प्रवेशिका | ... | २– ०–० |
| ३ | गोड स्त्रीगीतें | ... | २– ०–० |
| ४ | आदर्श स्त्रीपुरुष ( चरित्रात्मक ) | ... | १– ८–० |
| ५ | धरित्री (गुड् अर्थचा साग्र अनुवाद) | ... | ६– ८–० |
| ६ | वाङ्मयीन वाद | ... | ३– ०–० |
| ७ | सोनचांफ्याचीं फुलें ( कथासंग्रह ) | ... | २– ०–० |
| ८ | उपटसुंभ ( विनोदी नाटिका ) | ... | ०–१२–० |
| ९ | प्राचीन सुरस गोष्टी ( भाग १ ते १० ) | ... | ५– ६–० |
| १० | विराणी ( कथासंग्रह ) | ... | २– ८–० |

**विस्तृत माहितीचें सूचीपत्र मागवा.**

**विनामूल्य पाठवूं.**

४२१ शनवार पेठ, पुणें २

---

# समग्र ' राधारमण '

## कवि कै. कृ. पां. लिमये यांचा काव्यसंग्रह

'—राधारमण हे टिळकयुगाचे प्रतिनिधि म्हणावे लागतील.'

—आचार्य भागवत (प्रस्तावना)

'—राधारमणांच्या कविता वाचून मी कविता करूं लागलों.'

—साने गुरुजी

**पृष्ठें ४६८ ... मूल्य ७ रुपये**

—: प्राप्तिस्थळ :—

चिं. कृ. लिमये, ३/११ अग्रवालनगर, व्हिन्सेंट रस्ता, मुंबई १९;

अथवा ज्ञानराज प्रकाशन, पुणें २.

# चित्रसूची


| पृष्ठ | |
|---|---|
| ३ | चंद्रभागा |
| ८ | पंढरपूरचा विठोबा |
| ११ | विठोबाचें देऊळ |
| १४ | विष्णुपद |
| २४ | अंबाबाईचें देऊळ |
| २८ | अंबाबाई |
| ३६ | अंबरखाना |
| ३७ | जोतिबाचें देऊळ |
| ४२ | कृष्णा नदी व दत्तमंदिर |
| ४९ | औदुंबरचें दत्तमंदिर |
| ५१ | त्रैमूर्ति |
| ५६ | भुवनेश्वरी |
| ६२ | गोदाघाट |
| ६७ | नारो शंकरचें देऊळ |
| ७१ | काळया रामाचें देऊळ |
| ७८ | पांडवलेण्यांतील चैत्य |
| ८८ | त्र्यंबकेश्वराचें देऊळ |
| ९२ | ब्रह्मगिरीचा कडा |
| ९५ | मूळगंगा |
| ९७ | गोदावरीचा उगम |
| १०३ | सज्जनगड-दूरदर्शन |
| १०५ | समर्थांचें राममंदिर |
| १०८ | समर्थांचें समाधिस्थान |
| ११८ | मोरगांवचा गणपति |
| १२० | गणपतीचें देऊळ |
| १२२ | गणेशयोगींद्रांची समाधि |

★

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १ | विटेवरचें परब्रह्म | ... | १ |
| २ | दक्षिण काशी–करवीर | ... | २२ |
| ३ | कृष्णातीरीं नरहरि | ... | ३९ |
| ४ | पंचवटीच्या परिसरांत | ... | ५८ |
| ५ | ब्रह्मगिरीचा महिमा | ... | ८१ |
| ६ | सज्जनगड | ... | १०० |
| ७ | मोरगांवचा मयूरेश्वर | ... | ११५ |


★

# प्रस्थान

महाराष्ट्र म्हटला कीं एक विस्तीर्ण त्रिकोण आपल्या डोळ्यांपुढें उभा राहतो. उत्तरेला तो सातपुड्याच्या पर्वतश्रेणीला जाऊन भिडला आहे. त्याचें दक्षिण टोंक कारवारपर्यंत खालीं गेलें आहे. पूर्वबाजूनें तेलंगण ही त्याची सीमारेषा आहे. आणि पश्चिमेला सह्याद्रीचा घाट उतरून तो थेट अरबी समुद्रांत जाऊन भिजला आहे. 'महाराष्ट्र म्हणिजे महंत राष्ट्र। म्हणौन महाराष्ट्र।' आणि तो आपला महाराष्ट्र!

महाराष्ट्राच्या पाठीशीं सुमारें तीन हजार वर्षांची परंपरा आहे. अगस्त्यापासून महाराष्ट्राच्या कर्त्या पुरुषांची पीठिका सुरू होते. दंडकारण्यांत महाराष्ट्राच्या निर्मितीची मुहूर्तमेढ त्यानें रोवली. शकपूर्व सातव्या शतकापासून या प्रदेशांत आर्यांची रीघ लागली. शकपूर्व तिसऱ्या शतकांत इथें रट्टांचीं छोटीं छोटीं राज्यें निर्माण झालीं. आर्यांपैकींच शेंकडों गोत्रांचे रट्ट म्हणजे शाण्णव कुळींचे मराठे इथें वेगवेगळ्या विभागांवर वर्चस्व गाजवूं लागले. पुढें या छोट्या राष्ट्रांचें मिळून महाराष्ट्र सिद्ध झालें. जें महाकांतार होतें तेंच महाराष्ट्र बनलें. 'ताकापुरतें रामायण' म्हणतात तसा महाराष्ट्रनिर्मितीचा थोडक्यांत कथाभाग असा आहे.

या प्रदीर्घ कालावधींतल्या महाराष्ट्राच्या इतिहासाचें समग्र दर्शन घ्यायचें तर तें 'विश्वरूपदर्शन' च ठरेल. मौर्यांपासून इंग्रजांपर्यंत किती तरी राजवटी इथें 'उत्पद्यन्ते विलीयन्ते' झाल्या. अनेक संघर्ष माजले आणि शमले. कित्येक धर्मपंथ आणि उपासनामार्ग यांचा इथें विकास आणि संकोच झाला. अनेक पुरें-पट्टणें भरभराटलीं आणि पडलीं. नवे देव आले, नवे आदर्श निर्माण झाले आणि नवीं तीर्थेंहि माहात्म्य पावलीं. बऱ्यावाईट दोन्ही प्रकारांनीं महाराष्ट्राचा इतिहास हा अद्भुत इतिहास आहे.

महाराष्ट्राच्या एकेका अंगाचें दर्शन अनेक विद्वान् संशोधकांनीं परिश्रमपूर्वक घेतलें आहे. कोणीं राजकारणाचें, कोणीं इतिहासाचें, कोणीं वाङ्मयाचें, कोणीं संस्कृतीचें, कोणीं विद्या-कलांचें तर कोणीं शिल्प आणि स्थापत्य यांचें. महाराष्ट्राच्या तीर्थक्षेत्रांचींहि प्रवासवर्णनें झालेलीं आहेतच. आणि या ज्ञान-

९३२८३
१०।१।५२

भांडारांतून माझ्या अल्पशा मुठींत मावलें तेवढें द्रव्य घेऊन मीं या तीर्थ-यात्रेचें प्रस्थान ठेवलें आहे.

माणूस ज्या वेळीं एखाद्या प्रांतांत पदार्पण करूं इच्छितो, त्या वेळीं पूर्वी कोणी तरी ती वाट मळवलेली आहे कीं काय तें पहाण्याची त्याला सहजच जिज्ञासा होते. त्याप्रमाणें मींहि महाराष्ट्राच्या स्थलवर्णनाचीं यात्रिकांनीं आणि प्रवाशांनीं लिहिलेलीं कांहीं पुस्तकें वाचलीं. त्या त्या क्षेत्रापुरतीं मर्यादित असलेलीं वर्णनात्मक पुस्तकें मिळण्यासारखीं होतीं तींहि मिळवून नजरेखालीं घातलीं. आणि हें सर्व वाङ्मय वाचून मला असें वाटलें कीं, याहून अगदीं वेगळ्या रीतीनें तीर्थरूप महाराष्ट्राचें माहात्म्य आजच्या पिढीला सांगतां येण्यासारखें आहे आणि सांगणें जरूर आहे. केवळ प्रवासवर्णन हें पल्लवग्राही होतें. केवळ पुराणांतले आधार देऊन त्या त्या क्षेत्रांतल्या प्रत्येक स्थानाचें माहात्म्य प्रतिपादिणें हें उपहासास्पद ठरतें. आणि प्रत्येक गोष्टीचा बारीक सारीक तपशील देण्याची गरज नसते. या सर्व गोष्टींत तारतम्य राखून, लेख वाचून वाचकाला क्षेत्राचें दिव्यत्व आणि पावकत्व प्रतीत व्हावें अशा धोरणानें मीं ही लेखमाला लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

माझ्या डोळ्यांपुढें जो वाचकवर्ग मीं कल्पिला आहे, तो सश्रद्ध तर आहेच; शिवाय रसिक आणि तत्त्वजिज्ञासुहि आहे. त्याच्या मनःप्रसादासाठीं ही माझी साहित्यसाधना आहे. त्यामुळें, क्षेत्रांत असें असें देऊळ आहे, अशी अशी देवप्रतिमा आहे आणि असा असा तिचा परिवार आहे, एवढ्या वर्णनावरच मी थांबलों नाहीं. तर त्या देवतेच्या मागें केवढा इतिहास उभा आहे, त्या दैवतसंप्रदायाचा महाराष्ट्रावर कोणता प्रभाव पडला आहे, तिथलें स्थापत्य आणि शिल्प कोणत्या जातीचें आणि कालांतलें आहे, कोणते दिव्य, भौम उत्पात आणि विधर्मीयांचे अत्याचार त्या त्या क्षेत्राला सोसावे लागले आहेत, त्या त्या तीर्थाविषयीं आणि देवतेविषयीं पुराणकारांची आणि कवींची रसवंती काय बोलली आहे, आणि महाराष्ट्राच्या लोकगीतांतून आणि स्त्रीगीतांतून त्यासंबंधींचे कोणते उल्लेख आढळतात, इत्यादि गोष्टींचें यावच्छक्य निदर्शन प्रवासवर्णनाच्या अनुरोधानें मीं केलें आहे.

तीर्थ आणि देव यांचा आपण समजतों त्याहून फार मोठा, व्यापक अर्थ आहे. केवळ कुंड किंवा जलप्रवाह म्हणजे तीर्थ नव्हे. केवळ मूर्ति म्हणजे

देव नव्हे. पुण्यश्लोक महाभागांनीं जें वसवलें, ऋषिमुनींनीं जिथें तपें आणि व्रतें आचरलीं, संतमहंतांनीं जिथें राहून असंख्य जनांना कर्म-भक्ति-ज्ञान उपदेशिलें, तें क्षेत्र म्हणजेच तीर्थ. तपोनिधि आणि भक्तराज हेच जलांना तीर्थपदवी देतात आणि मूर्तींना देवकळा चढवतात. पितृभक्त पुंडलीक भीमेच्या तीरावर सेवाधर्म आचरीत बसला आणि मग परब्रह्म त्याच्या भेटीस आलें. आधीं अगस्त्यमुनीनें आणि नंतर रामप्रभूनें वास्तव्य केल्यामुळें पंचवटीपरिसराला तीर्थरूपता लाभली. गौतमाची तपोभूमि म्हणूनच ब्रह्मगिरीचा महिमा विस्तारला. श्रीनरसिंहसरस्वती देशोद्धारासाठीं बारा वर्षें राहिले म्हणूनच कृष्णातीराला आगळें महत्त्व आलें. हा सर्व अर्थ लक्षांत घेऊनच कविकुलगुरूनें तीर्थ शब्दाची व्याख्या केली आहे —

"यदध्यासितमर्हद्भिस्तद्धि तीर्थं प्रचक्षते।"

जें पूज्य पुरुषश्रेष्ठांनीं वसवलें तेंच तीर्थ!

आपला महाराष्ट्र सह्याद्रीनें उत्तुंग झाला आहे, सागरानें गंभीर झाला आहे आणि कृष्णा, गोदा, भीमा, तापी या चार सरितांच्या प्रवाहांनीं रसमय झाला आहे. महाराष्ट्रांतलीं बरींचशीं क्षेत्रें या नद्यांच्या परिसरांतच आहेत. या क्षेत्रांचे तीन वर्ग कल्पितां येतात : १ देवताक्षेत्रें, २ अवतारक्षेत्रें आणि ३ संतक्षेत्रें. या पुस्तकांतलीं पंढरपूर, करवीर, त्र्यंबकेश्वर, मोरगांव, हीं देवताक्षेत्रें आहेत. नरसोबाची वाडी, औदुंबर व पंचवटी हीं अवतारक्षेत्रें आहेत आणि सज्जनगड हें संतक्षेत्र आहे. पुढच्या भागासाठीं मनांत योजून ठेवलेलीं आळंदी, देहू, पैठण हीं क्षेत्रेंहि संतक्षेत्रेंच होत. याशिवाय तीर्थांचा आणखी एक चौथा प्रकार कल्पिण्याजोगा आहे. आणि तो म्हणजे महाराष्ट्राचीं धारातीर्थें. जिथें स्वराज्यासाठीं रक्ताच्या नद्या वाहिल्या, जिथें धर्मरक्षणासाठीं आणि स्वामिभक्तीसाठीं रणयज्ञांत पंचप्राणांचीं अवदानें पडलीं, जिथें पुण्यश्लोक-नृपावळींत अग्रगण्य आणि महाराष्ट्राचे उद्धारक छत्रपति शिवाजीमहाराज यांचें दिव्य जन्म-कर्म आणि राज्यारोहण, वगैरे घडलें तीं गड-किल्ल्यांचीं स्थानेंहि महाराष्ट्रजनांना तीर्थरूपच आहेत.

भरतखंडांत महाराष्ट्र प्रांत अनेक दृष्टींनीं वैशिष्ट्यपूर्ण आहे असें म्हटलें तर तो 'प्रांतीयतेचा संकुचित अभिमान' ठरूं नये. तीर्थक्षेत्रांच्या बाबतींतहि महाराष्ट्राला असामान्यत्व आहे. करवीर आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर हीं भारतीय

१३२८७३
२०।१।५२

कीर्तीचीं दोन पुराणक्षेत्रें महाराष्ट्रांत आहेत. शिवशंकराची तर या प्रांतावर विशेषच कृपा. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं पांच ज्योतिर्लिंगें एकट्या महाराष्ट्राच्या वांट्याला आलीं आहेत. अष्टविनायक हे गणपतीचे आठ अवतार तर सर्वस्वीं महाराष्ट्राचेच आहेत. दत्तावताराचें कार्यक्षेत्र तर महाराष्ट्र हेंच. भारतवर्षांत जगदंबेचीं जीं साडेतीन पीठें आहेत त्यांतलें करवीर हें मुख्य पीठ महाराष्ट्रांतच मांडलें आहे. आणि महाराष्ट्राला परम भाग्यानें लाभलेली ज्ञानेश्वरादि संतपरंपरा– या बाबतींत कोणींहि महाराष्ट्राला 'धन्य धन्य' म्हणावें.

महाराष्ट्राचीं तीर्थें म्हटलें तरी सर्व तीर्थांची वंदना मला करतां येणार नाहीं. मीं पंधरा-सोळा प्रमुख आणि प्रातिनिधिक क्षेत्रें पहायचीं आणि लिहायचीं म्हणून निवडलीं आहेत आणि संकल्पितांपैकीं अर्धा भाग या पुस्तकांत पुरा केला आहे. हा भाग आपल्यापरी पूर्ण आहे असें म्हणायला हरकत नाहीं. कारण शिव, विष्णु, देवी आणि गणपति हींच आपलीं प्रमुख दैवतें आहेत आणि त्या सर्वांची 'वाङ्मयी पूजा' या ठिकाणीं झालेली आहे. कृष्णा, गोदा, भीमा या महानद्यांच्याहि यशोलहरी यांत उठलेल्या आहेतच.

आतां नांवाबद्दल दोन शब्द सांगितले पाहिजेत. पुस्तकाला नांव काय द्यावें याविषयीं मी बरेच दिवस बुचकळ्यांत होतों. 'महाराष्ट्राचीं तीर्थक्षेत्रें' 'महाराष्ट्रक्षेत्रवर्णन' अशीं कांहीं तरी नांवें माझ्या जिभेवर घोळत होतीं आणि तीं बोजड किंवा गद्य म्हणून मी त्यांचा आदर करीत नव्हतों. माझे कवि-मित्र श्री. बा. भ. बोरकर यांच्याशीं या विषयाची चर्चा करीत असतांना नामकरणाची ही अडचण मीं त्यांच्यापुढें मांडली. त्यांच्या सहजस्फूर्तींतून 'तीर्थरूप महाराष्ट्र' हीं अक्षरें निघालीं आणि मीं तीं वरच्यावर झेललीं. मला तें नांव एकदम पसंत पडलें. यांत दुहेरी अर्थ आहे आणि ते दोन्ही अर्थ मला अभिप्रेत आहेत. मी जो महाराष्ट्र पहायला निघालों आहें तो तीर्थरूप आहे. वडिलांना 'तीर्थरूप' म्हणतात. पितृस्थान हें एक महान् तीर्थ आहे. त्या दृष्टीनें ज्या महाराष्ट्रांत आपण जन्मलों आणि ज्याच्या मांडीवर खेळलों-वाढलों तो समग्र महाराष्ट्रच आपल्याला तीर्थरूप आहे.

माझे मित्र आणि ख्यातनाम साहित्यकार श्री. य. गो. जोशी यांनीं या लेखमालेला आपल्या 'प्रसाद' मासिकांत स्थान दिलें याबद्दल आणि पुढचे

लेखांकहि त्यांच मासिकांतून लिहिण्याच्या माझ्या संकल्पाला 'मम' म्हटल्याबद्दल मला त्यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. ही लेखमाला चालू असतांना महाराष्ट्राच्या सर्व भागांतून अनेक रसिकांनीं आणि जाणत्यांनीं संपादकांना व मला अभिनंदनपत्रें पाठवून जें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी त्यांचा विशेष ऋणी आहें. 'सावधान श्रोता' हें जसें वक्त्याचें भाग्य तसेंच वाचकांनीं दिलेली भलाई हें लेखकाला 'मधुर पौष्टिक' असतें. राजगुरु छापखान्याचे व्यवस्थापक श्री. श्री. ज. गानू हे आतां माझे प्रकाशनव्यवसायांतले आप्तच झाले आहेत. तेव्हां पुस्तकछपाईच्या सर्व बाबतींत मी 'आप्तवाक्यं प्रमाणम्' म्हणून निश्चित असतों. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरचें चित्र श्री. दलाल आणि आंतलीं रेखाचित्रें श्री. ग. वि. देशपांडे यांचीं आहेत. पुस्तकांच्या प्रसाधनाचें श्रेय सर्वस्वीं त्यांनाच.

झालें तेवढें वाचकांच्या सेवेसी सादर करून आता पुढच्या यात्रेसाठीं प्रस्थान ठेवतों.

विजयादशमी, शके १८७२.
पुणें २.

—लेखक

## चुकीची दुरुस्ती

पृष्ठ ११६ ओळ ७ या ठिकाणीं 'खेड तालुक्यांत' असें छापलें आहे, तिथें 'जुन्नर तालुक्यांत' असें वाचावें.

धा. क्र. ७५९०

# १. विटेवरचें परब्रह्म

मीं पंढरपूरचें प्रस्थान काढलें ते दिवस दिवाळीच्या आधींचे होते. संध्याकाळीं साडेपांच वाजतां आमची गाडी चंद्रभागेच्या पुलावर आली. सोनेरी सूर्यकिरणांत घरें, झाडें, शिखरें अशा संकीर्ण स्वरूपांत मला पंढरीचें दूरदर्शन घडलें. 'पावलों पंढरी वैकुंठभुवन। धन्य आजि दिन सोनियाचा' अशा भावभरी वृत्तींतच मीं स्टेशनवर पाय ठेवला.

राउळाजवळच नारदाश्रमांत आम्हांला रहायला जागा मिळाली हें फार छान झालें. त्यामुळें मनांत येईल तेव्हां तेव्हां दर्शनाचा लाहो घेणें शक्य होतें. चंद्रभागेचें स्नान करायचें, पुंडलिकाचें दर्शन करायचें आणि मग पांडुरंगाची भेट घ्यायची असा तिथला रिवाज. पण मी तिथें पोंचलों ती कातरवेळ असल्यामुळें स्नानाला अनुकूल नव्हती आणि सकाळपर्यंत मला दम निघण्यासारखा नव्हता. तेव्हां 'यः स्मरेत्पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यन्तरः शुचिः' हा सोयीचा मध्यम मार्ग मीं पत्करला आणि उत्तरद्वारानें मंदिरांत शिरलों. विठ्ठलाच्या समचरणांवर मस्तक ठेवून तिथून मस्तकींच्या सुवर्णमुकुटापर्यंत दृष्टि वर नेतों न नेतों तोंच वेत्रधारी डांग्यानें मला गाभाऱ्याच्या बाहेर येण्याचा इशारा दिला. कारण आतां धूपारतीचा समय झाला होता. बडवे, पुजारी, बेणारी, वगैरे हक्कदार सेवेकरी उपचारसामग्रीसह आंत येऊं लागले होते.

मी कमानीच्याबाहेर 'चौखांबी' मंडपांत येऊन सम्मुख उभा राहिलों. हां हां म्हणतां माझ्याभोंवतीं पुरुषांची मंडपघसणी झाली. त्याच्यामागचा 'सोळखांबी' मंडप स्त्रियांनीं भरून टाकला. माणसांनीं आंत यावें तें मुळीं 'वासुदे ऽऽ व हरी ऽऽ!' अशी हांक देतच.

प्रथम पुजाऱ्यानें देवाचें चरणप्रक्षालन केलें. नंतर कपाळीं आडवा चंदनलेप दिला. देवाच्या गळ्यांत घवघवीत माळा घातल्या. आधीं धूप अन् मग दीप ओवाळले. त्या पंचारतींच्या प्रकाशांत विठ्ठलाचें 'श्रीमुख' झळाळून दिसत होतें. समाधि – उन्मनी क्षणभर स्पर्श करून जात होत्या. ज्यांना एका क्षणाचाच उशीर झाला होता ते आतां उभय बाजूंच्या खांबांवर चढून आणि वरचा देह झुकवून मोठ्या सायासानें दर्शनाची धणी पुरवून घेत होते. त्या सोळखांबींत जणुं तात्पुरत्या सचेतन कमानीच उभारल्या गेल्या होत्या. नैवेद्य-समर्पणाच्या वेळीं देवापुढें पडदा सोडण्यांत आला तशी मायभगिनींच्या कोमल कंठांतून देवाची मनधरणी सुरू झाली —

**"सख्या हरी रे तूं। जेविं बा सगुणा —"**

सकाळीं उठून चंद्रभागेवर स्नानाला गेलों. वस्तुतः तिचें नांव 'भीमा' आहे. पण या ठिकाणीं तिला चंद्रकोरेसारखा बांक मिळाल्या-मुळें ती चंद्रभागा झाली. भीमाशंकराच्या डोंगरावरून उगम पावलेली ही सरिता महाराष्ट्रांतली एक सामान्य नदीच म्हणावी लागेल. तिची लांबी दोनशें मैलांहून अधिक नाहीं. रायचूरजवळ ती कृष्णेला आत्मार्पण करून नाम–रूपांतून मुक्त होते. पण तिच्या कांठीं पुंडलीक हा भक्तराज जन्मला आणि मागाहून त्याला वर देण्यासाठीं आलेल्या श्रीविठ्ठलाला त्यानें 'युगें अठ्ठावीस' विटेवर उभें केलें, या अलौकिक घटनेमुळें ती 'देवागळी' ठरली आहे. प्रतिवर्षीं लक्षावधि मानवदेह अन् तेवढ्याच भगव्या पताका तिच्यांत बुडून वर निघतात. संतांच्या अंतरांत आणि वाङ्मयांतहि तिला फार मोठें स्थान मिळालें आहे.

भीमा ही त्रिपुरविजयी शंकराची स्वेदधारा आहे, त्यावरून पंढर-पुरांत तिला अकरा घाट असणें हें रुद्रसंख्येला धरूनच आहे. पण या घाटांचा आणि तिच्या प्रवाहांचा आतां बादरायणसंबंधच उरला आहे. पात्र असें दूर गेल्यामुळें वाळवंट आपोआपच विस्तृत झालें आहे. पंढरपूरच्या निरुंद बोळांच्या चक्रव्यूहांत घुसमटलेला जीव चंद्रभागेवर येतांच मोकळा मोकळा होतो. कार्तिकवारीची

निम्मी-पाऊण यात्रा या वाळवंटांतच उतरते. निरनिराळ्या फडांवर भजनाचे मृदंग धिमधिमूं लागले कीं ' विठोबाची वेडीं ' भावोन्मत्त



होऊन नाचतात, रंगतात तीं इथेंच. इथें कोणाला लाज, भीड नसते. इथें कोणी ' उंच-निंच ' नसतो. इथें कोणी राव-रंक नसतो. सगळे एकाच देवाचे उपासक. सगळेच आप्त-स्वजन.

भजनांत निरूपण अन् निरूपणांत भजन अशा दोन भक्तिसाधनांची इथें खेळीमेळी चालते. ' कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामांचे निखिळ प्रबंध । माजी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ ' संतांच्या मुखांतून हरिकथेची 'ऊर्ध्ववाहिनी' गंगा धो धो वाहूं लागली कीं भिवरा आपला निर्घोष बंद ठेवून तिचा आदर करते. उत्तरेस जें महत्त्व कुरुक्षेत्राला तेंच दक्षिणेस या वाळवंटाला. तिथें अद्वैतामृतवर्षिणी भगवद्गीता प्रगटली तर इथें भागवतधर्माची ध्वजा फडकली. दुसऱ्या दृष्टीनें पहायचें तर कुरुक्षेत्राची भूमि अखेर रक्तानें न्हाली; पण इथलें वाळवंट मात्र भाविकांच्या प्रेमाश्रूंनींच भिजत राहिलें आहे. तिथें अगणित मानवांचा संहार झाला; पण इथें काम-क्रोध या मानवजातीच्या अंतःशत्रूंनाहि कोणीं कंठस्नान घातलें

नाहीं. त्यांना अलगद उचलून विठ्ठलाच्या पायांवर वाहिलें गेलें. ‘ कामक्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं ’ ही इथली अहिंसक युद्धपद्धति.

इथें नामदेव-तुकोबांनीं अभंगांचे गोड घांस पांडुरंगाला भरवले आहेत.

> “ श्रीनामदेव तुकया, तदभंग प्रभुसि गोड घांस तसे ।
> गहिंवरतसे परिसतां, नाचतसे पांडुरंग हांसतसे ॥ ”

इथें ज्ञानियांच्या राजाचीं रातोत्पलासारखीं पाउलें उमटलीं आहेत. इथेंच गोरोबाकाकांची ब्रह्मानंदीं टाळी लागली आहे. चोखोबानें भक्त-भागवतांना इथेंच नम्रपणें जाणवलें आहे कीं—

> “ चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा ।
> काय भुललासी वरलिया रंगा ॥ ”

ज्याला आपलें चित्त शुद्ध व्हावें असें वाटत असेल त्यानें या वाळ-वंटांत लोळावें, घोळावें. ‘ साधुसंतांच्या दाटणी । तुका जाय लोटांगणीं. ’

चंद्रभागेचें स्नान झाल्यावर पुंडलिकाच्या दर्शनासाठीं फार लांब जायला नको. ज्याचें शिखर सर्वांत उंच तें पुंडलिकाचें मंदिर. त्याच्या मातापित्यांचीं समाधिमंदिरेंहि तिथेंच जवळ आहेत. एका शिवलिंगाला घातलेल्या मुखवट्याच्या रूपानें पुंडलीक तिथें दिसतो. शंकराचे पुजारी जसे गुरव, तसे या पुंडलिकाचे कोळी. प्रथम बाइलवेडा बनून आई-बापांना छळणारा, यात्रेला जात असतां त्यांना अनवाणी चालवून बायकोची नि आपली घोड्यावरून वरात काढणारा, कुक्कुटमुनीच्या आश्रमांत गंगा-यमुना-सरस्वतींच्या उपदेशानें पश्चात्ताप पावणारा आणि अंतीं मायबापांच्या सेवेचें खडतर तप आचरून वर देण्यासाठीं आलेल्या देवाला विटेवर तिष्ठत ठेवणारा हा पुंडलीक, शके अकराशेंच्या सुमा-रास झाला असावा असें इतिहासकार सांगतात. त्याचें प्रथम देऊळ बांधलें तें चांगदेवानें. त्याच्या दर्शनाच्या आधीं देवाचें दर्शन वर्ज्य. देव म्हणतो, ‘आधीं माझ्या भक्ताच्या पायां पडा. मी तुमचा देव असलों तरी तो माझा देव आहे. ’ आर्य-संस्कृतीचा एक फार मोठा गुण यांत

दिसून येतो. ज्यानें क्षेत्र वसविलें, ज्यानें तीर्थ निर्मिलें, त्याचें दर्शन आधीं करणें ही एक प्रकारची कृतज्ञता आहे. असले हे संकेत परंपरेशीं आपला संबंध निगडित ठेवतात.

सगळ्या संतांनीं पुंडलिकाला गायलें आहे. तुकोबा तर वरपांगीं देवाला खुष करण्यासाठीं पण आंतून पुंडलिकाला गौरवण्यासाठीं त्याला म्हणतात—

" कां रे पुंड्या मातलासी
उभें केलें विठ्ठलासी।"

संत पंढरीला माहेर म्हणतात. विठोबा–रखुमाई हे बाप–माय, पुंडलीक हा भाऊ आणि 'भिमाई' ही बहीण अशीं हीं माहेरचीं नातीं आहेत.

राउळांत प्रवेश करतांना महाद्वाराच्या पहिल्या पायरीवर पाय पडूं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. कारण ती 'नामदेवाची पायरी' आहे. जातां येतां संतांची चरणधूलि आपल्या अंगावर पडावी म्हणून नामदेवानें तिथें जागा मागितली. 'पाषाण करी तरी पायरीच्या मिषें। तुझ्या द्वारीं वसें ऐसें करीं' हें त्याचें आर्त देवानें पुरविलें. ती पायरी पितळी पत्र्यानें मढविलेली असून नामदेवाचा पितळी मुखवटा तिच्या उजव्या अंगाला ठेवलेला असतो. लोक त्या पायरीला पदस्पर्श न करतां हस्तस्पर्श करतात, तोच हात निढळाला लावतात आणि मंडूक-प्लुतीनें दुसरी पायरी गांठतात.

देवद्वारीं समाधि घेणारा नामदेव कांहीं एकटाच नाहीं. चोखोबाच्या 'विठ्ठल विठ्ठल' नाद घुमवणाऱ्या अस्थिहि तिथेंच मंदिरासमोर विसावल्या आहेत. एका चौकोनी उथळ कुंडांत एक उभा दगड आणि त्यावर एक ठेंगणेंसें छत्र या स्वरूपांत 'जोहार मायबाप जोहार' म्हणणारा सर्वांभूतीं नम्र असा चोखोबा आपल्या भावचक्षूंना दिसतो.

महाद्वाराच्या पायऱ्या चढत असतांना तीनशें पन्नास फूट लांब आणि एकशें सत्तर फूट रुंद अशा एका विस्तीर्ण, विशाल मंदिरांत आपला आतां प्रवेश होणार याची मुळींच कल्पना येत नाहीं. पायऱ्या

संपल्या कीं आपण मुक्तिमंडपांत उभे राहतों. लगेच तिथें डाव्या बाजूच्या कोनाड्यांतून गणपति आपल्याला दर्शन देतो. तिथून चार पायऱ्या खालीं उतरल्यावर लांकडी सभामंडपांत प्रवेश होतो. 'गरुड हनुमंत पुढें उभे रहाती' ते इथेंच. श्रीहरीचें वाहन गरुड. त्यामुळें वस्तुतः देवाच्या अग्रभागीं उभें राहण्याचा मान त्याचा. पण इथें त्यानें हनुमंताला आपल्यापुढें जागा दिली आहे. कारण हनुमंत इथें पाहुणा असल्यामुळें गरुडाला अतिथिधर्माला जागणें भाग पडलें. अभ्यागताची सोय आधीं पाहायची.

देवासाठीं महानैवेद्य जिथें सिद्ध होतो ती पाकशाळा इथून उजव्या बाजूला दिसते. डाव्या हाताला माळी, माळिणी हारीनें बसून फुलांचे हार गुंफीत असतात. गरुडाच्या उजव्या हाताला आणखी एक मारुति आहे. तो 'भीमरूपी महारुद्र' भासतो. समर्थ रामदासांनीं त्याची स्थापना केल्याचें सांगतात.

रामदास एकदां पंढरीस आले होते. 'अनेकीं सदा एक देवासि पाहे' या त्यांच्याच उक्तीप्रमाणें ते सर्वत्र 'राम' पाहत होते. त्यामुळें विठ्ठलदर्शन होतांच 'वासुदेव हरी'च्या ऐवजीं 'जय जय रघुवीर समर्थ!' हाच जयघोष त्यांच्या वैखरींतून उमटला. तो ऐकतांच बडवे खवळले. त्यांच्या दृष्टीनें हा अपराध अक्षम्य होता. त्यांनीं समर्थांना रागानें घेरलें, त्या वेळीं नयनांत प्रेमाश्रु आणून सद्गदित कंठानें ते देवाला आळवते झाले.

"येथें कां रे उभा रामा?
मनमोहन मेघश्यामा"

"प्रभुराया, इथें पंढरींत आलास, तो अयोध्या नगरी काय केलीस? तुझ्या वामांकीं सीतामाई कां बरं दिसत नाहीं? धनुष्य-बाण टाकून देवा, इथें 'कटेवर हात' कां बरं घेतलेस?......"

आणि काय सांगावें! सगळा देखावा एकदम बदलला. विठोबा रामरूप नटला. त्या गर्भागारांत अयोध्येचा दरबार थाटला. समर्थ

देवाला अन् वडवे समर्थांना लोटांगणीं गेले. वर सांगितलेल्या मारुतीची स्थापना याच वेळीं झाली असावी.

या सभामंडपाची फरशी सगळीकडे ओरखडे उठल्यासारखी दिसते. काय आहे म्हणून पहायला जावें तों कांहीं नांवें वाचायला मिळतात. कोणाचीं हीं नांवें? देणगी देणारांचीं का संत-महंतांची? छेः! तुमच्या-आमच्यासारख्या भाविकांचीं. देवदर्शनासाठीं येणाऱ्या भक्तजनांच्या पायदळीं पडून आपलें नांव पुनीत व्हावें, आपल्याला मोक्षाचा अधिकार लाभावा अशा हेतूनें तीं कोरलेलीं आहेत. मीं म्हटलें, अहंकाराचें फणामर्दन व्हायला किती सुंदर उपाय आहे हा!

इथून वर जातांना जयविजय ओट्यावर डाव्या हाताला एक अडीच फुटी घंटा टांगलेली दिसते. 'कुरु घंटे रवं तत्र' म्हणून पुढें व्हावें, तर लोळीच आहे कुठें तिला! लोळीवांचून घंटा म्हणजे प्राणावांचून कुडी. अर्थात् तिच्याकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. त्या पितळी दरवाजांतून आंत गेलें कीं सोळखांबींत प्रवेश मिळतो. इथल्या डाव्या हाताच्या दुसऱ्या खांबाचें नांव 'गरुडखांब' असें आहे. हा सोन्या-रुप्यानें मढलेला आहे. याला आधीं कवटाळायचें, मग त्याच्या शेजारच्या वाटोळ्या रंगशिळेवर दोन्ही कान धरून प्रदक्षिणित गिरकी घ्यायची आणि मग रुप्याचा दरवाजा ओलांडून चौखांबींत पाऊल टाकायचें. आंत शिरतांच उजव्या हाताला नजर वळली तर भिंतीच्या मोठ्या फडताळांत विठोबाचें शेजघर दिसेल. रुप्याचा पलंग अन् त्यावर गाद्यागिरद्या असा त्याचा थाट आहे. चौखांबीच्या पुढची चौरस जागा ती कमान. तिच्यांतून सरळ गर्भागारांत प्रवेश करायचा. आधीं नामस्मरण, मग चित्तशुद्धि, नंतर ज्ञान आणि ज्ञानानें आत्म-साक्षात्कार, अशा साधन-मार्गाप्रमाणेंच हा विठ्ठलदर्शनाचा प्रवास आहे.

गर्भागारांत पुढेंच एक तुळईसारखी पितळी पत्र्याची दांडी आहे. तिच्यामागें दगडी चौथरा. वर रुपेरी चवरडोल. आणि त्याच्या आंत 'विटेवरि उभा कटेवरि हात' अशी एक कृष्णपाषाणाची मूर्ति. काळा असून 'पांडुरंग' तो हाच. प्रेमळ, भोळे, भावुक यांचा

कैवल्यदानी श्रीविठ्ठल तो हाच. ज्ञानेश्वरांचा 'बाप रखुमादेवीवरु' तोहि हाच. तुकोबांनीं अंतरीं उल्हासून 'स्तोत्र' केलें तें याचेंच.



"देवा, माउलीहून तूं मायाळ. चंद्राहून शीतळ. पाण्याहून पातळ. अमृत तूंच निर्माण केलंस; पण त्याहून तूं गोड गोड आहेस. तुला कशाची उपमा देऊं? तुझ्यापुढें वाचाळपणा नको. तुला निवांत नमन करून चरणीं माथा ठेवावा हेंच बरें!"

विठ्ठलमंदिर म्हटलें कीं त्याच्या दोन्ही बाजूंना राही-रुक्मिणी दिसायच्या. निदान एकटी रखुमाई तरी. यावरून पंढरपुरांतही तसेंच असेल अशी कोणी कल्पना केल्यास ती साफ चुकेल. इथें देव एकटा आहे. रुक्मिणी आहे, पण ती त्याच्यामागें वायव्य कोपऱ्यांत. तिथें तिला स्वतंत्र मंदिर आहे. रुक्मिणी यादवराण्यावर रुसून या दिंडीर वनांत येऊन बसली. प्रिय पट्टराणीचा रुसवा; त्यामुळें देवाला 'करमेना

घडी ' असें झालें. देव तिला शोधीत शोधीत इथवर आला. वाटेंत दिसला भक्त पुंडलीक. ' भक्तकाजकल्पद्रुम ' ही बिरुदावलि मिरवणाऱ्या देवानें त्याला वरप्रसाद दिल्यावांचून पुढें कसें जायचें ! ' पितृसेवेसी अत्यंत रत ' असलेल्या पुंडलिकानें त्याला आसन म्हणून फेंकली जवळची वीट. ती रुक्मिणीच्या शेजारीं पडायची ती जरा अलीकडे पडली. आणि देवाला तिच्यावर युगानुयुगें तिष्ठत रहाणें भाग पडलें. ' पुंड्या ' त्याला विटेवरून उतरीत नाहीं आणि रुक्मिणी आपला रुसवा सोडून जरा अलीकडे सरकत नाहीं. त्यामुळें दोघेंही ' यथास्थित ' च राहिलीं.

रुक्मिणीसमोर दीपमाळ आहे. कथा-कीर्तनें प्रशस्तपणें चालतील असा सभामंडपहि आहे. देवाचे बडवे तसे तिचे ' उत्पात ' स्वतंत्रपणें तिचे सर्व उपचार चालवतात. रुक्मिणीच्या सभामंडपाच्या पायऱ्या चढून वर आलें म्हणजे एक ओटा लागतो. तिथून सोळखांबींत प्रवेश करतांना समोरच्या भिंतींत एक शिलालेख आहे त्याला ' चौऱ्यायशींचा लेख ' म्हणतात. देवस्थानाला देणग्या देणाऱ्या चौऱ्यायशीं दात्यांचा त्यावर नामनिर्देश आहे. वस्तुतः इतिहासाच्या भोक्त्यानें जिज्ञासा धरून पहाण्याचा तो विषय. पण आज यात्रेकरूंकडून आणखी एक पैसा मिळविण्याचें तें साधन बनलें आहे. नुसत्या लेखाला कोण विचारणार ; म्हणून त्यावर देवीची मूर्ति बसविली, चौऱ्यांयशींचे चौऱ्यांयशीं लक्ष केले आणि बडवे येत्या जात्याला सांगत सुटले, ' या दगडाला पाठ घासा ; म्हणजे तुमचा चौऱ्यायशीं लक्ष योनींचा फेरा चुकेल.' श्रद्धाळू माणसाच्या मनांत चौऱ्यायशींच्या फेऱ्यांचें जें एक सूक्ष्म भय असतें, त्याचाच नेमका फायदा त्यांनीं घेतला आहे. राकट तशाच नाजूक पाठी सतत घांसल्या जाऊन आजामितीस त्या शिलालेखाचा वरचा अर्धा भाग ' स्वच्छ ' होत आला आहे. इतिहासाची याहून जीवघेणी थट्टा दुसरी कोणती असूं शकेल !

सोळखांबीच्या दक्षिण दरवाजाला ' तरटी दरवाजा ' म्हणतात त्याचें कारण तिथलें तरटीचें झाड. त्या झाडाच्या मुळाशीं एक करुण-

गंभीर असा इतिहास आहे. आधुनिक 'पिंगला' कान्होपात्रा सौंदर्य-लंपट यवन बादशहाचें धरणें आलेलें पाहून मंगळवेढयाहून धांवत धांवत इथें आली आणि तिनें देवाला दंडप्रणाम करून पंचप्राणांचें बिरडें मोकळें केलें. पांडुरंगानें तिला आपल्या मांडींत कायमचा आश्रय दिला आणि त्याच वेळीं हें झाड उगवलें अशी आख्यायिका सांगतात. यात्रेकरू त्याच्या फांद्यांना माळा घालतात आणि त्याचीं पानें प्रसाद म्हणून नेतात. त्याच्याच खालीं कान्होपात्रेची मूर्ति बसविलेली आहे.


पांडुरंगाचा हा प्राकार अशा अनेक घटनांचें आणि पौराणिक कथांचें स्मरण घडवतो. व्यंकटेशाचें दर्शन घडलें कीं त्याचें माहात्म्य आठवतें. राहीला पाहिलें कीं कृष्णप्रेमाला पात्र झालेल्या त्या रमणीवर मराठी शाहिरांनीं चढवलेले ते कवनांचे 'शिणगार' स्मरतात. सत्यभामेला पाहून तिच्या हट्टानें भूतलावर आणलेल्या पारिजातकाची आठवण अपरिहार्य होते. अन्नपूर्णेपुढें माथा नमवतांना वाराणसींत सर्वांना जेवूं घालून मगच मुखीं ग्रास घेणारी ती विश्वजननी साक्षात् पुढें उभी आहे. अशी भावना होते. पितळी कुत्र्यावर आरूढ झालेली ती काळभैरवाची मूर्ति पाहतांच हा विश्वेश्वराचा कोतवाल पंढरीस कोणत्या काजासाठीं आला असावा, अशी पृच्छा उत्पन्न होते.

महाद्वारावरच्या एका लेखावरून तें रखमाजी अनंत पिंगळे यानें शके १५४० त बांधल्याचें कळून येतें. 'सोळखांबी' सुमारें दीडशें वर्षांपूर्वी दौंडकर नांवाच्या कोण्या श्रीमंत भक्तानें बांधल्याचें सांगतात. देवळाचें शिखर भोरच्या संस्थानिकांनीं शके १७५२ त बांधलें अशी माहिती मिळते. रुक्मिणीचा सभामंडप निजामाचा दिवाण श्री. चंदुलाल यांच्या देणगीनें उभारला गेला आहे.

अशी ही मंदिरप्रदक्षिणा झाल्यावर उरते ती नगरप्रदक्षिणा. ती केल्याशिवाय अन्य देवतांचें दर्शन कसें व्हायचें आणि क्षेत्राचें विशालत्व तरी कसें कळायचें ? कासारघाटावरचें नामदेवमंदिर प्रशस्त, स्वच्छ आणि रम्य आहे. थोडा वेळ तिथें विसांवल्यावांचून पाऊल पुढें पडत नाहीं. नामदेवाच्या पूर्वील निवासस्थानावरच तें उभारलें आहे.

११२७१
१०।११५।

नामदेव हें त्या काळीं पंढरीचें भूषण होतें. त्यानें जरी देवाच्या पायाशीं 'मुकुंड' घातली असली तरी देवाजवळ तो आपला बोज राखून होता.



स्वतः कीर्तन करावें आणि देवाला पुढें नाचवावें असा त्याचा अधिकार होता. आपल्या या अधिकाराची त्याला जाणीवहि होती. 'आम्ही भक्त तरी तूं भक्तवत्सल' म्हणून तो देवाला बजावीत असलेला दिसतो. 'वेदशास्त्र पुराणांनीं उबगून तुला सांडलें आणि अशा तुला आम्ही हृदयकमळीं धरलें' ही जाणीव तो आपल्या 'केशिराजा'ला द्यायला कमी करीत नाहीं. देवानें त्याला आपल्या 'माथां मुकुट' केलं होतें. तो निजांगें नामदेवाचीं सांकडीं निवारीत होता. देवाचा आणि त्याचा साक्षात् संवाद चाले. नामदेवाची अनन्यशरणता कनिष्ठिकेवर मोजली तर 'अनामिका सार्थवती बभूव' असें पुनः एकदां म्हणावें लागेल.

दत्तघाटावर विप्रांच्या मठांत शाळिग्रामशिळेची जी दत्तमूर्ति आहे तिचें वैशिष्ट्य हें कीं, सहा हात ; पण शिर एकच. पंढरपुरांत इतकी

नयनाभिराम मूर्ति दुसरी नाहीं. उत्तरेस वाळवंटाच्या कडेला लखुबाई बसली आहे. लखुबाई म्हणजेच रुक्मिणी. 'रलयोरभेदः।' तिचें लहानसेंच हेमाडपंती देऊळ आहे. सभोंवतीं चिंचाचें वन असल्यामुळें जनांत असूनहि ती विजनवासिनी वाटते. गाभाऱ्यांत तिची चतुर्भुज मूर्ति आहे. इथें तांबडा आणि काळा असे दोन मारुति आहेत आणि त्यांत काळ्या मारुतीची प्रतिष्ठा अधिक आहे. एकनाथमहाराजांचे पणजोबा भानुदास विजयानगरच्या कोण्या राजानें तिकडे नेलेल्या विठ्ठलास परत आणण्यासाठीं निघाले तेव्हां स्वीकृत कार्यांत यश मिळण्यासाठीं त्यांनीं हा मारुति स्थापल्याचें सांगतात. त्यामुळें वारकरी मंडळीला हा मारुति प्रिय आहे. दिंडी निघाली असतां याच्या द्वारीं दोन अभंग म्हटल्याशिवाय ते पुढें जात नाहींत. याच्या जवळ रावणाच्या जंबुमाळ्याची मूर्ति आहे. याला शेंदूर माखीत नाहींत म्हणूनच तो काळा राहिला आहे. श्री. खाजगीवाल्यांच्या वाड्यांत राही, रखुमाई आणि विठ्ठल अशा तीन सुवर्णमूर्ति आहेत. आषाढी-कार्तिकीला रथांतून मिरवणूक निघते ती याच मूर्तींची.

पंढरपुरात संतमहंतांचे मठहि थोडेथोडके नाहींत. पूज्य साने गुरुजींनीं अस्पृश्यांना मंदिरप्रवेश मिळावा म्हणून जें प्राणपणाचें उपोषण मांडलें तें स्टेशनाजवळच्या तनपुरेमहाराजांच्या मठांत. या मठांतून भजनें, प्रवचनें, वगैरे कार्यक्रम चालतात.


आतां मुख्य राहिलें तें विष्णुपद आणि त्याच्याजवळचें गोपाळपूर. विष्णुपदाचा सोळखांबी दगडी मंडप चंद्रभागेच्या पात्रांतच आहे. पुंडलिकाच्या देवळापासून त्याचें अंतर मैलाच्या आंतच भरेल. वाटल्यास वरच्या रस्त्यानें जावें अथवा जलमार्ग स्वीकारावा. यात्रेकरू बहुधा दुसराच पसंत करतात. तेवढीच जलप्रवासाची गंमत. पुंडलिकाजवळ त्यासाठीं किती तरी नावा असतात. तुम्ही वाळवंटांत पाय ठेवलात कीं एखादा गुहकाचा वंशज पुढें येऊन 'चलायचं का गोपाळपूरला' म्हणून तुमचा पिच्छा पुरवतोच. पुंडलीक हें या नाविकांचें दैवत, चंद्रभागा हें जीवन आणि होडी हें साधन.

नावाड्याशीं 'बोलीभास' करून आम्ही चार-पांच सहयात्रिकांनीं होडींत पाय ठेवला, त्या वेळीं सायंकाळचे पांच वाजले होते. पाठोपाठ एक वडवे गृहस्थ आपल्याकडच्या कांहीं यात्रेकरिणींना घेऊन होडींत चढले. त्या चौघी तामिळ ललनांच्या सहास्य कंकणध्वनीनें आमची नाव मुखर झाली. होडी अर्ध्या वाटेवर पोंचली नसेल तोंच सदर वडवे तीराकडे पहात एकदम उद्गारले, 'अरे तें बघ कासव. त्या कडेच्या आडव्या खोडावर बसलं आहे. आपण त्याला पकडूं चल. मला तें हौदांत सोडायचं आहे.'

आणि एखाद्या नखरेल कंचनीप्रमाणें आमच्या होडीनें गिरकी घेतली. ती उलट वर जाऊं लागली. त्या कासवाला मराठी येत होतें आणि या माणसांचा कावाहि उमगला होता. होडी कांठाला घसटली अन् वडवे आतां पंजा टाकणार तोंच 'डुबुक' झालें आणि कासवाच्याऐवजीं त्याचा 'अभाव' तेवढाच त्या खोडावर उरला. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' अशा आविर्भावानें त्यांनीं एकमेकांकडे पाहिलें. कासव सांपडलें अथवा न सांपडलें तरी आम्हांला काय? 'रामाय स्वति रावणाय स्वति।'

पण ही मौज आम्हांला बरीच महागांत पडली. एवढ्या अवधींत चाहूल न लागूं देतां गनिमी काव्यानें एक कृष्णमेघ आमच्या डोक्यावर चढला होता आणि त्यानें आपलें भांडार फोडलें होतें. मीं वर पाहून मनाशीं म्हटलें, बोलून चालून शरन्मेघ हा! करील थोडासा शिडकाव अन् जाईल तोंड 'गोरं' करून. पण आज त्याचें औदार्य शिगेला आलें. आणि आमचें अगतिकपणही तसेंच. नदीच्या पात्रांत, ऐन मध्यावर, उघड्या नावेंत, ब्रह्मांडकटाहाखालीं आम्ही प्रतिकारशून्य होऊन तें धाराताडन सोशीत होतों. आम्हां पुरुषांचें सोडा; पण नावेंतल्या त्या ललनांची अवस्था दयनीय होती. संकोचून संकोचून त्या अगदीं कळ्या झाल्या होत्या. मी हळूच म्हणालों, 'नवऱ्यानें अन् पावसानें झोडपलें तर दाद कोणाकडे मागायची!' त्यांनीं आपलें लज्जेंतलें सुखदुःख एकमेकींना खेटून चटकन् सामायिक

करून घेतलें. मेघाला 'अकारणकारुणिक' म्हणून गौरवणारा तो संस्कृत कवि या वेळीं त्यांच्यापुढें आला असता तर त्यांच्या भुवयांची कमान खासच चढली असती.



विष्णुपदाच्या पायरीला होडी टेकली आणि आम्हीं अक्षरशः अंगावरचे कपडे पिळले. तें विष्णुपद म्हणजे गयेच्या विष्णुपदाची लहानशी प्रतिकृति आहे. त्यांत गायीचीं पावलें, देव जेवला ती दगडी वाटी, समचरण आणि देहुडाचरण अशीं दोन्ही प्रकारचीं पावलें आहेत. या विष्णुपदावर पितरांच्या उद्देशानें पिंडदान करून यात्रेकरू गयाश्राद्धाचें पुण्य मिळवतात.

विष्णुपद आणि किनारा यांना जोडणारा एक लहानसा पूल आहे. त्यावरून पलीकडे जाऊन आम्ही गोपाळपुराची वाट चालूं लागलों. आतां पाऊस ओसरला होता आणि पश्चिमाकाशांत एकावर एक अशीं दोन इंद्रधनुष्यें उगवलीं होतीं. गडद निळ्या पार्श्वभूमीवर सत-रंगांची दुगुणी शोभा विलसली होती. बापानें रागाच्या भरांत मुलाला आधीं बेदम झोडपावें आणि मग पश्चात्ताप वाटून मुठींनीं खाऊ चारावा तशीच गत शरदाकाशानें आमच्या बाबतींत केली होती. पण नुकतेंच आमचें अंग वाळत होतें ; त्यामुळें त्या धनुष्याच्या कमानीला बाण तर जोडलेला नाहीं ना, अशा संशयी नजरेनेंच मी तिकडे पाहूं लागलों.

गोपाळपूर ही लहानशी वाडी आहे. भुइकोटासारखें तिथें जें एक दगडी देऊळ आहे, तें पाहण्यासाठींच तिकडे जायचें.

"देहुडाचरणीं वाजवितो वेणु
गोपिकारमणु स्वामी माझा।"

हें नामदेवानें केलेलें वर्णन याच मूर्तीचें असावें. आषाढी आणि कार्तिकी पौर्णिमेला इथें मधल्या चौकांत काला होतो. वारीची सगळी यात्रा त्या वेळीं तिथें लोटते. काल्याचा प्रसाद घेतल्याशिवाय वारकऱ्याला पंढरपूर सोडण्याची परवानगी नसते.

गोपाळकृष्णाच्या मागच्या बाजूस त्याचे श्वशुर भीमकमहाराज आपल्या लेकीसह उभे आहेत. रुक्मिणीचा रुसवा फिटून तिचा अन् श्रीहरीचा नीरक्षीरासारखा समेट झाला तो इथेंच. मंदिराच्या प्राकारांत यशोदेचा 'उखळ, मुसळ, जातें' असा सगळा संसार मांडून ठेवलेला आहे. तिथेंच आग्नेयीला तळघरांत 'नामयाची जनी' आहे. तिचें स्वैंपाकघर, खाट, आणि गोधडी तिथें दाखवतात. याच जनीनें 'प्रेमसूत्र दोरी' लावून पीतांबर नेसलेल्या देवाला आपल्यामागें रानोमाळ फिरवलें होतें. या महाराष्ट्राच्या मीरेपुढें माथा नमवतांना मीं म्हटलें, 'तुझ्या अंतरांतल्या हरिप्रेमाचा एक कण जरी मला दिलास तरी माझं जीवन कृतार्थ होईल.'

गोपाळपुराजवळच पुष्पावती ही 'कुल्या' भिवरेला भेटते. मंदिराच्या गच्चीवरून मीं लांबवर तिचें पात्र न्याहाळलें. पण तिथें एकही पुष्प मला दिसेना. दिसली ती बिनखड्याची गाळीव गुळगुळीत माती.

आम्ही जसे होडीनें गेलों तसेच होडीनें परत आलों. किनाऱ्याला पाय लागला तेव्हां धूपारतीचीं वाद्यें वाजूं लागलीं होतीं. जलसहलींत परिचित झालेले रा. बाळासाहेब शिंदे बडवे मला म्हणाले, 'तुम्ही उद्यां पहांटेस देवळांत या; म्हणजे देवाचं पंचामृतस्नान पहायाला मिळेल.' मीं म्हटलें, 'अलभ्य लाभ.' पागोटें घातलेला, सुवर्णमुकुट चढवलेला

सुवेष, सालंकृत ‘ बरवा पाण्डुरंग ’ मीं पाहिला होता. पण अजून मला ‘ मोकळा ’ देव पहायचा होता. ‘ सावळीये बुंथी सावळिये रूप ’ या ज्ञानेश्वरांच्या उक्तीसारखा. मी योग्य वेळीं तिथें हजर झालों. यथाकाळ सगळे सेवेकरी जमले. उपाध्यायानें—

**“ उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविन्द उत्तिष्ठ गरुडध्वज**
**उत्तिष्ठ कमलाकान्त त्रैलोक्यं मङ्गलं कुरु । ”**

हा मंत्र म्हणून प्रथम देवाला जागें केलें. पुजाऱ्यानें देवाचे पाय धुऊन नवें गंध लावलें. तसेच पुढचे उपचारहि झाले आणि नंतर काकडा आरतीला प्रारंभ झाला. मंदिरांत जमलेल्या समुदायानें आरती म्हणायला सुरवात केली—

**“ अनुपम्य नगर पंढरपूर, भीमा मनोहर, संताचें माहेर, अव्यक्त आदिमूर्ति परब्रह्म साकार, विटेवरी उभें नीट कटिं ठेवूनी कर**

**“ जयदेवा पांडुरंगा, जय आनंदकंदा, आरती ओवाळीन पुंडलीकवरदा,——— ”**

काकडा झाल्यावर पुजाऱ्यानें देवाचीं वस्त्रें उतरलीं. मूर्ति आपाद-मस्तक अनावृत झाली. माझ्या नेत्रांना टक लागलें. जरा अधिक जवळीक करून मी तें समग्र ध्यान न्याहाळूं लागलों. मूर्ति ज्या विटेवर उभी आहे, तिच्याखालीं पालथें कमळ आहे. १८७३ सालीं कुठला एक गोसावी आला कोण जाणे! त्यानें दर्शनाच्या मिषानें देवाच्या उजव्या पायावर धोंडा घातला. मूर्ति दुखावली आणि त्या पायाच्या मागें टेकण द्यावें लागलें. विठ्ठलाच्या पायावर नव्हे ; तर असंख्य भागव-तांच्या हृदयावर वज्राघात होता तो ! पण थोडक्यांत निभावलें. हा गोसावी कोणत्या दैवताचा उपासक असेल तो असो ! पण दुसऱ्यांचीं दैवतें मोडून आपलें दैवत श्रेष्ठ ठरवतां येत नाहीं, हें त्या बिचाऱ्याला समजलें नसावें. या कृत्यानें अंधभक्तीचा आसुरी प्रकारच त्यानें दाखवला असें म्हटलें पाहिजे. पाषाणाची मूर्ति फोडतां आली तरी हृदयांतली मूर्ति कोण फोडूं शकेल !

देवाचे दोन्ही हात कटेवर असले तरी त्यांची ठेवण वेगळी आहे. डावा हात एका शंखाच्या पोटांत बोटें अडकवलेल्या स्थितींत असून उजवा हात कमलनालासह उताणा आहे. कमलकलिका मांडीवर टेकली आहे. कमरेंत तिपेडी मेखला आणि गळ्यांत कौस्तुभ दिसला. उजव्या हृदयावर श्रीवत्सलांच्छन आढळलें. कानांतलीं मकरकुंडलें स्कंधभागावर विसांवलीं आहेत. मुखमुद्रा लांबट आहे. ' दहिं, दूध, लोणी ' नित्य आस्वादिल्यामुळेंच जणुं गाल फुगीर झाले आहेत. खालीं कंगोरा असलेला, उभट पण अगदीं टोपीसारखा मुकुट मस्तकीं आहे. पण साधुसंत म्हणतात कीं, तो मुकुट नसून शिवलिंग आहे. ' विठोनें शिरीं वाहिला देवराणा ' असें समर्थांनीं सांगितलें आहे. विठ्ठल म्हणजे विष्णु आणि त्याच्या माथां मुकुटरूप शिव. हरिहरांचें ऐक्य दाखविणारी ही कल्पना निःसंशय हृदयंगम आहे. शिल्पवेत्ते सांगतात कीं, प्राचीन मूर्तिकलेंत आढळणारें अंगसौष्ठव या मूर्तीला नाहीं. मध्ययुगीन कृत्रिमताही नाहीं. त्यावरून ही मूर्ति फारशी पुराणकालीन नसावी. पण भक्त भागवतांना या नव्या-जुन्याच्या चर्चेशीं कांहींच कर्तव्य नाहीं. ' युगें अठ्ठावीस ' ही त्यांची खूणगांठ पक्की बांधलेली आहे.

पंढरीच्या या पांडुरंगानें विजयानगरचा प्रवास केला होता किंवा नाहीं याविषयींही विद्वानांनीं चर्चा केलेल्या आहेत. संतचरित्रकार महीपति सांगतो कीं, विजयानगरच्या रामराजानें पंढरीची विठ्ठलमूर्ति नेली आणि भानुदासानें ती परत आणली. पण भानुदासाचा निर्याणकाल शके १४२५ किंवा २६ असें मानतात आणि इतिहास तर रामराजा शके १४६५ पर्यंत कांहीं हातपाय हालवीत असल्याचें कबूलच करीत नाहीं. तेव्हां हें कसें जमायचें ? अर्थात् तो रामराजा नसून कृष्णदेवराय असावा हें दुसरें मत पुढें आलें. भानुदासाशीं समकालीन असलेला तोच आहे. इतर अनेक ठिकाणांहून अनेक मूर्ति आणून त्यानें विजयानगरांत पूजेला लावल्या होत्या असे पुरावेही मिळतात. त्यावरून या मूर्तीचा ' उचल्या 'ही तोच असणें शक्य

आहे. पण ही कल्पना एवढ्यावरच थांबली नाहीं. भानुदासाला मूर्ति परत मिळाली ती मूळचीच मिळाली का नवी बनवलेली, असे आणखी तिला पंख फुटले आहेत. कारण एक विठ्ठलमूर्ति तिथल्या उत्खननात सांपडली असून ती आजच्या पंढरपुरस्थ मूर्तीहून अधिक सुंदर आणि कलापूर्ण आहे. असो.

उपाध्यायानें पंचामृताचा मंत्र म्हटला, पुजाऱ्यानें दुधाचा तांब्या देवाच्या मस्तकावर उपडा केला आणि मी भूतकाळांतून वर्तमानांत आलों. त्या दुग्धधारा मुखावरून, स्कंधावरून, हृदयावरून, कोपरां-वरून खालीं उड्या घेत होत्या अन् देवाच्या पावलांभोंवतीं घोटाळत होत्या. मातृस्तनींच्या दुग्धाचा एक 'वोगळ' तान्हुल्या रामाच्या मुखांतून गळला आणि हृदयावर पाघळला तर लगेच मोरोपंतांना उत्प्रेक्षा सुचली.

> " मंदाकिनीचा गगनीं प्रवाह तो
> चंद्रप्रभापांडुर काय वाहतो ! "

पण इथें तर मेघश्याम सगळाच्या सगळाच दुधानें 'धवळलेला' मी पहात होतों. मी आतां कोणती उत्प्रेक्षा करूं? अन् मला गद्य माणसाला सुचणार तरी काय? खरें पंचामृतस्नान मीं त्या दिवशीं पाहिलें. नाहीं तर संध्येच्या पळींत सगळें एकत्र करून मीही घरच्या देवाला म्हणतच होतों, 'पञ्चामृतैः स्नपयिष्ये !'

कांहीं महाभागांचा निर्धार होता कीं, जोंवर हरिजनांना मंदिरांत प्रवेश मिळत नाहीं तोंवर आपणही आंत जायचें नाहीं. 'रुसलासे नामा देवाशीं न बोले' तसेंच आपणही करायचें. पण देवानें त्यांचा मार्ग आतां मोकळा केला आहे. मात्र त्याच कारणानें पंढरपुरांतल्या कांहीं सनातनी म्हणवणाऱ्या मंडळींनीं देवाशीं आतां नवा असहकार मांडला आहे. पहिला असहकार माणूसधर्मावर अधिष्ठित असल्यामुळें मला त्यांतलें माधुर्य प्रतीत होऊं शकलें. पण या नव्या असहकारांत एका अहंकाराशिवाय मला तरी दुसरेंतिसरें कांहीं दिसत नाहीं. ज्या मुखानें देवाला 'पतितपावन' म्हणायचें त्याच मुखानें 'देव

'विटाळला' अशी ओरड करायची, यांतली विसंगति त्यांना कोण समजावूं शकेल !

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रांतला सर्वांत मोठा संप्रदाय आहे. वारी म्हणजे खेप. दर एकादशीला अथवा आषाढी–कार्तिकीला पंढरीच्या खेपा करणारा तो वारकरी. कर्नाटकांतसुद्धां विठ्ठलभक्तीचा बराच प्रसार आहे. किंबहुना विठ्ठल हा मुळांत 'कानडा'च आहे. विठ्ठलच नव्हे, तर भक्तिमार्गसुद्धां दक्षिणेकडूनच वर आलेला आहे. भागवतमाहात्म्यांत भक्ति स्वमुखानें आपल्या जन्माचा आणि वृद्धीचा इतिहास सांगत आहे : 'उत्पन्ना द्रविडे साऽहं वृद्धिं कर्नाटके गताः'

याच भक्तिमार्गाचें पूर्ण विकसित स्वरूप म्हणजे संतांचा भागवत-धर्म. वैदिक धर्मांचाच मधुर असा हा परिपाक आहे. ज्ञानदेवानें याचा पाया रचला आणि तुका कळस झाला. बाकीचे सगळे संत या दोघांत समाविष्ट समजावे.

भागवतधर्म हा 'बहु सोपा' अशी तुकोबांनीं ग्वाही दिलेली आहे. याच्यांत सोवळ्याचा अतिरेक नाहीं, कर्माची कटकट नाहीं, कीं तंत्राची भानगड नाहीं. त्यामुळें सर्वांना तो सुलभ आहे. वारकरी जसा साधाभोळा, तसाच त्याचा देवही. आणि या दोघांना जोडणारा दुवा म्हणजे 'रामकृष्णहरि' हा मंत्र. तो सुद्धां तुळशीच्या माळेसह फार सोप्यांत मिळतो.

केवळ वारकऱ्यांच्याच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्राच्या जनमनांत विठ्ठल भरून उरला आहे. काशी–वाराणशीच्या आधीं पंढरपुराला जाण्यासाठीं तें तळमळत असतें. 'पाप्यासि कैंचें पंढरपूर' या वाक्प्रचारांत केवढें आर्त भरून राहिलें आहे त्याची कल्पना करा. गोमंतकापासून तों वऱ्हाड–खानदेशापर्यंत कुठेंही जा, पहांटेच्या रामपाऱ्यांत बायका दळण मांडून बसल्या कीं खालीलसारख्या किती तरी भावभरी ओव्या तुमच्या कर्णकुपिकेंत पडतील—

**"पंढरीचा राणा । चला पहायाला जाऊं ।**
**संसारांत होऊं । कृतकृत्य ॥**

पंढरपुरांत । वीण्याशीं वीणा दाटे ।
साधूला संत भेटे । वाळवंटीं ॥
बाई पंढरपुरांत । कपिला गाय येली ।
विठोबाचे जेवणाला । दुधाची खीर केली ॥
बाई पंढरपुरात । कायचा कल्ला होई ।
चुडा भरिते रुक्मिणी । राजा विठू बाकी देई ॥"

मला एक लोकगीत मिळालें आहे. त्याची पीठिका अशी कीं, नामदेव विठोबाला विचारतो, 'देवा, तूं इथें आल्यापासून या स्थानाचं महत्त्व वाढलं हें आम्ही पहातों–ऐकतों. पण 'त्येच्या पलीकडे' इथें कोणतं तीर्थ होतं अन् त्याचं महात्म्य काय होतं' तें मला सांग.' त्यावर —

" विठोबा सांगतो नामदेवाला, ऐक सांगतो तुला ।
सदाशिव पार्वती जाती पंचमीला, वरुणाच्या भेटीला ।
जातां, तहान लागली गिरिजेला, मग बोलली शिवाला ।
स्वामी पाणी पाजावं तुम्ही मला ........."

मग शंकरानें त्रिशूळ भूमींत खुपसला आणि पाताळींच्या भोगावतीचें जळ वर काढलें. गिरिजा पाणी प्याली. त्या तीर्थाचें मग सरोवर झालें. लोक स्नानें करूं लागले. सर्वांचा उद्धार झाला. यमपुरी ओसाड पडली. साध्वी अहल्येशीं पापकर्म आचरून इंद्राला सहस्र भगें पडलीं होतीं. तें पाप धुऊन टाकण्यासाठीं देवांनीं त्याला तीर्थयात्रा उपदेशिली. त्याच्या हातांत एक लोहदंड देऊन त्याला सांगितलें कीं, हा ज्या उदकांत तरेल तिथेंच तुझीं भगें जातील. इंद्राला तसा अनुभव आला तो या ठिकाणीं.

चार दिवसांच्या तिथल्या वास्तव्यानंतर परत फिरतांना मनांत हुरहुर दाटली. आपलें कांहीं तरी मागें राहिलें आहे असें सारखें वाटूं लागलें. राहिलें होतें तें मन आणि तेंही चोरीस गेलें होतें. अशा चोऱ्या तिथें दिवसांढवळ्या अनादि काळापासून होत असाव्या. उगाच नाहीं एका कवीनें जनांना इशारा दिला !—

"मा यात पान्थाः पथि भीमरथ्याः
दिगम्बरः कोऽपि तमालनीलः।
विन्यस्तहस्तोऽपि नितम्बबिम्बे
धूर्तः समाकर्षति चित्तवित्तम् ॥"

'पथिकांनो, भीमा नदीच्या रस्त्याला जाऊं नका. तिथें एक सांवळा दिगंबर राहतो. त्याचे हात कटेवर असले तरी तो असा धूर्त आहे कीं, केव्हांच चित्तरूप वित्त चोरून घेतो.'

रात्रीं नऊ वाजतां झिम् झिम् पावसांत जणुं देवाच्या कृपावृष्टींत भिजत मी गाडींत चढलों. चंद्रभागेच्या पुलावर येतांच मला वाटलें कीं, भागवतधर्माच्या या पुण्यसरितेचें एकवार जातेवेळचें दर्शन घ्यावें. पण ती तर अंधाराच्या सागरांत विलीन झाली होती. पण एवढ्यांत विद्युल्लतेच्या रूपानें माझें भाग्य उजळलें. एक क्षणच; पण तो वक्र प्रवाह आणि तें विस्तीर्ण वाळवंट लखलखलें. मीं भावभक्तीचा अंजलिसंपुट जोडला. पण तो मस्तकीं टेकायच्या आंतच दाटलेल्या नभानें तिच्यावर पुनश्च आच्छादन टाकलें.

---

# २. दक्षिणकाशी-करवीर

कोल्हापूर हें आज मुंबई प्रांतांत विलीन झालेलें दक्षिण महाराष्ट्रांतलें सर्वांत मोठें संस्थान होय. यालाच करवीरक्षेत्र असें पुरातन नांव असून 'दक्षिण काशी' अशी त्याची प्रसिद्धि आहे. कोल्हापूर आणि त्याची पंचक्रोशी ही देवांची आणि तपोधन ऋषींची निवासभूमि आहे. प्राचीन शिल्पकलेचें तें एक उघडें प्रदर्शन आहे. वनशोभेची खाणी उघडून बसलेले डोंगर, त्यांच्या अंगावरून ओघळणाऱ्या सरिता, उंच, बळकट किल्लेकोट आणि आभाळाचे आरसेच जणुं असे विस्तीर्ण तलाव यांनीं तिथला निसर्ग भव्य, रमणीय आहे.

उत्तर काशी ही विश्वनाथाची नगरी तर दक्षिणकाशी ही आदि-मायेची पुण्यपुरी. जगदंबेचीं जीं साडेतीन पीठें आहेत त्यांतलें कोल्हापूर हें मुख्य पीठ समजलें जातें. एकच आदिशक्ति गुणभेदामुळें तीन रूपांनीं नटली आहे. तमोगुणी महाकाली कलकत्त्यांत आणि दक्षिणेस माहूरगडावर राहिली आहे. रजोगुणी महासरस्वतीनें उत्तरेस हिमाचल आणि दक्षिणेंत तुळजापूर पसंत केलें आहे आणि 'सत्त्वागळी' महालक्ष्मी ही करवीरनिवासिनी झाली आहे.

कोल्हासुर, त्याचे पुत्र आणि सगेसोयरे हे दैत्य मातले आणि जगाला उपद्रव करूं लागले तेव्हां त्यांचा बींमोड करण्यासाठीं जगदंबेला इथें यावें लागलें. कैलासशिखराइतकाच हा सह्याद्रीचा माथा तिला आवडला असावा; म्हणून असुरसंहाराचें कार्य समाप्त झाल्यावरही ती इथेंच राहिली. ती आली तसे तिचा मागोवा घेत सगळे सुरगण आले, समस्त तीर्थें आलीं, तिचे अनुचर भैरवही आले आणि बरेचसे ऋषिमुनिही याच मोहरेला लागले.

पराशरानें पन्हाळयावर गुहा खोदली. चिटक्या-मिटक्या टेकडीवर

कृ.ग्र.१८

सिद्ध बटुकेशानें वास्तव्य केलें. गोमती-जयंतीच्या संगमावर श्रीकृष्णानें नवी द्वारका वसविली. वाडीरत्नागिरीचें शिखर केदारेशानें आत्मसात् केलें. दत्तात्रेयाची मध्याह्नभिक्षा इथेंच होऊं लागली आणि क्षेत्राचें माहात्म्य वाढलें.

हरिवंश पुराणांत करवीरक्षेत्राचा उल्लेख मिळतो. फार पुरातन काळीं यादव वंशांतला एक पुरुष इथें राज्य करीत होता आणि तो आपल्या सद्गुणांपेक्षां दुर्गुणांबद्दलच अधिक प्रसिद्ध होता असें सांगतात. इ. स. च्या पहिल्या शतकांत इथें आंध्रभृत्यांची राजवट चालू असल्याचें उत्खननांत सांपडलेल्या कांहीं नाण्यांवरून समजतें. इ. स. २२५ ते ५५० या सव्वातीनशें वर्षांच्या काळांत वाकाटक, कदंब, सेंद्रक आणि मौर्य अशा चार राजवंशांनीं इथें सत्तेचे खांदेपालट केले. पुढें हा प्रांत चालुक्यांच्या ताब्यांत आला. सत्याश्रय पुलकेशी (दुसरा) हा एक लोकप्रिय राजा चालुक्य वंशांत जन्मला. सगळें दक्षिण हिंदुस्थान त्यानें पादाक्रांत केलें होतें. अर्थात् कोल्हापूरही त्यांत आलेंच. आपला राज्य-विस्तार सुव्यवस्थित चालावा यासाठीं त्यानें आपल्याच नात्यागोत्यांतले लायक पुरुष निरनिराळ्या प्रांतीं सुभेदार नेमले होते. त्यांपैकीं कर्णदेव हा संगमेश्वरीं राहून कोल्हापुरासह कोंकणचा कारभार पाहत होता. कोल्हापुरास कांहीं काल क्षेत्रवास करून त्यानेंच इ. स. ६३४ सालीं अंबाबाईचें आजचें गर्भागार उभारलें असा इतिहासज्ञांचा तर्क आहे. चालुक्यांच्या साम्राज्यवैभवाच्या काळांतच हें क्षेत्रही वैभवाला चढलें आणि त्याला 'दक्षिणकाशी' ही गौरवाची उपाधि लाभली.

पुढें चालुक्यांना हुसकून शिलाहार आले. इ. स. ११८० पर्यंत त्यांनीं या प्रदेशावर राज्य केलें. शिलाहारांच्या वंशांत अनेक महापराक्रमी राज-पुरुष निपजले. मारसिंह हाहि एक त्यांपैकींच होता. त्याच्या अमदानींत कोल्हापूर प्रांतांत समृद्धि आणि शांति या जोडीनें नांदल्या. मारसिंहानें त्या काळांत अनेक मंदिरें उभारलीं. अंबाबाईच्या मंदिराचा कलापूर्ण विस्तार करण्याचा उपक्रम यानेंच केला आणि त्याचा मुलगा गंडरादित्य यानें त्यावर कळस चढवला. कोल्हापुरांतलीं बहुतेक जुनीं मंदिरें शिला-

हारांच्याच हातचीं आहेत. इ. स. ११८० मध्यें शिलाहारांचें पर्व समाप्त होऊन देवगिरीच्या यादवांचें पर्व सुरू झालें.

कोल्हापूरच्या इतिहासाशीं संलग्न झालेला यादवांचा पहिला पुरुष सिंघणदेव. त्याच्या सत्ताकालांत १२१८ मध्यें महालक्ष्मीच्या मंदिराला उत्तर बाजूनें महाकालीचें आणि दक्षिण बाजूनें महासरस्वतीचें अशीं दोन मंदिरें जोडलीं गेलीं. अंबाबाईच्या महाद्वाराची कमान भव्य आणि उत्तुंग आहे. पंढरपूरचें महाद्वार, हें महाद्वार वाटत नाहीं तर अंबाबाईच्या महाद्वारांतून आंत प्रवेश करतांना आपल्याला आंत कांहीं तरी भव्य दिव्य दर्शन घडणार आहे अशी आगाऊच कल्पना येते.



आंत शिरतांच समोर सभामंडप आणि डाव्या हाताला एका उंच दगडी चौथऱ्यावर दीपमाळांचें पंचायतन डोळ्यांत भरतें. त्याला लागूनच एका पुष्करिणींत कारंजें थुईथुई उडत असतें. जवळ जाऊन उभें राहिलें तर वाऱ्यानें वाहून आणलेले त्याचे कोंड्यासारखे तुषारही अंगावर घेतां येतात. पुढचा सभामंडप अलीकडच्या काळांतला आहे. तो सोडला तर

अंबाबाईचें मंदिर ताराकृति किंवा कमलाकृति आहे. इतर मंदिरांप्रमाणें याला समोरून प्रवेश नसून पक्षद्वारानें आंत जावें लागतें. आंत जातांच आपण कोरीव खांबांच्या चक्रव्यूहांत सांपडतों. जिकडे पहावें तिकडे खांबच खांब! कांहीं सुटे, तर कांहीं भिंतींत कोरलेले. या खांबांची मोजदाद करणें कठीण आहे. करूं नये असेंही सांगतात. ज्यांनीं हट्टानें तसा प्रयत्न केला त्यांना कांहीं तरी टोला बसल्यावांचून राहिला नाहीं अशाही आख्यायिका आहेत.

मी त्या नादांत पडलों नाहीं. म्हटलें, विषाची परीक्षा घ्यावी कोणीं? आपण आपले सरळ जगदंबेचे चरण गांठावे हेंच बरें. गर्भागारांतील उच्च वेदीवर अधिष्ठित असलेल्या दीड हात उंचीच्या त्या पाषाणमूर्तीला भावार्द्र दृष्टीनें न्याहाळून मीं करसंपुट जोडला—

**“ नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।**
**नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ॥ ”**

गर्भागारांतला देखावा प्रसन्न, गंभीर होता. देवीला ‘ सकळै शृंगार ’ केलेला होता. माथां मुकुट, गळ्यांत हार आणि पुष्पमाला, सुंदर साडी-चोळी, पायांत जोडवीं पोल्हारे आणि पाठीमागें शोभविलेली प्रभावळ हा सगळा सुवेष उभय बाजूंच्या दिव्यांच्या प्रकाशांत लकाकत होता. महा-लक्ष्मीला अलंकारांची उणीव म्हणजे सूर्याला प्रकाशाचा दुकाळ म्हणण्या-पैकींच होईल तें. पण दागिन्यांच्या गर्दीमुळें तिचें अनलंकृत मूलस्वरूप दर्शनाला दुर्लभ होतें हीच काय ती उणीव भासते. देवीचें वाहन जो सिंह तो तिच्या मागें खडा आहे. मूर्ति चतुर्भुज असून वरच्या दोन हातांपैकीं उजव्यांत गदा, डाव्यांत खेटक, खालच्या दोहोंपैकीं उजव्यांत पानपात्र आणि डाव्यांत श्रीफल अशी तिची साधनसंपदा आहे.

मंदिरांतला प्रदक्षिणेचा मार्ग सरळ नसून कमलाकृति आहे. मातुलिंगाचें दर्शन घ्यायला याच मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर जावें लागतें. ‘ कमले कमलोत्पत्तिः ’ तसें देवळावर पुनः दुसरें देऊळ अशी विस्मय-जनक ही रचना आहे. तिथलें शिवलिंग ठीक अंबाबाईच्या मस्तकावर येतें. तिथें मिणमिण जळणारे दिवे तिथला अंधार उजळायला समर्थ होत नाहींत.

तिथें जो एक कुबट दर्प भरून राहिलेला असतो तो आपणांस फार वेळ तिथें थांबूं देत नाहीं. तिथून वर गच्चीवर पाय ठेवला कीं श्वास मोकळा होतो आणि सभोंवतीं पसरलेल्या नगरीचें विहंगम दर्शन घेतां येतें.

अंबाबाईच्या उजव्या हाताला महाकाली एका स्वतंत्र मंदिरांत वसली असून तिच्या भेटीला जाण्याचा मार्ग मुख्य मंदिरांतूनच आहे. वाटेंत श्रीचक्राचें स्थान लागतें. हें एका काळया पाषाणावर कोरलेलें आहे. देवीच्या उपासनेंत या श्रीचक्राला फार महत्त्व आहे. उत्तरेस गंगेच्या कांठीं श्रीनगर नांवाचें जें एक सिद्धपीठ आहे, तिथेंही एक असेंच श्रीचक्र आहे. देवीच्या कृपाप्रसादासाठीं प्राचीन काळीं या चक्रावर नरबलीही देत असत. भगवान् आद्य शंकराचार्यांना ही हकीकत समजली आणि त्यांचें करुणामय अंतःकरण कळवळलें. तशात्च एका बलीच्या प्रसंगीं ते लगबगीनें तिथें गेले आणि त्यांनीं ती श्रीचक्राची शिळा उलथून टाकली. जनसंमर्द या तेजोनिधि तरुण संन्याशाच्या त्या कृतीकडे पहातच राहिला. अमोघ वाणीनें त्यांनीं लोकांना बजावलें कीं, 'आजपासून इथें नरमेध होतां कामा नये.' आणि त्या दिवसापासून ती हिंसक रूढि बंद पडली.

महाकालीचें मंदिर म्हणजे स्थापत्य शिल्पाचा एक नमुना आहे; तर उजव्या हाताचें महासरस्वतीचें मंदिर तितकेंच ओबडधोबड आहे. 'ज्ञानियांचे राजे' सरस्वतीचें वर्णन 'चातुर्यकलाकामिनी' असें करतात. पण इथें सगळी कला संहारशील कालीनेंच्च आपल्या सेवेंत राबवल्यामुळें सरस्वतीच्या वांट्याला कांहींच उरलें नाहीं. हीं दोन्ही मंदिरें एकाच वेळीं उभारलीं गेलीं आहेत. पण कालीमंदिरालाच सगळी कलासामुग्री खर्ची पडली असावी आणि उरलेल्या सामानांत कसेंबसें हें मंदिर उभें करून ते स्थपति आपल्या स्वीकृत कार्यांतून मोकळे झाले असावेत. विधात्याचेंहि एकदां असेंच झाल्याचें कालिदास सांगतो—

'पार्वतीला निर्माण करण्याच्या प्रसंगीं विधात्यानें विश्वांतल्या नामवंत वस्तूंतून सौंदर्य गोळा केलें होतें. पण तिच्या सुवृत्त, नितळ आणि पुष्ट मांड्या घडवतांनाच तें सगळें समाप्त झालें आणि मग उरलेल्या अवयवांत लावण्य आणण्याच्या कामीं त्याला खूप परिश्रम करावे लागले.'

बाहेरच्या बाजूनें मंदिराच्या कटिबंधावर कांहीं स्त्रीमूर्ति कोरून काढलेल्या आहेत. प्रत्येक मूर्ति कोणत्या तरी नृत्याचा आविष्कार करून उभी आहे. त्या लहान असल्या तरी रेखीव आहेत. अंबाबाईच्या सेवेसाठीं उपस्थित झालेल्या चौसष्ट योगिनी म्हणून लोक त्यांची ओळख करून देतात. पण त्यांना योगिनी म्हणायला मन कचरतें. चौसष्ट योगिनींपैकीं शुष्कांगी, नरभोजनी, प्रेताक्षी, वाराही, दीर्घलंबोष्ठी यांचें लालित्य आणि सौंदर्य त्यांच्या नांवावरूनच कळून येत नाहीं काय ? मग त्यांचा आणि या नृत्यांगनांचा मेळ कसा घालायचा? त्यापेक्षां द्रविडियन लोकांत त्यांना ' मदनाच्या हातांतल्या बाहुल्या ' म्हणतात तेंच अधिक समुचित आणि सरस वाटतें. यांतल्या कांहीं मूर्ति मुसलमानी राजवटींत भग्न झाल्या होत्या. त्याच्या जागीं आतां तशाच प्लास्टरच्या करून बसविल्या आहेत.

या मंदिराला दिशासाधन आहे. देवीचें मुख अगदीं रेखीव पश्चिमेला आहे. सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो हें सत्य असलें तरी तें कांटेकोर नाहीं. खऱ्या पूर्व-पश्चिम रेषेवरून वर्षांतून फक्त दोनच दिवस सूर्याचा एकचक्र रथ चालतो. या दोन दिवसांना विषुवदिन अशी संज्ञा आहे. ( मार्च ता. २१ व सप्टेंबर ता. २१. ) या दोन दिवशीं संध्याकाळीं सूर्यास्ताच्या आधीं थोडा वेळ सूर्यकिरण मुखमंडपावरच्या झरोक्यांतून देवीच्या मुखावर पडतात. ती कृष्णपाषाणाची मूर्ति अंगावरच्या वस्त्राभरणांसह तेजानें पुंजाळते. सगळा गाभाराच उजळून निघतो. तो क्षणप्रकाश त्या बंदिस्त गर्भागाराच्या कोनाकोपऱ्यांत कायमचें घर करून बसलेल्या अंधाराला हुसकून काढतो. हे दोन्ही दिवस बहुधा देवीच्या उभय नवरात्रांतच येतात. आश्विनांत शारदा नवरात्र आणि चैत्रांत वासंतिक नवरात्र. त्या दिवसांत यात्रा पुष्कळ असते आणि देवीच्या भक्तांना तिच्या किरणस्नानाचा हा डोळ्यांची धणी पुरवणारा सोहळा पहायला मिळतो.

अंबाबाईच्या प्राकारांतून एक प्रदक्षिणा केली कीं शेषशायी, दत्तात्रेय, नवग्रह, विश्वेश्वर, काशी, मणिकर्णिका, इत्यादि अनेक देवांचें आणि

तीर्थांचें दर्शन घडतें. कुठें बुवा-बैरागी चिलिमीशीं मुखमीलन करून दाढी-मिशांच्या रानांतून धुराचे लोट सोडतांना दिसतात, कुठें जोतिषी पंचांगें उघडून पृच्छकाचे ललाटलेख वाचतांना आढळतात, कुठें भिक्षुक-संघाचे दुसऱ्या दिवशींच्या लघुरुद्राचे अथवा सप्तशतीच्या पाठाचे बेत कानांवर येतात, कुठें नागर पुरंध्रींचा कलरव चालतो, कुठें पुराणश्रवण घडतें आणि कुठें भिन्न भाषांचे आलापसंलापही कर्णसंपुटांत शिरतात. दुपारची ' जगन्नाथाची वेळ ' सोडली तर हा मंदिरप्राकार नेहमींच जनाकीर्ण असतो.

रोज पहांटे पांच वाजतां जगदंबेची काकडाआरती होते. सकाळीं षोडशोपचार समर्पिले जातात. दुपारीं आरतीबरोबर महानैवेद्य होतो.



तिसऱ्या प्रहराच्या अखेरीस अलंकारपूजा होते. संध्याकाळीं धूपारती आणि रात्रौ शेजारती होते. शुक्रवारीं जो तिथें पोंचेल त्याला पालखीचा समारंभ पहायला मिळेल. नवरात्रांत देवीचा महोत्सव होत

असतो. हे नऊ दिवस म्हणजे देवीनें महिषासुराशीं मांडलेल्या तुंबळाचे स्मृतिदिन होत.

महिषासुर हा अतुर्बळी त्रिभुवनसम्राट् होता. अष्ट लोकपालांवरही त्यानें आपली जरब बसवली होती. सगळे देव त्रस्त आणि ग्रस्त झाले होते. आपली सोडवणूक व्हावी म्हणून ते मग परमात्म्याला लोटांगणीं गेले. त्यांची ती असहाय अवस्था पाहून तिन्ही बड्या देवांच्या शरीरांतून पुण्यप्रकोप उसळला. त्यानेंच शक्तीचा आकार धरला. देवांनीं आपापलीं आयुधें तिच्या हातीं दिलीं. लगेच ती सायुध सुसज्ज होऊन महिषासुराला सामोरी झाली. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हें घनघोर युद्ध चाललें आणि अखेरीस जगाचा कर्दनकाळ झालेला तो महिषासुर देवीच्या हातून निवटला. 'जेव्हां जेव्हां दैत्य माजतील आणि जगांत उच्छाद मांडतील तेव्हां तेव्हां मी अवतार घेऊन त्यांचें निर्दळण करीन' असें त्याच वेळीं सर्व जगाला तिनें आश्वासन देऊन ठेवलें.

**"पुत्रान्देहि धनं देहि सर्वान् कामाश्च देहि मे ।**
**रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ॥ "**

ही सप्तशतींतली प्रार्थना तिथें सर्वत्र निनादत असते. पण तिथून परत फिरतांना मला मात्र जगदंबेकडे इतकी 'आपस्वार्थी' मागणी करवेना. बरेंवाईट कसें का असेना, रूप मला जन्मतःच मिळालें आहे. यश हें तर स्वतःच्या कर्तबगारीवरच अवलंबून असणार. 'सर्व काम' जर देवीनेंच बसल्या जागीं पूर्ण केले तर माझ्या पुरुषार्थाचें तें मरणच नाहीं का? निष्क्रिय म्हणूनच नीरस जीवन मग मी कसें सोसूं? 'शत्रूंना ठार कर' असें विनवायला मला आधीं शत्रुच नाहींत अन् असले तरी मी त्यांचें असलें अभद्र चिंतिणार नाहीं. तेव्हां हें सगळें बाजूला ठेवून देवीला मीं प्रार्थिलें तें हें कीं—

**"त्रैलोक्यवासिनामीड्ये! लोकानां वरदा भव"**

जुन्या राजवाड्यांत तिथें आणखी एक अंबेचें मंदिर आहे. राजघराण्यांतल्या खाशा मंडळीला निराबाध पूजा-अर्चा करायला

मिळावी म्हणून तिथें निराळ्या मूर्तीची प्रतिष्ठा झाली आहे. आजमितसि तुम्ही तिथें गेलांत तर मंदिराच्या मधल्या चौकांत हरणें, चित्ते, ढाण्ये वाघ आणि गवा रेडा असें पशुसंमेलन दिसेल. त्या वाघांना न भितां, न कचरतां निःशंकपणें पुढें जावें. कारण ते पेंढा भरलेले आहेत. तो गवाही तसाच. कै. छत्रपति राजाराममहाराज यांनीं ज्या धाडसी शिकारी मारल्या त्यांचें तें प्रदर्शन आहे. त्यांनीं यमराजाला दुसरें वाहन म्हणून पाठवून दिलेला तो गवा रेडा इतका उग्र, मस्त, सर्वांगीं भरदार आहे कीं, चर्मावशेष स्थितींतहि त्याच्याजवळ जायला मन धास्तावतें. त्याच्या उग्रतेंतहि सुंदरता वास्तव्य करीत असल्याचें माझ्या निदर्शनाला आलें आणि सिंहाच्या गैरहजेरींत त्याला कामचलाऊ वनराज म्हणून खुशाल नियुक्त करावें अशीहि खात्री झाली.

कोल्हापुरांत निरनिराळ्या तर्थिनामांचे अनेक लहानमोठे तलाव आहेत. त्यांपैकीं बरेचसे हल्लीं बुजवून नामशेष केले गेले आहेत. पद्मालय-तीर्थ म्हणजे पद्माळें. हें आतां घोडदौडीचें रंगण बनलें आहे. कपिलतीर्थ आतां महिषीदोहनाचें ठिकाण झालें आहे. रंकाळें मात्र अजून ‘ यथास्थित ’ आहे. रंकाळ्याचा तलाव पहायला योग्य समय म्हणजे सूर्यास्ताच्या पूर्वीं एक घटका. त्याच्या दगडी कठड्याला टेकून पश्चिमाभिमुख व्हावें आणि मजा पहावी. वाऱ्याला अवखळपणा दाखवायला फार छान जागा आहे ती. सुमारें तीन मैलांचा घेर असलेल्या त्या निळ्या गंभीर जलाशयावर वायुलहरींनीं आघात केला कीं जललहरींचें लास्य सुरू होतें. त्यांनीं फेर धरला कीं पश्चिमाकाश त्यांच्यावर गुलालाच्या पिचकाऱ्या मारूं लागतें. पाण्याचा वर्ण पालटतो. सगळें जलपृष्ठ लालच लाल बनतें. मधून मधून निळ्या-तांबड्याचें एक निराळेंच मिश्रण चमकून जातें. त्या लहरी मग रासरसांत सहनृत्य करण्यासाठीं मावळतीच्या सूर्यकिरणां-नाही खालीं ओढतात. तेही मग त्यांच्यासंगें झुलायला लागतात. भगवान् सविता ही क्रीडा सौम्य दृष्टीनें थोडा वेळ पहात राहतो. पण त्याला फार वेळ सवड कुठली! दुसरें गोलार्ध उजळण्यासाठीं त्याला तिकडे

नेमलेल्या घटकेला पोंचायचें असतें. त्याच्यामागोमाग किरणजालही ओसरतें. तो उसळत्या रंगाचा सागर भान हरपून पहात असतां सूर्य घसरत घसरत केव्हां अदृश्य झाला त्याचा आपल्याला पत्ताहि लागत नाहीं. थोड्या वेळानें गुलालाच्या पिचकाऱ्याही थांबतात. तळ्याच्या स्वाभाविक निळ्या वर्णांत आकाशाची 'निळावंती' मिसळते आणि सगळीकडे गडद गांभीर्य पसरतें. एवढा वेळ उजव्या हाताला प्रतिबिंबाच्या द्वारें आपलें उलटें रूप दाखवणारा कांठावरचा उत्तुंग शालिनीमहाल, त्या गंभीरतेला भिऊन पाण्यातून आपलें अंग काढून घेतो. डाव्या हाताला पाण्यांत उभारलेल्या संध्यामठांत द्विजगणांच्या ऐवजीं अंधारच दाटूं लागतो. हळूहळू वाराही पडतो. नाचून कुदून दमल्या भागल्या जललहरी आपोदेवींच्या कुशींत रिगतात. आणि असें झालें कीं मग मन सांगूं लागतें, 'चला परतूं या आतां.'

रंकाळ्याजवळच एक भला मोठा नंदी एका घुमटींत बसून राहिला आहे. आम्ही गेलों तेव्हां त्याच्याभोंवतीं गुडघाभर पाणी होतें. नंदी-समोर शिवालय असायलाच हवें अशा समजुतीनें कोणी तरी त्याच्यापुढें लिंगस्थापना केली असावी. त्यामुळें इथें शिव उघड्यावर आणि 'शिवापुढचा' मंदिरांत असा उलटा प्रकार झाला आहे. डौलदार ठाणमाण असलेल्या या नंदीचा मुखभंग झालेला पाहून मनाला विषाद वाटला. माझ्यासारखाच इतर अनेकांनाही वाटला असेल. म्हणून त्यांनीं दुसऱ्या एका दगडाचा ओबडधोबड मुखाकार बनवून तिथें जोडला आहे. हा नंदी रोज गहूंभर पुढें जातो आणि तिळभर मागें येतो अशी आख्यायिका सांगतात. या गतीनें तो ज्या दिवशीं रंकाळ्यांत उडी घेईल त्या दिवशीं विश्वही प्रलयसागरांत बुडणार आहे म्हणे! मीं गहूं आणि तिळ यांचा आकार मनाशीं कल्पिला, नंदी आणि रंकाळें यांचें चालू घडीचें अंतर दृष्टिपथांत आणलें, आणि निदान माझ्या हयातींत तरी जगाचें कांहीं बरेंवाईट होत नाहीं अशी खात्री करून घेतली. पण त्याच वेळीं मनानें अशी एक शंका उपस्थित केली कीं, जगांतली वाढती अनीति आणि माणुसकीचा ऱ्हास यांना उबगून या नंदिकेश्वरानें आपली गति वाढवली नि परागति थांबवली तर—?

भोगावती, कुंभी आणि तुळशी या तीन नद्यांचा संगम कोल्हापुरापासून एका कोसावर झाला आहे. त्या सरिता लहान असतील; पण त्यांचा तो संगम करवीर क्षेत्राला प्रयागरूप ठरला आहे. या प्रयागस्नानाला जातांना पंचगंगेवरून जावें लागतें. तिथेंच ब्रह्मगिरीची टेकडी आहे. तिच्या पोटांत फार मोठा इतिहास दडलेला असावा असा सुगावा संशोधकांना लागला. डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रीसर्च इन्स्टिटयूटनें १९४५ सालीं तिचें उत्खनन केलें. हें काम चार महिने चाललें होतें. आंध्र, शिलाहार आणि बहामनी अशा तीन कालखंडांतल्या अनेक वस्तु त्यांत गवसल्या.

कसला तरी दिव्य अथवा भौम उत्पात होऊन तिथली पहिली वस्ती उठली. कांहीं काल तो पंचगंगेचा तटप्रांत निर्मनुष्य झाला. त्या भूमीवर कालांतरानें मातीचा आणखी एक थर चढला. पुनश्च कुठून तरी दुसरा मानवसंघ तिथें दाखल झाला आणि त्यानें तिथें संसार उभारला. कालचक्राच्या फेऱ्यांत त्याचेही 'तीन तेरा' झाले. त्या भूमीवर आणखी एक थर सांचला. जुन्या मानवाच्या गाडलेल्या संसारावर आणखी कुठल्या तरी भटक्या मानवजातीनें आपलें बस्तान बसविलें. अशी सांडीमांडी तीन वेळां तिथें घडलेली आहे.

शेंकडों संवत्सरांच्या माळा फिरल्या. त्या टेकडीला शिशिरानें कांकडवलें, ग्रीष्मानें तापवलें आणि वर्षाकाळानें असंख्य जलधारा तिच्या उरीं खोंचल्या. पण ती डगमगली नाहीं कीं दुभंगली नाहीं. आपल्या पोटांतलें गुप्त धन संशोधकांच्या हवालीं करूनच तिनें कृतार्थपणें धरणीवर अंग टाकलें!

संशोधकांना खणतां खणतां तिथें एका ठिकाणीं बऱ्याचशा पिचलेल्या बांगड्या सांपडल्या. त्या पाहून त्यांना वाटलें असेल कीं—

**"उत्पातानें जैं भिंतींचे सर्व बंध तुटले**
**न कळे त्यामधिं किती जणींचें कांकण वाढवलें!"**

फुटलेलीं खापरें पाहून ते म्हणाले असतील कीं, किती तरी लोक नशिबावर खापर फोडीत इथून निघून गेले असावेत. तेलवातीविना

दीनवाण्या दिसणाऱ्या किती तरी पणत्या वर आल्या. मुसळांवांचून उखळें सांपडलीं. कितीक सुरया आणि त्यांचे तुकडे आढळले. कोण्या बिचाऱ्याच्या नशिबाला न लाभलेला एक ताईत मिळाला. शिजायच्या आधींच करपलेले मूठभर तांदूळ हाताला लागले. रोमनपद्धतीची एक बैलगाडी आणि कांहीं धातुमूर्ति सांपडल्या; त्या पाहून आंध्रकालांत रोमन लोकांशीं आपलें दळणवळण असावें असा तर्क संशोधकांना करतां आला. हे आणि इतर सर्व प्राचीन अवशेष आजमितीस कोल्हापूरच्या वस्तुसंग्रहालयांत व्यवस्थित मांडून ठेवलेले आहेत. बारीक डोळ्यांनीं तें प्रदर्शन पहायचें तर दोन तासांची तरी सवड घेऊनच गेलें पाहिजे.

कोल्हापूरचा नवा राजवाडा सुंदर आहे, समृद्ध आहे आणि शहराच्या बाहेर चांगल्या हवेशीर जागीं बांधलेला आहे. पण माझ्या स्मरणांत तो राहील तो नजीकच्या पशुसंग्रहालयामुळें. विशेषतः हरणांच्या अनेक जाति तिथें आहेत. त्यांच्या जोडीला धड पशु नव्हत, धड पक्षीही नव्हत असे कांहीं शहामृगही दिसतात. एका विस्तीर्ण जागेभोंवतीं कुंपण करून त्यांचें स्वातंत्र्य मर्यादित केलेलें आहे. तिथें त्यांच्यासाठीं रान आहे, मैदान आहे, जलाशय आहे आणि वासगृहेंही आहेत. आम्ही तिथें पोंचलों तेव्हां सूर्य मावळून गेला होता. अंधार पडायच्या आंत त्यांचें नक्तभोजन उरकण्याची पद्धत असावी. नोकरानें घंटा वाजवतांच ते सगळे पशु एका लांब चौकोनी वेदीभोंवतीं तुरुतुरु गोळा झाले. जणुं एखाद्या गुरुकुलांतले शिस्त पाळणारे छात्रच. नोकरानें भिजलेल्या धान्याची त्या वेदीच्या कडेकडेनें रांग ओतली. एवढा वेळ कठड्याशीं येऊन शेंगांसाठीं आमच्याकडे तोंड वेंगाडणारा तो आगंतुक शहामृगही दोन तुरकाठ्यांवर आपल्या देहाचें आडवें ओझें कसेंबसें सांवरीत पोटपूजेसाठीं तिकडे चालता झाला. देवांच्या पंक्तींत राहु तसा तो शहामृग पंक्तींत घुसतांच जवळच्या हरिणबालकांनीं नाखुषी दर्शवली आणि तीं तिथून निघून दुसऱ्या जागीं शिरलीं. कसलीही कुरापत न निघतां तो भोजनसमारंभ सावकाशपणें पार पडला आणि तें पाहून न जेवतांच माझेंही पोट भरलें.

कोल्हापूरला जाऊन पन्हाळगड पहायचा नाहीं म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासाविषयीं आपल्याला कांहींच कदर नाहीं असें दाखविण्यासारखें आहे; आणि तेंही प्रवासाची सोय नियमित आणि उत्तम असतांना. एका सुंदर सकाळीं गंगावेशींतून निघणाऱ्या बसमधून मी तिकडे जायला निघालों. पंचगंगेचा पूल ओलांडतांच सगळीकडे उंसाचे मळे दिसूं लागले. त्या उंसाचे निळसर उंच तुरे वाऱ्यावर डुलतांना माझ्या- ऐवजीं कालिदासानें पाहिले असते तर त्यानें 'शरदाच्या मस्तकावर ढाळल्या जाणाऱ्या चवऱ्या' म्हणून त्यांना गौरवलें असतें. शेतें पिकायला आलीं होतीं. आसमंत हिरवागार दिसत होता. दृष्टीला विषाद किंवा उदास वाटेल असें कुठेंच कांहीं नव्हतें. रत्नागिरीचा रस्ता सोडून आमची गाडी निराळ्या रस्त्यानें डोंगर चढूं लागली आणि अर्ध्या तासांत दहा मैलांचें अंतर तोडून गडावरच्या आपल्या मुक्कामाला आली.

मी उतरून जवळच्या मराठी शाळेंत गेलों. तिथल्या मुख्य गुरुजींची ओळख करून घेतली. गड फिरून दाखवण्यासाठीं त्यांनीं मला एक वाटाड्या पाहून दिला. मी इतिहासापेक्षां वाङ्मयाचा विशेष चहाता असल्यामुळें पन्हाळा म्हटलें कीं मला कविश्रेष्ठ मोरोपंतांची आधीं आठवण होते. मी निघतांनाच मनाशीं ठरविलें होतें कीं, पंतांच्या जन्मभूमीचें दर्शन प्रथम घ्यायचें आणि मगच इतर सर्व गोष्टी करायच्या. मुख्य गुरुजींना मी तशी विनंति करतांच ते स्वतः, मजबरोबर आले आणि तिथल्या मामलेदारकचेरीजवळच्या एका पडिक भूमीवर उभे राहून मला म्हणाले, 'हें पंतांचें जन्मस्थान!'

मीं त्या तृणपर्णाच्छादित भूमीला लवून वंदन केलें. त्या गडाचा आणि विशेषतः त्या वास्तूचा केवढा महिमा कीं, तिनें महाराष्ट्राला पाऊण लाख 'ग्रंथ' रचणारा एक भगवद्भक्त महाकवि दिला. ज्याची आर्या रसिकांना अमृतरसाहून आगळी वाटली. ज्यानें त्या वृत्तावर कायमचा आपला शिक्का उठवून ठेवला. आपल्या वयाचीं पहिलीं दोन तपें त्यांनीं इथें घालविलीं. त्यांचा विद्याभ्यासही इथेंच पाध्यांच्या पाठ-

शाळेंत झाला. कोल्हापूरला गानसम्राट् मरहूम अल्लादियाखां यांचें स्मारक म्हणून त्यांचा अर्धपुतळा उभारला गेला हें ठीक झालें. पण त्या आधीं महाराष्ट्रशारदेच्या या कंठमण्याचें इथें स्मारक व्हायला हवें होतें.

तिथून पुढें होऊन मी जेव्हां गडाचे चढउतार पायाखालून घालूं लागलों तेव्हां मला आंब्यांच्या शेजारीं फणस दिसले. रसबाळया केळींच्या रांगेंत पोफळी पहायला मिळाल्या. घरांच्या उतरत्या कौंबळो छपरांवर चढवलेल्या वेलांना दोंदिल भोपळे लटकलेले आढळले. जास्वंदींच्या संगतींत सोनटक्क्याचीं झुबक्यांनीं उगवलेलीं झुडपेंही दृष्टिपथांत आलीं. गोंड्याचें गवत तर सगळीकडेच उगवलें होतें आणि पायाखालची वाटही तांबडीच होती. त्यामुळें मला माझ्या गोमंतकांतल्या साटरेगडावरच पोंचल्यासारखें वाटलें. त्या प्रदेशाविषयीं एकदम अंतरांत कोवळीक दुणावली.


**‘ क्रीडावें मुक्तींनीं माहेरीं जेविं लाडक्या मुलिंनीं ’**

तसा मी त्या गडावर स्वच्छंद बागडलों.

सज्जेकोठीजवळ जातांच काळ्या तोंडाच्या रामदूतांनीं आमचें स्वागत केलें. रखवालदारानें दार उघडून आम्हांला वरच्या मजल्यावर नेलें आणि सिद्दीजोहाराचा गडाला वेढा पडला असतां शिवाजीमहाराजांनीं जिथून उडी मारून त्या यवन सरदाराच्या हातावर तुरी दिल्या, ती तूर्त बुजवलेली खिडकी दाखवली. महाराजांचें जिवावरचें साहसकर्म होतें तें. त्यांनीं पदस्पर्शानें पुनीत केलेल्या एका महालांत मी उभा आहें, या भावनेनें मनाला पवित्र आणि उदात्त वाटलें.


तिथून पुढें महाराजांनींच बांधलेल्या अंबरखान्याकडे गेलों. अंबरखाना म्हणजे धान्याचीं तीन कोठारें आहेत. गंगा–यमुना–सरस्वती अशीं त्यांचीं पवित्र नांवें आहेत. पंचवीस हजार खंडी धान्य त्यात सांठवतां येतें, असें तिथलाच फलक वाचून कळलें. गडावर मोठी शिबंदी सांभाळायची आणि गडाला शत्रूचा वेढा पडला असतां उपासमार टाळायची तर एवढा भक्कम पुरवठा हवाच. आजमितीस तीं कोठारें

रितीं म्हणूनच भकास वाटतात. त्यांच्या अंतर्भागांत हल्लीं वटवाघळांनीं वसाहत केली आहे.



वाघदरवाजाच्या जवळ गेलें कीं खालीं टोपाच्या आकाराची एक मोठी घळ दिसते. तिच्यांत बकुळी, नारळी आणि जांभळी शेजारधर्म संभाळून राहिल्या आहेत. तिच्यापुढें डोळे फाटून जातील एवढा विस्तीर्ण भूप्रदेश पसरलेला दिसतो आणि त्यांत वारणा नदीचा वळणा-वांकणांनीं जाणारा निळसर पट्टा उन्हांत लकाकतो. वाघदरवाजापेक्षांही 'तीनदरवाजा' भव्य आहे. त्याच्या कमानी कोरीव आहेत. खालून वर चढतांना जी दर्शनी कमान लागते तिचा एक लहानसा टवका उडाला असून ती सिद्दीजोहारानें डागलेल्या तोफेची निशाणी असल्याचें सांगतात. तीनदरवाजाजवळच अंधारबाव आहे. तिच्यांत डोकावतांना एखाद्या खलपुरुषाच्या अंतरंगांत डोकावल्यासारखें वाटतें. नायकिणीचा सज्जा म्हणून जो एक पडका बुरूज दाखवतात तिथून गडाची दुसरी बाजू चढतांना वाटेंत एका वृक्षाच्या घनदाट छायेंत नागझरी झुळ-झुळतांना दिसते. त्यापुढें पश्चिमाभिमुख पराशराची गुहा आहे. गडाच्या दक्षिण बाजूला दुहेरी तटबंदी आहे. ती बाजू आक्रमणाला सोपी म्हणूनच हा विशेष बंदोबस्त असला पाहिजे. पन्हाळगडाचा धाकटा भाऊ पावनगड इथून अगदीं लगत दिसतो.

एका कालीं राजकीय घडामोडींचें केंद्र असलेला हा अभेद्य गिरिदुर्ग आजमितीस हौशी श्रीमंतांचें थंड हवेचें विलासस्थान बनला आहे. जिथें एका काळीं मर्द मराठे रणधुमाळी खेळले, तिथेंच आज सिनेमा-वाले तोंडाला रंग फासलेल्या नटनटींना प्रणयाची पाठशिवणी खेळायला लावून तिचें चित्रण करताना दिसतात. कालाची करणी विचित्र खरी!



ज्योतिबाचा डोंगर पन्हाळयाजवळच आहे खरा; पण पन्हाळ्याचें निसर्गवैभव त्याला लाभलेलें नाहीं. कागदोपत्रीं वाडी रत्नागिरी असें याचें नांव आहे. बारा ज्योतिर्लिंगांचीं बारा उपलिंगें आहेत त्यांतलें एक या ठिकाणीं आहे. कोल्हासुराचा संहार करण्यासाठीं महालक्ष्मी निघाली तेव्हां तिनें जमदग्नीकडून क्रोध मागून घेतला आणि कार्य झाल्यावर त्याची इथें स्थापना केली. तोच हा क्रोधमूर्ति ज्योतिबा. ग्वाल्हेरच्या शिंद्यांचें हें कुलदैवत आहे. इथलें मंदिरही त्यांनींच बांधलें आहे. चैत्री पौर्णिमेला इथें यात्रा जमते. ज्योतिबाला भजणारा फार मोठा समाज महाराष्ट्रांत आहे.

कोल्हापूरच्या वायव्येला नऊ मैलांवर हें स्थान येतें. वरच्या पठारावर एक भव्य दगडी कमान उभारलेली आहे; पण जवळपास झाडपेड नसल्यामुळें ती एखाद्या विराणीसारखी दयनीय वाटते. ज्योतिबाच्या मंदिराकडे जाण्यासाठीं या प्रवेशद्वारांतून दुसऱ्या बाजूनें थोडें खालीं

उतरावें लागतें. कोल्हापूरच्या मंदिरांत खांबांचा सुकाळ तसा इथें दीपमाळांचा. या सगळ्या ज्या रात्रीं पाजळत असतील तेव्हां आकाशांतल्या तारागणांनाही हेवा वाटावा असें दृश्य दिसत असेल. तो प्रकाश तरी कसा? खरखीत आणि अंधाराला खाऊन टाकणारा नव्हे; तर गारुडी जसा आपल्या हातांतली कांडी फिरवीत जमाव बाजूला हटवतो आणि खेळापुरेशी जागा मोकळी करून घेतो, त्याप्रमाणें हलक्या हातानें अंधाराला हटवून आपल्यासाठीं वर्तुळ बनवणारा. डोळयांना ताप देणारा नव्हे; तर स्निग्ध आणि मंद!

मंदिराच्या प्राकारांतच एक व्यवस्थितपणें बांधून काढलेला तलाव आहे. तो तिथल्या लोकवस्तीला जीवन देतो. गुरव तिथले पुजारी आणि त्यांचीच वस्ती प्रामुख्यानें तिथें आहे. स्वच्छ दगडी फरशीवरून तिथें हिंडतांना मनांत विचार आला तो हा कीं, वनश्री या देवावर रुसली कां? का या संतत क्रोधमूर्तीच्या निःश्वासांनीं ती जळून गेली? अलीकडच्या पालथाणाला यमाईनें मात्र आपली जागा छान निवडली आहे. तिचा आसमंत आमराईनें शोभवला आहे का कळकीच्या बेटांनीं शोभवला आहे त्याचा निर्णय करतां येत नाहीं. डोंगरवस्तीचीं गुरेंढोरें तिच्या आश्रयानें चरतात. तिच्याच शेजारच्या तळ्याचें स्वच्छ, शीतल जल पितात आणि दुपारच्या वेळीं गोठणीला बसून डुलक्या घेतात.

परत फिरायला थोडा उशीर होता त्याचा फायदा घेऊन मी सगळ्या बाजू हिंडलों आणि सर्व दिशा अवलोकल्या. काल पन्हाळ्यावरून मीं ज्योतिबा पाहिला होता आणि आज इथून पन्हाळा पाहिला. म्हणजे काशीची कावड रामेश्वराला आणि रामेश्वराचा सेतु काशीला असाच प्रकार झाला तो. असो.

चार दिवसांच्या कोल्हापूरच्या मुक्कामांत शक्य झालें तेवढें हिंडून अन् पाहून मीं पुढें नरसोबाच्या वाडीला जाणारी मोटार पकडली.

---

# ३. कृष्णातीरीं नरहरि

विदर्भ देशांतल्या करंज गांवांत अंबाभवानी आणि माधव यांच्या पोटीं शुभ दिवशीं एका बालकानें जन्म घेतला. जन्मतांच ‘ट्यंहां’ करायच्याऐवजीं त्यानें ओंकाराचें उच्चारण केलें. मातापित्यांनीं त्याचें नांव नरहरि ठेवलें. ज्योतिष्यांनीं ‘हा जगाचा गुरुदेव होईल’ असें त्याचें जातक वर्तविलें होतें; पण बापाला वाटलें, सात वर्षे पुरीं झालीं तरी हा ॐशिवाय अवाक्षरही तोंडांतून काढीत नाहीं; मग हा विद्वान् होणार कसा आणि विद्या नाहीं तर जगाचा गुरु होणार कसा? पण मुंजीच्या वेळीं त्याचा हा संशय फिटला. आईनें त्याला तीनदां भिक्षावळ घातली तर तीन वेदांचे मंत्र म्हणून या बटूनें तिचा स्वीकार केला. जमलेले लोक आश्चर्यचकित झाले. माउलीचा जीव तर हरखून गेला. तिनें कौतुकानें त्याला म्हटलें, ‘आतां ब्रह्मचारी झालास ना? यापुढें गुरुगृहीं राहून माधुकरी मागायची.’ तेवढी पडत्या फळाची आज्ञा त्याला पुरली. तो गृहत्याग करायला निघाला. आईला वाटलें कीं कुठली बोललें!

पण शब्द गेला होता. दीनोद्धारासाठीं अवतीर्ण झालेला तो कुमार कसल्याही विनवणीला मान देईना. मातापितरें कष्टी झालीं. पुत्रमोहांत गुरफटलीं. कुमारानें त्यांना तत्त्वज्ञान उपदेशिलें आणि त्यांचा निरोप घेतला. काशीक्षेत्रीं जाऊन कृष्णसरस्वतीस्वामींकडून चतुर्थाश्रम स्वीकारला. नंतर सगळ्या तीर्थयात्रा करून दत्ताचा–श्रीपादश्रीवल्लभांनंतरचा हा दुसरा अवतार ‘नरसिंहसरस्वती’ कृष्णातीरीं प्राप्त झाला. ज्या दोन ठिकाणीं त्यानें वास्तव्य केलें तींच दोन सुप्रसिद्ध दत्तक्षेत्रें म्हणजे औदुंबर आणि नरसोबाची वाडी.

ज्या बसनें आम्ही कोल्हापुराहून निघालों होतों ती गॅस-प्लँटवर चालणारी होती. त्या दिवशीं तिचें कांहीं तरी बिनसलें होतें आणि सासरीं जाणाऱ्या नववधूसारखी ती कूर्मगति बनली होती. त्यामुळें दोन्ही बाजूंचा परिसर संथपणें पहातां येत होता. वाटेंत जिकडे तिकडे हळदीचे मळे पसरले होते. पानमळ्यांत सभोंवतीं दाट कुंपण उभारून शेवरीच्या झाडावर चढवलेल्या पानवेली चिकाच्या पड्याआड वावरणाऱ्या राणीवशांतल्या रमणींसारख्या अर्धव्यक्त दिसत होत्या. मधूनच एक–दोन उठलेलीं गुऱ्हाळें दिसलीं. रसाचा गूळ होऊन बाजारांत बसला होता आणि काळीं थंड चुलखंडें तेवढीं तेथें उरलीं होतीं. मधेंच एका भुईमुगाच्या वावरांत दोघे वालि-सुग्रीवांचे वंशज शेपट्या पसरून समोरासमोर बसले होते आणि एकेक वेल उपटून मुळाच्या शेंगा निश्शंकपणें उकरून खात होते. आमची एवढी मोठी गाडी घरघरत शेजारून गेली; पण त्यांनीं तिची दखलसुद्धां घेतली नाहीं. जयसिंगपूर जवळ येऊं लागलें तसतशी निसर्गश्री मागें मागें राहूं लागली. तुरळक वृक्षांच्या रखरखीत माळमैदानांतून जाणारा तो रस्ता दत्तक्षेत्राकडे जात असूनही हिरमुसलेला दिसूं लागला.

जयसिंगपूर हें मिरज-कोल्हापूर लोहमार्गावरचें एक महत्त्वाचें स्टेशन आहे. पूर्वीचें शिरोळरोड होतें तें साधें होतें. पण आतांचें जयसिंगपूर प्रमाणबद्ध वसवलेलें असून रुबाबदार आहे. लांबलांबचीं क्षयरोगी माणसें हातापायांच्या काड्या घेऊन इथें उतरतात आणि कांहीं महिने मोकळ्या कोरड्या हवेचा खुराक घेतल्यावर पुनर्जन्म लाभून हसतमुखानें परत जातात. इथून वाडी फक्त नऊ मैलांवर आहे.

सकाळीं ११ वाजतां आम्ही वाडीला पोंचलों आणि तीर्थोपाध्यायांचें घर गांठलें. आतां थोड्याच वेळांत आमची दत्तदर्शनाची कामना पूर्ण होणार होती.

**“ विश्वासलों दृढ मनीं तुझिया पदासी**
**कीं वारिसील म्हणुनी मम आपदांसी**

तें दाविशील नयनीं कधिं सांग बा रे
अद्यापि कां नरहरी करुणा न ये रे "

म्हणून मी दत्ताचें करुणाष्टक कित्येकदां आळवीत होतों. पण आज त्याला करुणा आली होती. इतर असंख्य तारले तसा आणखी एक "शुद्ध दगड' त्यानें आज आपल्या पायांशीं ओढून आणला होता.

'दत्ताला नैवेद्य आणि पंचामृत करा' हें उपाध्यायांचें सोयीस्कर सांगणें आम्हीं तात्काळ मान्य केलें. प्रथम ते आम्हांला कृष्णेच्या स्नानासाठीं घेऊन गेले. त्या अरुंद दगडी बोळवंडींतून एक-दोन वळणें घेऊन आम्ही घाटावर उतरलों. हा घाट एकदम उतरता असून पायऱ्याही उंच आहेत. घाटाच्या मध्यभागीं समतळ फरसबंदीवर दत्त-पादुकांचें स्थान आहे. त्यांना उजवें घालून आम्ही प्रवाहांत उतरलों. इथला कृष्णेचा प्रवाह नेहमींच दत्त अवधूताच्या बाजूला झुकलेला असतो. घाटाच्या पायथ्याशीं दंगामस्ती करीत कृष्णा इथून खालीं वहाते. ज्याचे पाय दमदार नसतील तो या प्रवाहाच्या जोरानें लटपटल्याशिवाय राहणार नाहीं. शरदृतु संपत आल्यामुळें पाणी पलीकडच्या बाजूनें बरेंच ओसरलें होतें. वाळवंट प्रत्यहीं अधिकाधिक विस्तीर्ण होत होतें.

कमरेइतक्या पाण्यांत उभें राहून मीं बुडी मारली आणि आंग चोळतां चोळतां 'गंगालहरी' सुरू केली. प. टेंबेस्वामींनीं 'कृष्णालहरी' रचली आहे आणि तिच्यांत प्रतिभेच्या उत्कर्षानें गंगेपेक्षांही कृष्णेचें महत्त्व प्रतिपादिलें आहे हें मला वाचून ठाऊक झालें होतें. पण मला त्यांतला कंठगत होता तो एकच श्लोकार्ध—

"मुखं ते सह्याधः सदयहृदयं ते नरहरेः
पुरेऽप्यान्ध्रे नाभिः प्रपदयुगलं प्राच्यविषये "


कृष्णेची एक विशाल मूर्ति कल्पून ते तिच्या अवयवांचीं स्थानें सांगतात—' हे कृष्णे ! तुझें मुख सह्याद्रीच्या पायथ्याशीं वाईक्षेत्रांत आहे. तुझें हृदय नरसोबाच्या वाडीला आहे. आंध्रप्रदेशांत कुरुगड्डी येथें तुझी नाभि आहे आणि भरतखंडाच्या पूर्वभागांत तुझें पदयुग्म आहे.'

सागराशीं दोन ओघांनीं तिची मिळणी होते यावरून कवीला ही दोन चरणांची कल्पना सुचली आहे. अशा अनेक ललितोदात्त कल्पना त्या गीर्वाणखंडकाव्यांत विखुरल्या आहेत. त्या वाचून आठशें मैल लांबीच्या कृष्णेपुढें माथा नमवावा का त्याहूनहि पल्लेदार अशा टेंबेस्वामींच्या कविप्रतिभेपुढें नम्र व्हावें याचाच रसिकाला संभ्रम पडेल.

कृष्णा ही हिंदुस्थानांतल्या महानद्यांपैकीं एक आहे. गंगेप्रमाणेंच तिचाहि तटप्रांत समृद्ध आहे. महाबळेश्वराच्या कडेकपारींत तिचा उगम होतो. कऱ्हाडला तिला कोयना उराउरीं भेटते. सांगलीजवळ वारणा, कुरुंदवाडला पंचगंगा, विजापूर जिल्ह्यांत मलप्रभा-घटप्रभा, रायचूरजवळ तुंगभद्रा आणि नळगोंडा जिल्ह्यांत मुसी अशा सतसरिता मार्गांत तिच्याशीं एकजीव होतात आणि

**'संगच्छध्वं संवदध्वं संवो मनांसि जानताम्'**

अशा वृत्तीनें धो धो वहात पूर्वसागराला मिळतात.



स्नान करून धूत वस्त्र नेसून मी मंदिराच्या प्रवेशद्वारांत पादुकांसन्मुख बसलों. उपाध्यांनीं आमची म्हणून आणलेली पंचामृताची 'आइती' पुजाऱ्याच्या हातीं दिली. देवस्थानच्या घरच्या पंचामृतांत आमचींही पंचामृतें मिसळलीं. पुजाऱ्यानें कांहीं पिकलेलीं

केळीं त्यांत मुरडून त्या सगळ्या मिश्रणाचा पादुकांवर लेप दिला. नंतर तो काढून पादुकांना हांडाभर उष्णोदकाचें स्नान घातलें. पादुका स्वच्छ स्वच्छ झाल्या. त्यांचा स्वाभाविक कृष्णवर्ण तकाकूं लागला. जेमतेम एका माणसाला वाकून, अंगाचा संकोच करून आंत जातां येईल, एवढाच तो गाभारा आहे. पुजारी त्याच पद्धतीनें आंत गेला आणि कोरडें वस्त्र घेऊन त्यानें पादुकांसह ती सगळी शिळा पुसून टिपून काढली. बारक्या करवंदाएवढ्या गंधाच्या गोळ्या करून त्यानें पादुकांवर प्रत्येक अंगुलीच्या जागीं एकेक अशा ठेवल्या. हिरवीं तुळसी-दळें आणि तांबडीं, पांढरीं फुलें यांची त्यांवर कलापूर्ण विरचना केली. वाडीच्या पादुकांना ‘ मनोहर पादुका ’ अशी संज्ञा आहे तिची सत्यता त्या क्षणीं मला पटली. वाटलें कीं, सरळ आंत शिरावें आणि त्यांवर ललाट घांसावें. पण कायदा आड आला. पुजाऱ्याशिवाय अन्य कोणीहि पादुकांना स्पर्श करायचा नाहीं अथवा पाणीही घालायचें नाहीं असा अलीकडे तिथें निर्बंध झालेला आहे.

एवढ्या अवधींत माझ्या आंवतींभोंवतीं बरेच भक्तगण जमा झाले होते. कांहीं समोर ठाण मांडून बसले होते तर कांहीं करसंपुट जोडून आणि डोळ्यांचीं कमळें फुलवून उभे होते. प्रत्येक उपचार-समर्पणाच्या वेळीं ‘ श्रीगुरुदेव दत्त ’ असा भक्तिगद्गद नामघोष होई तो श्रवणांना सुख देत होता. पूजा समाप्त झाल्यावर माझ्याबरोबरच किती तरी हात प्रसादासाठीं पुढें झाले. प्रदक्षिणा करणारे सेवेकरी-सुद्धां त्याचसाठीं थांबून गर्दींत घुसले.

दत्तमंदिर म्हटलें कीं क्षेत्रमाहात्म्य ऐकून आपल्या कल्पनाचक्षूंपुढें एका भव्य देवालयाचा आकार उभा रहातो. पण प्रत्यक्ष पहायला जावें तर तिथें एक लहानशी ओवरी आणि तिच्यामागें सामान्यसें औदुंबराचें झाड. पण दत्तराज योग्याला एवढें बस्स आहे ! हवींत कशाला तीं विशाल मंदिरें आणि तीं हंड्या-झुंबरें !

तिथून वर येऊन उभें राहिलें कीं घाटावरची गर्दी, पुढें कृष्णेचा पावन प्रवाह, त्यापलीकडे विस्तीर्ण वाळवंट, त्याच्यामागें मळ्या आणि

त्याहीपलीकडे झाडींत लपलेलें औरवाड हें गांव ; एवढें विशाल दर्शन होतें. औरवाड हें यवनबादशहानें इथल्या देवस्थानाला समर्पिलेलें गांव आहे. याचें पूर्वीचें नांव अमरापूर. इथें अमरेश्वराचें प्राचीन देवालय असून टेंबेस्वामींचे शिष्य दीक्षितस्वामी यांनीं अलीकडे त्याचा जीर्णोद्धार केला आहे.

पादुकांच्या वरच्या बाजूला हारीनें कांहीं सत्पुरुषांच्या समाधि आहेत. यात्रेकरू आंत जातात, नमस्कार करतात आणि बाहेर येतात. प्रवेशद्वारावरचें त्या सत्पुरुषाचें नांव वाचणारे थोडेच आणि त्यांच्याविषयीं जिज्ञासा दाखवणारे तर अगदींच विरळा ! पण ते महाभाग यति-मुनि, असे उपेक्षणीय नाहींत. तिथले जाणते लोक एकेकाचें जीवनचरित्र कथन करतात तें ऐकलें कीं त्यांच्या साधनेची आणि सिद्धीची माहिती मिळते आणि भक्तिभाव दुणावतो. ती कृष्णामैय्याच तीर्थ नाहीं, त्या पापतापहर पादुकाच तीर्थरूप नाहींत ; तर तपांचे निधि आणि योगाचे सागर अशा या महापुरुषांनींहि वाडीच्या क्षेत्राला तीर्थरूपता दिली आहे.

पं. जनार्दनशास्त्री दीक्षित यांची माझी ओळख झाली आणि एकंदर वाडीचें माहात्म्य मीं त्यांना पुसलें. मी नामधारक आणि ते सिद्ध अशी आमची जोडी बनली. ते मला एका समाधिमंदिरांत घेऊन गेले आणि म्हणाले,

" हे रामचंद्रयोगी. कुठले कोण तें न कळे ! महान् योगिराज ! पुढें दत्तात्रेयाचे अवतार श्रीनरसिंहसरस्वती या स्थानीं वास्तव्य करायला येणार हें योगसामर्थ्यानें आधींच जाणून इथें या अश्वत्थातळीं येऊन बसले. एका सिद्ध योग्यानें दुसऱ्या सिद्ध यतीला इथें 'स्वागतम्' म्हटलें. कांहीं काल स्वामींची सेवा केली. त्यांच्या समागमें अध्यात्मरसाची 'गुरुगोडी' घेतली आणि काळाचीं पावलें आपल्याकडे वळलेलीं दिसतांच ज्ञानेश्वरांच्यासारखी सजीव समाधि घेऊन काळावर मात केली. ज्येष्ठ वद्य चतुर्दशी हा त्या समाधीचा दिवस. ज्या वेळीं कृष्णेला पूर येऊन पादुका जलमग्न होतात त्या वेळीं नेमाचे सेवेकरी या रामचंद्रयोग्यांची सेवा करून आपला नेम पुरा करतात, येवढा यांचा अधिकार आहे.

ही दुसरी समाधि नारायणस्वामींची. हे तासगांवजवळच्या विसापूर गांवचे गार्ग्यगोत्री ब्राह्मण. यांच्या घरांत अग्निहोत्र होतें. पत्नीच्या अकालीं निधनामुळें तें समाप्त झालें. लगेच दोन मुलींना घेऊन हे तीर्थयात्रेसाठीं बाहेर पडले. प्रपंचउपाधि संपल्यामुळें त्यांना आतां परमार्थाची ओढ लागली होती. ईश्वरसाक्षात्कारासाठीं जीव तळमळत होता. त्याच निदिध्यासांत यांचें भ्रमण चाललें होतें. अखेर एक दिवस यांना इथें येण्याचा दृष्टांत झाला. इथें येऊन यांनीं पादुकांची सेवा सुरू केली. अंतरींच्या दृढ निष्ठेनें हे दत्तमहाराजांना प्रिय झाले. चतुर्थाश्रम घ्यावा असें मनानें घेतांच एका रात्रीं साक्षात् महाराजांनीं प्रगट होऊन यांना संन्यासदीक्षा दिली. तुकोबारायांप्रमाणें यांनीं सदेह वैकुंठगमन केल्याचें सांगतात. परलोकाच्या प्रस्थानापूर्वीं महाराजांनीं त्यांना वरप्रसाद दिला, 'आजपासून माझ्या पूजेच्या आधीं तुझी पूजा होईल!' अजूनही हा नेम चालतो. पुजारी प्रथम नारायणस्वामींच्या पादुकांवर पाणी घालून मगच खालीं श्रींच्या पूजेला येतो. अगोदर शेजारती इथें आणि मग खालीं.

आतां या मौनीस्वामींच्या समाधीचें दर्शन घ्या. या महाभागानें अखंड एक तपपर्यंत अनवाणी पायांनीं काशी–रामेश्वर यात्रा केल्या. पुढें वाडीस आले ते बारा वर्षें 'महामौन्य' धरून राहिले, म्हणून यांना लोक मौनीस्वामी म्हणूं लागले. इथल्या वे. रामभाऊ कवीश्वर यांच्याकरवीं शके १८१३ या वर्षीं एक मोठा यज्ञ केला. किती तरी दिवस तें यजनकर्म चाललें होतें. देशोदेशींचे अग्निहोत्री आणि शास्त्री–पंडित यांची सभा दाटली होती. दक्षिणेंतले बहुतेक राजेरजवाडे उपस्थित झाले होते. कोल्हापूर इलाख्यांतलें सगळें दूध बारा वाटांनीं इथें येत होतें. अग्नीपुढचा निर्माल्याचा ढीग काढला तर त्यांतून पांच हजार रुपये निघाले. यावरून यज्ञाला द्रव्य किती मिळालें असेल त्याची कल्पना करा. अवभृथस्नानासाठीं जातांना मौनीस्वामींची हत्तीवरून मिरवणूक काढण्यांत आली. शुक्लतीर्थापासून कुरुंदवाडच्या घाटापर्यंत माणसांची नुसती खेच झाली होती. यजमानाचें स्नान होतांच हत्तीवरचा ध्वज आडवा करण्यांत आला आणि त्या संकेतासरशीं हजारों मस्तकें कृष्णेच्या प्रवाहांत बुडून

निघालीं अशी कीर्ति आहे या मौनीस्वामींची. ही आणखी एक समाधि प. टेंबेस्वामींची. दत्तभक्तांच्या मालिकेंत टेंबेस्वामींचें स्थान असाधारण आहे. त्यांचें चरित्र अनेक यौगिक चमत्कारांनीं भरलेलें आहे."

ज्या घाटावर श्रींच्या पादुका आहेत, तो जनार्दनस्वामींच्या आज्ञेवरून एकनाथमहाराजांनीं बांधला आहे. श्रींच्या स्थानापासून खालीं थोड्याच अंतरावर पांच बहिणी मिळूनजुळून आपल्याला भेटायला येणार म्हणूनच जणुं कृष्णेला इथें घाई झालेली दिसते. दत्त-दिगंबराच्या कृपेचें उपायन घेऊन ती बहिणींचें आतिथ्य करायला धांवते. अनसूया आणि प्रियंवदा या दोन सख्या एका दिलानें जसें शकुंतलेचें, सुख वाढवीत होत्या, तसेंच या ठिकाणीं या पंच सरितांनीं आत्मभाव समर्पून कृष्णेचें जीवन समृद्ध केलें आहे. संगम म्हणजे दोन प्रवाहांचें एकीकरण. संगम म्हणजे एकरूपताच नव्हे; तर एकरसताही. जिवाशिवाचें सामरस्य साधूं पाहणाऱ्या आणि तें साध्य केलेल्या महात्म्यांना, असलें स्थान न आवडलें तरच नवल! नरसिंहसरस्वती येथें बारा वर्षें राहिले. चौसष्ट योगिनी गुप्त रूपानें प्रवाहाखालच्या आपल्या मंदिरांत नेऊन त्यांना भोजन घालीत होत्या. योगिनींना श्रींची परमभक्ति होती. इथून गाणगापुरीं जातांना त्यांच्या आग्रहासाठींच नरसिंहसरस्वतींनीं वाळूच्या पादुका करून इथें स्थापिल्या आणि बहिरंभटाची त्याच्या पूजेअर्चेसाठीं नेमणूक केली. हा बहिरंभट म्हणजे आलास नांवाच्या तीन कोसांवरच्या एका गांवचा भारद्वाजगोत्री ब्राह्मण. वाडीच्या सगळ्या पुजाऱ्यांचा मूळपुरुष हाच.

चातुर्मास्य सोडून दर शनिवारीं इथें श्रींची पालखी निघते. गाणगापुरीं गुरुवाराचें महत्त्व आहे. सहस्रार्जुनाला गुरुवारीं आणि जनार्दनस्वामींना शनिवारीं दत्ताचा उपदेश झाला म्हणून हे दोन वार दत्त-संप्रदायांत महत्त्वाचे ठरले आहेत. वाडीला नेहमींच यात्रा असते. भवतापतप्त जीव अंतरांत अनेक कामना धरून इथें येतात. पिशाच्च-बाधा झालेल्या दुर्दैवी प्राण्यांना त्या जाचांतून सोडविण्यासाठीं बहुधा इथेंच आणण्यांत येतें. संध्याकाळीं आरतीच्या वेळीं धूपाचा वास दरवळला कीं झडपणी झालेल्या माणसांच्या अंगांत वारें भरतें. कोणी

घुमूं लागतात, कोणी खांब पकडतात, तर कोणी "सोडव रे, सोडव रे" अशा आर्त हांका फोडतात. तें अंग घुसळणें, तें दांत-ओठ खाणें, ते कर्कश चीत्कार, असले त्यांचे चाळे सुरू झाले कीं हरणाचें काळीज असलेल्या प्रेक्षकांच्या अंगावर भयाचा कांटाच उभा राहतो. खऱ्या-खोट्याची शहानिशा करायला आलेल्या कित्येक संशोधकांचेंही अशा वेळीं काळीज धडधडतांना ऐकूं येतें. आपापलें पकडलेलें 'झाड' सोडून कित्येक भुतें इथें कृष्णाप्रवाहांत मुक्ति घेतात आणि त्या त्या व्यक्ति पुनश्च 'माणसांत' येऊन संसाराला लागतात, असे अनुभव किती म्हणून सांगावे !

साधकांना गोळाभर अन्न सुखेनैव मिळावें, म्हणून कित्येक संस्थानिकांनीं इथें अन्नछत्रें ठेवलेलीं होतीं. पण आज त्यांचीच स्थिति पालटल्यामुळें हें अन्नदान आजमितीस बंद झालें आहे. जी स्थिति वाडीची तीच औदुंबरची.

नरसोबाच्यावाडीला जाणाऱ्या यात्रेकरूनें त्याच प्रवासांत औदुंबरही साधून घ्यावें. कारण हीं दोन्ही क्षेत्रें एकाच महापुरुषाचीं वास्तव्यस्थानें असून दोन्ही सामान्यपणें जवळजवळ आहेत. वाडीहून निघून जयसिंगपूरला गाडी पकडावी आणि भिलवडी स्टेशनला सोडावी. तिथून चार मैलांवर औदुंबर आहे. भिलवडीला आम्ही उतरलों, ती वेळ सूर्यास्ताच्या आधींची होती.

आम्ही दरदाम ठरवून टांग्यांत चढलों. टांगेवाला चाबूक हालवीत एक एक उतारू आणून भरूं लागला. मीं मोजायला सुरवात केली. सहा... सात... आठ! कोणाला खरें वाटायचें नाहीं, पण त्यानें नऊ माणसें टांग्यांत कोंबलीं. यांत मूल एकही नव्हतें. आणि एवढा अतिरिक्त भार ओढीत टांगेवाल्याचा तो श्यामकर्ण औदुंबराच्या रस्त्याला लागला. टप्... टप्... टप्......! आजही मला या गोष्टीचें आश्चर्य वाटतें. ठराविक आकाराच्या त्या वाहनांत आम्ही नऊ माणसें बसलों कशीं? योगमार्गांतली एवढी 'अणिमा' सिद्धि आम्हांला कुठून प्राप्त झाली? त्या टांग्याची धाव

मोडली नाहीं कशी ? तो घोडा शाबूत राहिला कसा ? आणि आम्ही सगळे हातपाय 'धड' घेऊन मुक्कामाला पोंचलों कसे ?

रक्तवस्त्र पांघरलेला पश्चिम आकाशांतला तो तेजोगोल क्षणाक्षणाला अधिकाधिक सौम्य होत खालीं खालीं जात होता. जणुं कसल्या तरी अनामिक भयानें त्याचें बिंब थरथरतांना दिसत होतें. आमच्या हृदयाचीही अवस्था तीच होती. कृष्णेच्या पात्रांतल्या फरशीवरून अंधार पडायच्या आंत आम्हांला परतीर गांठायचें होतें. तशाही परिस्थितींत जिवाची तमा न बाळगतां आम्ही टांगेवाल्याला आळवीत होतों, "बाबा रे, जरा जलदी कर."

त्यावर टांगेवाल्यानें आम्हांला एखाद्या महामंत्र्याच्या रुबाबांत गंभीर आश्वासन दिलें—


"तुम्ही राव काळजी करूं नका. मी वेळेवर तुम्हांला पोंचवितों. तुम्हीं जर माझ्याशीं भाड्यासाठीं घासाघीस केली असती तर माझाहि घोडा आंखडला असता. अहो, द्यावं तसं घ्यावं !"

"खरं आहे बाबा तुझं म्हणणं !" आम्हीं एकमुखानें त्याला पाठिंबा दिला. आम्ही गमतीगमतीनें त्याच्याशीं बोलत होतों अन् तोहि तितक्याच अभिनिवेशानें त्याची परतफेड करीत होता. पोटाचा पुजारी असूनहि त्याची मान ताठ होती. कदाचित् तो स्वाभिमानी असावा. कदाचित् आमच्या अगतिकपणाचा फायदाहि घेत असावा. कोण सांगणार ? पण कसेंहि असलें तरी त्यानें 'सहोक्ति' अलंकार साधला एवढें खरें. सूर्य क्षितिजाखालीं उतरायला आणि आम्ही टांग्यांतून उतरायला एक गांठ पडली. अवघडलेले हातपाय झाडून झटकून आम्हीं कार्यक्षम केले आणि नदीच्या उताराला लागलों.

पात्रांतली ती फरशी दोन-अडीच हात रुंद असावी. तिच्यावर शेवाळ दाटलें होतें अन् गुडघ्याच्या वर पाणी होतें. खालच्या खळाळावर पश्चिम आकाशाचा रक्तपीत सांध्य रंग हळुवारपणें पसरला होता. उजवी बाजू श्यामगंभीर दिसत होती. आमच्यामध्यें जे सडे होते ते सुलभपणें

तरून गेले. जे परिग्रही होते त्यांना पुनश्च ‘ पाणिग्रहण ’ करावें लागलें. लग्नांतली सप्तपदी भूमीवर गृह्याग्नीच्या भोंवतीं तर ही शतपदी खळखळत्या जोरकस जलधारेमधून. सप्तपदीच्या वेळचे रोमांच अनाघ्रात सुखाचे तर या वेळचे रोमांच सूक्ष्म भयानें आणि ऐन थंडींतल्या शीतस्पर्शानें उठलेले. कांहींही असलें तरी माझ्या सोबत्यांनीं आपापली ‘ जबाबदारी ’ अक्षरशः पार पाडली हें खरें. आम्ही सगळीं सुखरूप पैलपार झाल्यावर कोणीं तरी विनोदानें म्हटलें, ‘ सगळीं माणसें मोजून घ्या एकदां. ’

देवाच्या पायांशीं पोंचायला अजून अर्धा मैल वाट चालायची होती. आणि तीही शेतामधली कांट्याकुट्यांची. आम्ही प्रवासी तर असे बहाद्दर कीं, एकाच्याही खिशांत विद्युद्दीपिका नव्हती. आगपेटी असती तरीहि बुडत्याला ‘ काडीचा आधार ’ झाला असता. अंबा, दुला, नितत्नी,



वगैरे सप्तकृत्तिकांचा पुंज क्षितिजावर आला होता. ती चंद्राची नाजूक नार रोहिणीही त्यांच्या वरच्या भागाला झळकत होती. पण तो लुकलुकता प्रकाश आम्हांला मार्ग दाखवूं शकत नव्हता. ‘ अन्धेनैव

नीयमाना यथान्धाः' तसे आम्ही पुढच्याचा पालव धरून एकेक पाऊल टाकीत एकदांचे कवि सुधांशूंच्या दारीं अकल्पित अतिथि झालों. खऱ्या कवीच्या विशद अंतःकरणानें त्यांनीं आमचें स्वागत केलें. दत्तमंदिराच्या वरच्याच बाजूला त्यांचें घर आहे.

हातपाय धुऊन आम्ही दर्शनासाठीं खालीं उतरलों तों शनिवारची पालखी नुकतीच निघाली होती आणि पहिल्या टप्प्याचें पद सुरू झालें होतें—

**"धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची,**
**झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची."**

वाडीच्या मानानें इथें यात्रा कमी असते. अर्थात् थाटमाटही कमीच. पालखीबरोबर नित्याचे सेवेकरी आणि इतर मिळून जेमतेम वीसपंचवीस माणसें होतीं. आम्हीं पांचसहा माणसांची त्या संख्येंत अधिक भर घातली. पण वाडीपेक्षां इथें कांहीं निराळाच परिणाम मनावर होतो असें माझ्या अनुभवास आलें. पालखीच्या मागोमाग आम्हीही प्रदक्षिणा करूं लागलों. दाटलेल्या अंधारांत आणि वृक्षांच्या परिवारांत ती शुभ्र मेघडंबरी, दत्तपादुका हृदयांत सांठवून बसली होती. शंकराचें ध्यान लावून हिमाचलावर अहोरात्र तपःसंचय करणाऱ्या गौरीसारखी मला तीं वाटली. आणि तें वरचें निळें स्वच्छ आकाश! त्या लहानशा घुमटींत मला फक्त दत्ताच्या पादुकाच दिसत होत्या तर गगनांगणांत त्रैमूर्तींच्या जन्माचें समग्र आख्यान मांडलेलें दिसत होतें. उत्तरेला सारथिपुंजांतला ब्रह्महृदयाचा तो ठळक तारा म्हणजे श्रीविष्णु. त्याच्या पदकमलापासून निघालेली, आणि कृत्तिकापुंजाच्या रेषेंत ब्रह्महृदयाच्या दक्षिणेस असलेल्या अग्नीलाच जर रुद्र मानलें तर त्याच्या जटेंतून खालीं कोसळणारी ती स्वर्धुनी म्हणजे आकाशगंगा. तो जवळच रोहिणी नक्षत्राचा अधिपति म्हणून उल्लेखलेला ब्रह्मा. असे हे ब्रह्मा–विष्णु–महेश आपापल्या स्थानीं विराजमान होते.

पण पुढें काय झालें? एक दिवस स्त्रीहट्टापुढें निरुपाय होऊन अनसूयेच्या सत्त्वहरणासाठीं त्यांना अत्रीच्या आश्रमांत जावें लागलें. पण झाला प्रकार

उलटा. त्या महासतीचें सामर्थ्य त्यांच्याहून आगळें ठरलें. तिनें त्यांना अर्भकें बनवलीं आणि त्यांचा पाळणा लोंचवला. चार पायांचें लंबचौकोन मृगनक्षत्र जर पाळण्याच्या जागीं कल्पिलें तर त्याच्या मधला इषुत्रिकांड हीं तीन गोजिरीं बालकें शेजारीं शेजारीं आंत पहुडलीं आहेत असें म्हणायला हरकत कोणती? दुसऱ्या प्रकारानें बोलायचें तर जीव हा अविद्येच्या घोंगडींत गुरफटलेला आणि ईश्वर हा मायेची शाल पांघरलेला असतो. दत्तोपासनेंत घनिष्ठ संबंधानें असलेली त्रिपुरसुंदरी ही मायाच आहे. मृगाच्या ठिकाणीं जर तिची कल्पना केली तर आंतला इषुत्रिकांड म्हणजेच मायोपाधिक 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ति' दत्त म्हणावें लागेल. दत्ताच्या



चित्रांत नेहमीं आढळणारीं कुत्रींही तिथें आहेतच. एक लुब्धक मंडळाची श्वानाकृति आणि दुसरा प्रश्वा. हा सगळा देखावा दक्षिण भागांत चकाकत होता. मार्गशीर्ष पौर्णिमेचा प्रदोष हा दत्तजन्माचा काल आहे. त्या दिवशीं सूर्यास्ताला दत्तजन्माचा गुलाल उधळत असतां वर मृगाचा पाळणा आंतल्या तीन बाळांसह पूर्व क्षितिजावर झुलूं लागतो.

सकाळीं थंडीनें हातपाय कांकडत होते, तरीही घाटावर जाऊन कृष्णेंत बुडी मारल्यावर एक नवी ऊब गात्रांत संचरली. जे पोहणार होते त्यांनीं चार हात मारून त्या अथांग निळ्या डोहाचा बहुमान केला.

बाकीचे पिशवींत आणलेल्या शेंगा माशांना टाकूं लागले. त्या मटकावण्या-साठीं माशांची ही झुंबड उडाली. मासे भले लठ्ठ होते. त्यांच्या दुहेरी अग्रांच्या शेपट्या पाण्यांत लवलवत होत्या. त्यांतला एखादा जवान गडी अंगाचें धनुष्य करून आणि किंचित् जलपृष्ठावर उसळी घेऊन जेव्हां खालीं मुसंडी मारी तेव्हां तर त्याच्या त्या कसरतीचें कौतुक करावें तेवढें थोडें असें वाटे. त्या थव्यांत श्रीहरीच्या मकरकुंडलांना शोभतील अशा मध्यम आकाराच्या मासोळ्याही चुळबुळ करीत होत्या. इथल्या परिसरांत कोणीही माशासाठीं गळ टाकायचा नाहीं असा दंडक आहे.

त्या मत्स्यक्रीडेवर खिळलेली दृष्टि निग्रहानें बाजूला घेऊन मीं कृष्णे-च्या पात्रांत दूरवर फिरविली. केवढा विस्तीर्ण तो डोह! पाणी जणुं हालतच नव्हतें; खालीं वहातच नव्हतें. एकच कृष्णा; पण नरसोबा-च्या वाडीला ती आपला अवखळपणा दाखविते तर इथें संकल्प-विक-ल्पांचा उपशम होऊन शांतीनें वरलेल्या स्थितप्रज्ञाची अवस्था दाखवते. वरून सूर्यताप होतो म्हणून ती कढत नाहीं. आंत मोठमोठाल्या सुसरी वावरतात म्हणून ती उबगत नाहीं. आपल्या परिसरांतल्या मळ्या महामूर पिकतात म्हणून ती उपकार सांगत नाहीं आणि वर्षाकालांत महापुरामुळें श्रींच्या पादुका बुडतात आणि मागाहून तिथें चिखलाचा डोंगर सांचतो म्हणून ती खंत करीत नाहीं.

घाटावरून मंदिराकडे येत असतांना कवि सुधांशूंनीं चार ओळींत त्या परिसराचें वर्णन ऐकवलें.

**"खालुनी वाहते करुणा परमेशाची**
**अन् तीरावरतीं वसली माय जगाची**
**वटवृक्ष त्यावरी सोडून जटा भूमीस**
**प्राचीन वसे जणुं मूर्ती योगीशाची"**

सुस्नात होऊन दत्ताला प्रदक्षिणा घालतांना सभोंवतींच्या ओवऱ्यांत एक-दोघे अनुष्ठानी गुरुचरित्राचें पारायण करतांना दिसले. 'पोटापुरतें' मागून एकांतस्थळीं देवतेच्या सान्निध्यांत साधना करणाऱ्या व्यक्तीं-बद्दल मला नेहमींच आदर वाटतो. तप करावें, निग्रहाच्या बळाबरोबरच

ईश्वराचें अधिष्ठान मिळवावें आणि मग 'सर्वभूतहिते रत' होऊन कार्यक्षेत्रांत उतरावें हा आमच्या आर्यसंस्कृतीचा एक आगळा विशेष आहे. विधात्याला चारी खाणी आणि चौऱ्यायशीं लक्ष योनि यांचें सृजन करण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून त्याच्या जनकानें 'तप तप' हा उद्गार त्या शून्याच्या गाभाऱ्यांत घुमवला होता त्याचें तरी तात्पर्य हेंच. दत्तात्रेयाचे एकेक शिष्य हे साधनेचे सह्य-विंध्य होते. तो कार्तवीर्य सहस्रार्जुन गुरुकृपेसाठीं देहाची आटणी करीत बसला होता. भार्गव परशुरामहि तसाच. मदालसेचा पुत्र अलर्क यानें मातापुरीं दत्तात्रेयाच्या पायीं स्वतःचें शिरकमल वाहिलें होतें. सव्वा लाख 'गीतार्णव' ग्रंथ बुटेदरडीच्या गुहेंत बसून रचणाऱ्या दासोपंतांनीं प्रथम बारा वर्षें सह्याद्रीवर आणि नंतर बारा वर्षें गोदाकांठीं उग्र तप आचरलें होतें. जनार्दनस्वामी देवगडावर जी साधना करीत तीही याच तोलाची होती. या सर्व निष्ठावंत भक्तांवर गुरुकृपा वरसली होती. संगमावर पुरश्चरण करीत असतांना दत्तात्रेय रामदासस्वामींच्या पुढेंही प्रगट झाले होते. त्यांनीं त्यांना अपूर्व योगसिद्धि दिली होती. 'समर्थ' हें त्यांचें सांकेतिक नांव दत्तदिगंबरानेंच ठेवलें, हें स्मरणांत ठेवण्यासारखें आहे.

दत्तसंप्रदाय पुरातन आहे. अवतारमालिकेंत दत्ताला कुठें चौथें कुठें सहावें, तर कुठें सातवें स्थान मिळालें आहे. पुराणें, भारत-भागवत आणि उपनिषदें यांत दत्तसंप्रदायाचे उल्लेख आढळतात. या संप्रदायांतले लोक राम–कृष्णांपेक्षांही दत्तावतार विशिष्ट असल्याचें सांगतात. राम–कृष्ण हे जगरहाटीप्रमाणें मातेच्या उदरांतून जन्मलेले तर दत्त अयोनिसंभव. राम–कृष्णांना धर्मसंस्थापनेसाठीं शस्त्रबळाचा आश्रय करावा लागला तर दत्तानें योग आणि ज्ञान या त्याहून वरच्या साधनांनीं तेंच कार्य साधलें. राम-कृष्ण हे एकट्या वैकुंठपतीचीं रूपें तर दत्त-महाराजांत ब्रह्मा-विष्णु-महेश हे तिन्ही देव एकवटले आहेत. शिवाय दत्त सदा अवधूत. सदा आनंदमग्न.

सोंवळ्या-ओंवळ्याच्या बाबतींत दत्तसंप्रदाय कडक असला तरी तो प्रपंचाला पराङ्मुख करणारा नाहीं. बहुतेक प्राचीन दत्तभक्त रजोगुणी

क्षात्रवृत्तीचेंच आढळतील. दत्तात्रेयानें निरनिराळ्या भक्तांना केलेल्या उपदेशाचें सार पाहिलें तर त्यांत त्याला लोकोपकारार्थ कर्मयोगच अभिप्रेत दिसतो. तो वर्णाश्रमधर्माचा असीम पुरस्कर्ता आहे आणि वर्णाश्रम म्हटलें कीं त्यांत सगळा संसार आलाच. तात्पर्य, दत्तोपासना हें मोक्षाइतकेंच अभ्युदयाचेंही साधन आहे.

दत्तसंप्रदाय प्राचीन असला तरी महाराष्ट्रांत तो सुपरिचित आणि सुप्रतिष्ठित झाला तो नरसिंहसरस्वतींच्यामुळें. शालिवाहन शकाच्या १४ व्या शतकाच्या मध्यभागीं त्यांचा अवतार झाला. त्या वेळीं उभा महाराष्ट्र यवनी सत्तेच्या टांचेखालीं होता. हिंदु जनता अतित्रस्त झाली होती. पोटीं भय बाळगून सगळे लोक जीवन कंठीत होते. कोणी आपंगिता नाहीं, कोणी पुसता नाहीं, अशी सर्वत्र अशरणता आली होती. साहजिकपणेंच देवाधर्मावरचा विश्वास डळमळला होता. अशा दुर्धर लोकस्थितींत त्यांनीं अवतरून पीडित प्रजेला धीर दिला. आपल्या योगसामर्थ्याचा अनेक प्रसंगीं साक्षात्कार दाखवला. असंख्य लोकांना दुःखमुक्त केलें. स्त्री–पुरुषांना सोज्ज्वळ आचारधर्म उपदेशिला. हिंदूंवर तशीच अहिंदूंवरही आपल्या तपोबलाची छाप पाडली. आपल्या पायाच्या फोडाचें असाध्य दुखणें बरें करण्यासाठीं खुद्द बेदरचा बादशहा अल्लाउद्दिन बहामनी नरसिंह सरस्वतींच्या पायांशीं आला होता आणि रोगमुक्तही झाला होता.

शके १३८० या वर्षीं नरसिंहसरस्वतींची अवतारसमाप्ति झाली. त्यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं ५२ अध्यायांचा गुरुचरित्र हा ग्रंथ सरस्वती गंगाधरानें रचला. दत्तभक्तीची प्रतिष्ठा 'याच एका ग्रंथानें वाढविली. दत्तभक्तांच्या घरीं हा ग्रंथ कपाटांत न राहतां देवघरांत बसतो. भागवत ग्रंथाच्या सप्ताहांपेक्षांही गुरुचरित्राचे सप्ताह अधिक होतात.

औदुंबराच्या छायेंतून मी मंदिरप्रदक्षिणा करीत होतों. लहानमोठे अनेक औदुंबर या क्षेत्राचें नांव सार्थ करतात. दत्ताला औदुंबर प्रिय आहे. वटपिप्पलाप्रमाणेंच औदुंबरही पावन वृक्ष आहे. ऐतरेय ब्राह्मणांत याच्या फळांना ' मधु ' म्हटलें आहे. क्षत्रिय कुमाराला उप-

नयनांत औदुंबराचाच दंड दिला जातो. यज्ञप्रसंगीं यूप उभारीत तो याचाच. ‘ दर्वी ’ही याच्याच लांकडाची असे. औदुंबर हा याज्ञिकांत सर्व ओषधींचा प्रतिनिधि होऊं शकतो. इष्ट वृक्षाच्या समिधा मिळूं शकल्या नाहींत तर ‘ तदभावें ’ औदुंबराच्याच वापरतात.

वरच्या भागाला एक ‘ आजोबा ’ वड आहे. त्याच्यावर आम्ही गेलों त्या दिवशीं शुकगणांची महापरिषद भरली होती. हिरव्या पर्ण-संभारांत त्यांच्या रक्तचंचू मनोज्ञ रंगसंगति दाखवीत होत्या. त्यांची फडफड सुरू होती त्या अर्थी परिषदेचा अध्यक्ष अजून यायचा असावा. त्या वडाच्या खालून जाणाऱ्या वाटेनें आम्ही ब्रह्मानंदांच्या मठाकडे गेलों. हठयोगाचे आचार्य असलेले हे स्वामी १८२५ सालीं गिरनार पर्वतावरून इथें आले होते. इथेंच त्यांनीं समाधि घेतली. मठस्थान शांत आहे, प्रसन्न आहे आणि पावनही आहे. त्याच्याचसमोर कृष्णेच्या पात्रांत सिद्धमठ नांवाचा आणखी एक मठ आहे. पण उन्हाळ्यांतसुद्धां त्याच्यावर गुढघाभर पाणी असतें. यावरून असें अनुमान करतां येतें कीं, पूर्वी तो मठ तीरावर असावा आणि नदीचा प्रवाह दत्ताच्या चरणांजवळ सरकल्यामुळें त्या मठाला जलसमाधि मिळाली असावी. ‘ पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम् ’ असें जें भवभूति म्हणतो तें निसर्गाच्या अशा उलथापालथी पाहूनच. औदुंबर ही अंकलखोप या गांवची वाडी आहे. मुख्यत्वें देवपूजकांचीच इथें वस्ती आहे.

दुपारीं भोजन उरकून आम्ही भुवनेश्वरीच्या दर्शनाला जाण्यासाठीं तरींत बसलों. नाव सुसाट निघून पैलतीराला थडकली. भुवनेश्वरीचें स्थान औदुंबराच्या पूर्वेस आहे. जुनाट देऊळ, एका गुरव पुजाऱ्याशिवाय मनुष्यवस्तीचा अभाव आणि झाडाझुडपांचें नांवसुद्धां नाहीं, यामुळें इथें फार वेळ थांबावेंसें वाटलें नाहीं. ही त्रिभुवनाची ईश्वरी इथें अनाथासारखी वाटते. मंदिरांत गेल्यावर मार्गदर्शकानें गाभाऱ्याजवळच्या एका जागीं बोट दाखवून सांगितलें कीं, इथें खालीं भुयार असून तें भिलवडीच्या

घाटापर्यंत गेलेलें आहे. या स्थानाच्या इतिहासात एका उग्र गंभीर घटनेची नोंद आहे.



करवीर क्षेत्रींच्या एका मतिमंद ब्राह्मणानें भुवनेश्वरीपुढें विद्येसाठीं धरणें घेतलें आणि ती प्रसन्न होईना असें पाहून वैतागानें तो आपली जिह्वा छेदायला निघाला. मग मात्र देवीनें साक्षात्कार दाखवून त्याला सांगितलें कीं, ‘ नदीच्या पलीकडे जा आणि तिथें औदुंबरातळीं एक महातापसी बसला आहे त्याचे पाय धर. तो तुझें आर्त पुरवील.’

हा महातापसी म्हणजे नरसिंहसरस्वती. गुप्त रूपानें कांहीं काल राहण्यासाठीं त्यांनीं हें औदुंबरवन निवडलें होतें; पण भुवनेश्वरीनें या ब्राह्मणाला त्यांच्याकडे धाडून त्यांना उघडकीस आणलें. मूढ ब्राह्मण श्रींच्या केवळ वरदहस्तानें वेदशास्त्रसंपन्न झाला, ही वार्ता सर्वत्र पसरली आणि जो तो आपलें दैन्य, दुःख घेऊन त्यांच्याकडे धावूं लागला.

भुवनेश्वरीच्या दारांतून आम्ही भिलवडी स्टेशनाची ‘ मोहोर ’ धरली. ती पाऊलवाट शेतांतून जात होती. त्या काळ्याशार जमिनींत अन्नपूर्णा हंसून डोलत होती. दोन्ही बाजूंनीं लवून आलेल्या भरघोस कणसांना

हळुवार हातांनीं दूर करीत आम्हांला जावें लागत होतें. हिंदुस्थानांत अन्नाचा दुष्काळ आहे या गोष्टीवरचा क्षणभर विश्वासच उडाला ते मोत्यांसारखे दाणे पाहून. आमच्यासभोंवतीं सगळीकडे हिरवीं पिंगट शेतेंच शेतें. त्यांत मुख्य पिकाच्या आश्रयानें कडधान्यें आणि पालेभाज्याहि तयार होत होत्या.

भरदुपारचा प्रहर. मोकळ्या निळ्या घुमटाखालची पायवाट. वर 'नक्षत्र' तापलेलें. आणि आम्ही स्टेशनकडे चाललेले. स्टेशनभागांतलीं छपरें दिसत होतीं; पण कितीही चाललें तरी तें जवळच येईना. सुपारीचें खांड चघळूनही घशाची कोरड कमी होईना. एवढ्यांत डाव्या बाजूच्या शिवारांत दोन झोंपड्या दिसल्या. तिथें पाणी मिळेल ही खात्री झाल्यानें आम्ही वाट सोडून तिकडे वळलों. झोंपड्यांच्या दारांत बैल मध्याह्नाची डुलकी घेत होते. जवळच चारदोन उघडीं पोरें बागडत होतीं. पाहुण्यांचा लोंढा आलेला पाहून झोंपडींतून बाहेर आलेल्या बायकांच्या डोळ्यांत आश्चर्य ओथंबलें.

लहानशीच पण मोट चालणारी विहीर तिथें होती. आंत उतरायला घसरडी वाट होती. पाणी माठांतल्यासारखें गार होतें. 'कान्तायते स्पर्शसुखेन वारि' असेंच एखाद्या कवीनें त्याचें वर्णन केलें असतें. कां नाहीं तें शीतल असणार! सभोंवतींच्या डेरेदार आम्रवृक्षांनीं सूर्य-किरणांचा कधीं स्पर्शच होऊं दिला नव्हता त्याला. तें थोडेंसेंच पिऊन आमची तृषा हरली. अधिक प्यालों तें लोभ सुटेना म्हणून. आतां स्टेशन अगदीं जवळ दिसत होतें. तें आणखी तीन मैल लांब असतें तरी आतां आम्हांला त्याची पर्वा नव्हती. जातां जातां मीं त्या 'सरसहृदय' कूपाला माझी कृतज्ञता कळवली—

**" हे कूप त्वं चिरं जीव ! स्वल्पतोये बहुव्ययः । "**

---

# ४. पंचवटीच्या परिसरांत

नाशिक-पंचवटीच्या यात्रेसाठीं मी पुण्याहून निघालों ते दिवस वसंतऋतूचे होते. आगगाडीपेक्षां बसनें जाणें सोईस्कर म्हणून मीं तोच मार्ग धरला. खेड, नारायणगांव, संगमनेर, सिन्नर या गांवांवरून हा रस्ता नाशिकला पोंचतो. प्रथम पुष्पोद्‌गम, नंतर नवपल्लव, त्यापुढें भ्रमरसमुदाय आणि त्याहीवर कोकिलकूजन अशा क्रमानें वसंत अवतीर्ण होतो असें संस्कृत कवींच्या काव्यांत वाचलेलें आणि कोंकणांत अनुभवलेलें; पण आमची बस जात होती तो रस्ता रूक्ष आणि रखरखीत होता. जिथें वनस्थलीचाच अभाव तिथें वसंतानें अवतरायचें कसें आणि आपला खेळ मांडायचा तरी कसा?

संगमनेर जवळ येत चाललें तों मध्याह्नाचें काव्य तळपूं लागलें. खालीं जमीन काळी. डोक्यावर आकाश निळें. झाडी नसल्यामुळें हिरव्या रंगाचाच तेवढा दुकाळ होता. गांवाच्या आश्रयानेंसुद्धां वृक्षांची वाढ झालेली दिसत नव्हती. एका ठिकाणीं जवळच्या नदीचें पाणी ढोसून गुरेंसुद्धां उन्हांतच गोठणीला बसलीं होतीं. सगळ्या घरांवर सकाळपासून संध्याकाळपर्यंत उन्हच उन्ह. लहानपणीं एखाद्यानें खोडी काढल्याची तक्रार घेऊन आजीकडे गेलों कीं ती म्हणायची, 'थांब हं, आपण त्याचं घर उन्हांत बांधूं!' उन्हांत घर ही केवढी जबर शिक्षा असली पाहिजे हें त्या गांवांवरून जाणतां येण्यासारखें होतें.

उन्हाच्या जोडीला कढत वारेही डोळे आणि कानशिलें भाजीत होते. धुरळा तर लोटांनीं उठायचा आणि गाडींत घुसायचा. गोदावरीच्या आधीं त्यानेंच आम्हांला सचैल स्नान घातलें. नाकांत, तोंडांत, डोळ्यांच्या पापण्यांवर तोच एक पदार्थ. बाहेर उन्हाळा आणि आंत धुरळा; त्यामुळें जीव कासावीस होऊं लागला. नाशिक हें द्राक्षांसाठीं प्रसिद्ध;

तेव्हां म्हटलें शहराच्या जवळ पोंचल्यावर तरी आमची बस द्राक्षांच्या मळयातून जाईल. पण तें स्वप्नच ठरलें. एवढ्यांत नाशिक रोड स्टेशन आलें. आतां फक्त ४–५ मैल जायचें होतें, आणि रस्ताही चांगला होता. कोर्टे, कचेऱ्या आणि शाळा यांच्या इमारतींवरून आमची बस मुक्कामावर येऊन थडकली. तब्बल साडेसहा तासानीं मीं नाशिक क्षेत्रांत पदार्पण केलें.

मुक्कामावर पोंचतांच जेवण तयार असल्याची सूचना मिळाली. 'शतं विहाय भोक्तव्यम्' मनानें सुभाषित सांगितलें. पण त्याचा पुढचाच चरण निराळेंच सांगत होता. 'सहस्रं स्नानमाचरेत्' हजार गोष्टी मागें टाकाव्या आणि आधीं स्नान करावें. त्या हजारांत जेवणसुद्धां आलेंच. मी नाशिकला केवळ भोजनभाऊ म्हणून थोडाच गेलों होतों. भूक समसमली होती हें खरें; पण त्याचबरोबर यात्रेकरूच्या अंगीं सहजपणें जी एक तितिक्षा येते ती मलाही आली होती. आणि मुख्य म्हणजे इतकें तापून आणि धूळ खाऊन आल्यावर स्नानावांचून चैनच पडलें नसतें. म्हणून मी धोतर–पंचा खांद्यावर टाकून सरळ नदीची वाट धरली. नाशिक शहर हें नदीकांठीं वसल्यामुळें कोणताही उतरता रस्ता शेवटीं गोदावरीलाच जाऊन मिळतो. वस्तुतः पंचवटीच्या बाजूनें असलेल्या रामकुंडावर जाऊन स्नान करण्यांत खरें यात्राफल आहे, हें जाणत असूनही मीं ती गोष्ट त्या वेळीं टाळली. रिकाम्या पोटीं तीर्थोपाध्यांच्या चक्रव्यूहांत सांपडण्याची माझी तयारी नव्हती. नाशिक आणि पंचवटी यांना जोडणारा 'सेतुबंध' जिथून सुरू होतो तिथेंच सुंदरनारायणाच्या मंदिराकडून मी खालीं उतरलों. तिथें छायाही होती आणि पाणीही भरपूर होतें.

वर्षप्रमाणेंच गोदावरीनें आपला जीवनरस सूर्यदेवाला समर्पण केला होता. त्यानेंही तो वर्षाकाळीं सहस्र गुणांनीं परत करण्याच्या बोलीवर ग्रहण केला होता. गोदेचें बहुतेक पात्र कोरडें पडलें होतें. त्यांतून वरच्या बाजूला गंगापूर येथें धरण बांधण्याचें काम सुरू असल्यामुळें उरलासुरला ओघ त्यांनीं तिथें रोखून धरला होता. त्यामुळें पुलाखालच्या पात्रांत काळे खडक कोरडे आणि मोकळे पसरले होते. पण मी जिथें बुडी

मारीत होतों ती जागा पुलातळची होती आणि तिथें लहानसा बंधारा असल्यामुळें कृपणाच्या वित्ताप्रमाणें बरेंच पाणी सांचलें होतें. लंगोट कसलेलीं किती तरी मुलें त्यांत धडाधड उड्या घेत होतीं. नगरपालिकेनें 'जलरक्षक' म्हणून नियुक्त केलेला एक पंजाबी निर्वासित, मुलांच्या माकडचेष्टा अनावर झाल्या कीं हातांतली छडी हालवीत 'मा चापलाय' म्हणून त्यांना दटावीत होता.

मी सुस्नात होऊन शुद्ध मराठी मंत्रानें ओंजळ भरून गोदेला अर्घ्य देत होतों.—

**" तुज हृदयंगमरवें विहंगम-भाट सकाळीं आळविती**
**तरु तीरींचे, तुजवर वल्लीपल्लव चामर चाळविती**
**तुझ्या प्रवाहीं कुंकुम वाही बालरवी जणुं अरुणकरीं**
**जय संजीवनि ! जननि पयोदे ! श्रीगोदे भवताप हरीं."**

राजकवि चंद्रशेखरांच्या गोदागौरवांतल्या या पदपंक्ति आहेत. या गोदागौरवाच्या रूपानें त्यांच्या संस्कारवती वाणींतून एक प्रसन्न पावन काव्यगंगा अवतीर्ण झाली आहे. गोदामाईची असाधारण भक्ति तिच्यांतून वाहते. जगन्नाथपंडितांची जशी संस्कृत गंगालहरी तसाच हा चंद्रशेखरांचा मराठी 'रसिकें अक्षरें मेळविलेला' गोदागौरव. जगन्नाथ हा हाडाचा पंडित. अंतरांतली उद्धाराची तळमळ व्यक्त करीत असतांही पांडित्यानें त्याची पाठ सोडली नाहीं. त्यानें गंगामैय्याशीं भक्तिवादाबरोबरच युक्तिवादही मांडला आहे. कारण ती त्याची जित्याची खोड. पण चंद्रशेखर आपला अनन्यशरण भक्तिभाव तिला समर्पून 'जय संजीवनि ! जय श्रीगोदे !' असा तिचा उद्घोष करतात. जणुं त्यांना हवें होतें तें अभयवचन तिच्या तोंडून मिळालें आहे. जणुं सगळा भवताप शमला आहे !


माझें हें स्तोत्र ऐकून तो मुलांना दटावणारा 'भय्या' मजकडे वळला. मला वाटलें, आपल्यालाही हा आतां कांहीं तरी सुनावणार. पण त्याचे डोळे तसें सांगत नव्हते. ते कांहींसे तरळले होते. त्याला मी कोणी तरी निराळा वाटलों असेन. जवळ येऊन त्यानें

'कोण, कुठले' म्हणून माझी चौकशी केली. हातांतली काठी टाकून आणि घटकाभर आपला सेवाधर्म विसरून तो एका पायरीवर बसला. मीं न विचारतांच त्यानें आपल्या निर्वासनाची कहाणी सुरू केली. बोलतां बोलता साठीच्या घरांत गेलेल्या, दणकट हाडापेराच्या त्या वृद्धाच्या डोळ्यांतून आसवांचे थेंब त्याच्या करड्या दाढीवर सांडूं लागले. देशांत त्याचें दुकान होतें. चार गडीमाणसें पदरीं होतीं. मुलगे आणि सुनाही होत्या. पण एकाएकीं आकाशाची कुऱ्हाड कोसळली. होतें तें नव्हतेंसें झालें असतें तरी हरकत नव्हती. पण घडलें तें विपरीत! कल्पनेसरशीं रक्ताचें पाणी करणारें!

त्याची अस्सल पंजाबी मला कळायला कठीण जात होती. माझी मराठी त्याला तशीच वाटली असेल. पण जिभेच्या भाषा अनेक असल्या तरी हृदयाची भाषा सर्वत्र एकच असते. आणि ज्याची माणुसकी शाबूत आहे त्याला ती कळायला उशीर लागत नाहीं. त्या अंतस्थ भाषेत मीं त्याचें सोलीव दुःख आणि त्यानें माझी सहानुभूति जाणली. पण त्याला माझ्याकडून हवी होती ती 'ओली' सहानुभूति. आणि ती मिळतांच त्यानें मला एक सलाम करून आपली काठी उचलली. मीं मनांत म्हटलें, कांहीं नुकसान झालें नाहीं. एर्वीतेर्वी मी स्नानविधीची दक्षिणा कोणाला तरी देणारच होतों. 'देशे काले च पात्रे च —'

भाविक असो, वा तार्किक असो, कोणालाही गोदास्नानाची अपूर्वाईच वाटेल. गोदावरीची 'दक्षिणगंगा' अशी ख्याति आहे. गंगा आणि गोदा या दोघींचाही शंकराच्या जटेशीं संबंध असल्यामुळें त्या 'शांभवी' आहेत. भाविकांची तर अशी धारणा आहे कीं, दोघींचे संदेश एकमेकींना पोंचवणारा एक मध्यस्थ गुप्त प्रवाह भूगर्भांतून असला पाहिजे. या महानदीला गंगेच्या खालोखाल, क्वचित् गंगेपेक्षांही वरकड मानतात. रेवातीरीं तप करावें, गंगातीरीं देह ठेवावा आणि कुरुक्षेत्रांत दान करावें अशी त्या त्या क्षेत्राची महती आहे. पण या सगळ्या गोष्टी एका गोदातीरीं केल्या तरी तेंच पुण्यफळ लाभतें, असा स्कंदपुराणाचा

निर्वाळा आहे. उगम, मध्य आणि शेवट अशा तिन्ही ठिकाणीं ती सारखीच पावन आहे.



गोदेला महाराष्ट्राची 'सरस्वती' म्हणायला मुळींच हरकत नाहीं. माउली तर ती आहेच आहे. निराळ्या दृष्टीनें पाहिलें तर ती अध्यात्माची सरिता दिसते. तिच्यांतून वाहतें तें पाणी नव्हे, तर विशुद्ध सत्त्वगुण. तिच्या तीरावर जें सारस्वत निर्माण झालें तें विश्वात्मैक्याचें, आणि सामरस्याचें. तिच्या तीरावरचे खग-मृग आणि पात्रांतले दगडधोंडेसुद्धां विश्वप्रेमाचीं मंगलसूक्तें गात असतील. गंगेच्या कांठीं तप पोसलें. यमुनातीरीं प्रेम दाटलें. नर्मदाकिनारीं योग वाढला. कृष्णाकांठीं सामर्थ्य तळपलें. आणि गोदातीरीं भक्ति-ज्ञानांचा एकमेळ साधून मनुष्यमात्राला मोक्षाचें महाद्वार खुलें करणाऱ्या एका महान् संस्कृतीचा विस्तार झाला. महाराष्ट्रांतला भागवतधर्म हिचेंच स्तन्य पिऊन पुष्ट झाला आहे. हिच्या कांठचीं नाशिक आणि पैठण हीं दोन नगरें संस्कृतिकेंद्रें म्हणून सातवाहनांच्या कालापासून प्रसिद्ध आहेत.

त्र्यंबकेश्वरीं ब्रह्मगिरीवर हिचा उगम झाला. वस्तुतः पश्चिम समुद्र तिला पन्नास मैलांवर होता. तिच्या दोन धाकट्या बहिणी वैतरणा आणि दमणगंगा

या दोघींनीं हें जवळचेंच 'स्थळ' पसंत केलें आणि पश्चिम बाजूनें झेप टाकली. पण गोदावरीचा विचार वेगळा ठरला. तिला सागरमिळणी तर साधायची होतीच; पण त्याआधीं भूपृष्ठाचें सौंदर्य वाढवायचें होतें. तत्प्रदेश समृद्ध करून जनांचें दैन्य दूर करायचें होतें. म्हणून तिनें पूर्व-समुद्राचा नऊशें मैलांचा मार्ग पसंत केला. ती प्रथम एकटीच आपल्या ध्येयमार्गावर आरूढ झाली. पण तिला वाटेंत आणखी कांहीं जीवींच्या सांगातिणी भेटल्या. प्रथम तिला दारणा भेटली. नंतर प्रवरा मिळाली. पुढें बालेघाटांतली मांजराही आली. अजंठ्याच्या डोंगरांत जन्मलेल्या पूर्णेनेंही तिचीच कास धरली. सिरोंचा येथें प्राणहितेनें तिच्यांत प्राण ओतला. नंतर इंद्रवती आणि शबरी याही आल्या. या संगमानंतर गोदेनें आपली दिशा बदलली. ती दक्षिणवाहिनी झाली. साधकाच्या मार्गांत काम-क्रोध तसे मोठमोठे पर्वत त्या मार्गांत तिला आड पडले. पण तिनें त्यांच्याशीं चांगलाच सामना दिला. अनेक नद्यांच्या, जलौघाची संघ-शक्ति तिच्या पाठीशीं असल्यामुळें तिनें त्या पर्वतांना फोडीत, तोडीत राजमहेंद्रीचें मोकळें मैदान गांठलें. मद्रास इलाख्यांत आल्यावर तिनें आपल्या एका प्रवाहाचे सप्तप्रवाह केले आणि जणुं सप्तहस्तांनीं सागराला मिठी घातली. जनसेवेंत कृतकार्य होऊन आलेल्या या वरवर्णिनीला सागरानें अनंत-लहरींच्या करांनीं कुरवाळलें. त्याच्या संतत हास्यांत तिचेंही हास्य मिसळलें.

नाशिक हें क्षेत्र पुरातन आहे. पुराणांतरीं त्याचा डिंडिम वाजत आहे. भारतांतील पांच महातीर्थांत त्याची गणना होते. यालाच 'पश्चिमकाशी' अशी दुसरी संज्ञा आहे. दोन हजार वर्षांपूर्वी हें व्यापारी पेठ आणि क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असल्याचें इजिप्शियन प्रवासी टॉलेमी सांगतो. 'नासिका' असा त्यानें त्याचा उल्लेख केला आहे. पतंजलीच्या महाभाष्यांत 'नासिक्य' असें नांव आढळतें. युगमानाप्रमाणें त्याला अनेक नांवें मिळालेलीं आहेत. कृतयुगांत याला पद्मनगर म्हणत. त्रेतांत त्रिकंटक या नांवें ओळखीत. द्वापारांत जनस्थान म्हणून संबोधीत. आजचें नाशिक हें नांव 'नवशिख' शब्दाचा अपभ्रंश असल्याचें सांगतात. याच्या आसपास नऊ टेकड्या असल्यामुळें याला नवशिख म्हणत असावें. बहुजनांना कदाचित् ठाऊक

नसेल; पण यवनांच्या सत्ताकालांत त्यांनीं याचें 'गुल्शनाबाद' असें नवें नामकरण केलें होतें. औरंगजेबाच्या एका सुभेदारानें इथलीं पंचवीस देवळें पाडून एकचतुर्थांश शतकृत्य केल्याचें इतिहास सांगतो.

गोदावरीच्या दक्षिण तीरावर नाशिक आणि उत्तर तीरावर समोरच पंचवटी आहे. दोन्ही क्षेत्रें समान योग्यतेचीं आणि प्रातःस्मरणीय आहेत. पंचवटींत प्रभु रामचंद्रानें आपला आश्रम उभारला होता. रामाच्या-पूर्वीं किती तरी वर्षें विंध्य ओलांडून अगस्त्यमुनि दक्षिणेंत उतरला होता. कुदळीनें डोंगर-कडे तोडून त्यानें दक्षिणापथ तयार केला होता. दक्षिण दिशेला आर्यांना वाहती वाट करून देण्याचें श्रेय अगस्त्यालाच दिलें पाहिजे. पंचवटीपासून दोन योजनांवर त्याचें वसतिस्थान होतें. अत्रस्थ अनार्यांनीं त्याच्या या आक्रमणाला कसून विरोध केला असला पाहिजे. पण तो प्रेमाचा मंत्र घेऊन आला होता. त्यानें हळूहळू त्यांचा विरोध शमवला. त्या आदिवासी रानटांशीं त्यानें सौरस्य निर्माण केलें. एक विशाल संस्कृति त्याच्यापाशीं होती. ती देऊन त्यानें त्या अनार्यांना 'आर्य' करून टाकलें. हा सर्व प्रदेश त्यानें कसा निर्वैर बनवला तें खुद्द रामचंद्रानेंच लक्ष्मणाला सांगितलें आहे. गोदावरीच्या उत्तर तीराला गौतमतीर आणि दक्षिण तीराला वसिष्ठतीर म्हणतात. यावरून या दोघां ऋषिप्रवरांनींहि अगस्त्याच्या या कार्याला हातभार लावला असावा असें अनुमान निघतें. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या सहकारानेंच दक्षिणेंतल्या या आर्य वसाहती सुप्रतिष्ठित झाल्या. त्यांनीं मूळ रहिवाशांचें निर्मूलन केलें नाहीं; तर त्यांचा आपल्या जयिष्णु संस्कृतींत समावेश करून टाकला.

प्रभु राम आपला वनवास पुरा करण्यासाठीं कदाचित् दुसरीकडेही कुठें तरी गेला असता. त्याला कांहीं कैकेयीनें पंचवटींत राहण्याचा निर्बंध घातला नव्हता. पण अगस्त्यानें त्याला इथली गोडी उत्पन्न केली. 'इथें हरणें असंख्य आहेत. फळांमुळांचीही वाण नाहीं. वृक्षांची घनदाट छाया आहे. शिवाय गोदावरीसारख्या महानदीचें सान्निध्य आहे. तेव्हां तूं

या जनस्थानांतच रहा आणि आमच्या यज्ञयागांचा विध्वंस करणाऱ्या राक्षसांचा उच्छेद कर.'

रामरायानें त्या तपोवृद्ध मुनीचा आदेश शिरोधार्य मानला. पंचवटींत आश्रम उभारून त्यानें पित्याचें वचन आणि राक्षसांचें निर्दलन हीं दोन्ही कार्यें एकाच काळीं पार पाडलीं. त्या दिवसापासून आजतागायत पंचवटींत राममहिमा गाजून राहिला आहे.

पण ही झाली पुराणकालीन गोष्ट. इतिहासाचा धागादोरा कुठपासून सांपडतो हें पहायचें तर आंध्र-भृत्यांच्या राजवटीपासूनच आपल्याला प्रारंभ करावा लागेल. यांनाच पुढें सातवाहन अशी संज्ञा लाभली. हे सातवाहन सूर्यवंशी म्हणजे रामाच्याच वंशांतले होते. महाराष्ट्राचा पहिला ऐतिहासिक महावंश तो हाच. खि. पू. २०० ते इ. स. २०० पर्यंत यांनीं महाराष्ट्रावर अधिराज्य केलें. महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं डोंगर पोखरून लेणीं खोदण्यांत आलीं तीं यांच्याच कालखंडांत. त्यानंतर या भागाची सत्ता अभीरांच्या हातीं आली. अंजनेरी हा किल्ला हें त्यांचें मुख्य ठाणें होतें. सहाव्या शतकाच्या प्रारंभीं हा प्रदेश चालुक्यांनीं हस्तगत केला. त्यानंतर आले राठोड. त्यांची पहिली राजधानी नाशिक जिल्ह्यांत मयूरखंडी येथें उभी झाली. त्यानंतर देवगिरीच्या यादवांची अमदानी सुरू झाली. त्यांचा काळ फिरल्यावर मुसलमानी सत्ता गाजूं लागली. त्यांच्या काळांत या क्षेत्राची पडझड होऊन त्याला अवकळा आली. त्यानंतर अठराव्या शतकाच्या मध्यावर पेशव्यांनीं त्याचें मुख उजळ केलें. पुढें पेशवाई बुडून इंग्रजांचा अमल जारी झाला हें खरें; पण त्यांच्या अमदानींत क्षेत्राच्या माहात्म्याला धक्का लागला नाहीं.

, नाशिक-पंचवटींत जीं कलापूर्ण मंदिरें आहेत त्यांतलें एक सुंदर-नारायणाचें. हें १७५६ सालीं सरदार चंद्रचूडांनीं बांधलें. मी जिथें स्नानाला उतरलों होतों तिथें वरच्याच बाजूला तें असल्यामुळें मी प्रथम तिकडे वळलों. सत्याला स्मरून बोलायचें तर मला देवापेक्षां देवळाचीच उत्सुकता अधिक होती. प्रवेशद्वारांत उभा राहिलों तर त्यानेंच माझी दृष्टि खिळवली. कोरीव नक्षीनें खचून राहिलेला असा

तो दरवाजा आहे. खालीं दोन बाजूंना दोन कीर्तिमुखें. त्यांच्या बाजूला दोन पार्षद. चौकटीवर घुमटींत कोरलेला लंबोदर गजवदन. त्यावर दगडी झडप. आणि त्याच्याहीवर सुंदर मेहेरप. तिथल्या नक्षींतला रेखीवपणा आणि समतोलपणा मुक्तकंठानें प्रशंसावा असा आहे. या मंदिराला दिशासाधन आहे. मार्चच्या २१ तारखेला उगवत्या सूर्याचे किरण सरळ सुंदरनारायणाच्या पायांवर पडतात. या मंदिराच्या तंतोतंत समोर नदीच्या पलीकडचें कपालेश्वरमंदिर येतें. कपालेश्वराच्या प्रवेश-द्वारांतून सुंदरनारायणाच्या गर्भागारांतला दिवा दिसतो असें सांगतात. कपालेश्वराचें नांव अनायासें आलें तेव्हां इथेंच त्याला दोन वाक्सुमनें वाहून पुढें जावें हें बरें.


रामकुंडाच्या जवळच तें आहे. उंचावर असल्यामुळें बऱ्याच पायऱ्या चढून वर जावें लागतें. वरून गोदातीराचें विहंगमदर्शन चांगलें होतें. प्रदक्षिणा करतांना प्राकारांतल्या पिंपळांची सळसळ कानीं पडते. कपालेश्वराचें वैशिष्ट्य हें कीं, त्यानें आपलें वाहन चरायला सोडलें आहे. ज्याच्या शिंगांमधून शिवदर्शन घेण्याचा संकेत तो नंदी त्याच्यापुढें नाहीं. तो नसायला पुराणकालांत एक सबळ कारण घडलें आहे.

ब्रह्मदेव आणि शंकर या दोघांत एकदां कसली तरी गंभीर चर्चा सुरू झाली. विधात्याच्या युक्तिवादापुढें शंकराचा टिकाव लागला नाहीं. त्यानें 'शेषं कोपेन पूरयेत्' असें केलें आणि क्रोधाच्या भरांत विधात्याच्या चार मस्तकांपैकीं एकाचा छेद केला. पण तें ब्रह्मकपाल वर उडालें तें शिवाच्या अंगाला चिकटलें. तें कसें झाडून टाकावें ही भूतपतीला मोठी विवंचना पडली. त्या पापाच्या परिमार्जनासाठीं तो वरींच तीर्थक्षेत्रें हिंडला. पण उपयोग होईना. शिव उबगला. अशा स्थितींत एक दिवस त्याच्या कानीं संवाद पडला. एक ढवळा बैल आपल्या आईला सांगत होता,

"आई, माझा धनी मला फार छळतो आहे. मी एक दिवस त्याचा कांटा काढणार आहें." त्यावर आई त्याला म्हणाली, "बाबारे, तुला ब्रह्महत्या लागेल!" मुलानें प्रत्युत्तर केलें, "ऊंः त्यांत काय

मोठंसं ? गोदावरींत स्नान केलं कीं ब्रह्महत्येचं पातक धुऊन निघतं हें मला ठाऊक आहे. "

शंकर त्या बैलोबाच्या मागावर राहिला. त्यानें उक्तीप्रमाणें कृति केली आणि सरळ जाऊन गोदावरींत बुडी मारली. तो छळवादांतून सुटला तसाच पापांतूनही सुटला. हें शंकरानें प्रत्यक्ष पाहिलें. त्यानेंही त्याच उपायानें आपल्या मागचें ब्रह्मकपाल दूर केलें. शिवाला आनंद झाला आणि बैलाच्या जातीनें आपल्यावर उपकार केले म्हणून त्यानें त्याला सेवेंतून मुक्त केलें.



पंचवटींतलें नारोशंकर राजेबहाद्दर यानें बांधलेलें रामेश्वराचें मंदिर ही तर एक अजब कलाकारी आहे. इतकें कुसरीचें देऊळ नाशिक-पंचवटींत दुसरें नाहींच. जिथें दृष्टि जाईल तिथेंच ती पांगळून रहाते. अंतर्भागा-पेक्षां बहिर्भागावर मन अधिक जडतें. मंदिराच्या बाह्य कटिबंधावर खालीं कोरीव नक्षीची जाळी सभोंवतीं पहावी तर तिच्यावर त्याच लांबीची मयूरपंक्ति चंचुपुटांत माला घेऊन उभी दिसते. त्यावरही पुन्हा

'कीर्तिमुखां' ची तशीच ओळ. दृष्टि वर केली तर चारी दिशांना पाषाणमूर्ति गोसावी दिसले. पद्मासन घालून बसलेले. एका हातीं माळ. दुज्या हातीं पोथी. मस्तकीं जटाभार. मुखावर योगमुद्रा. त्यांच्यापैकीं कांहींचे हात-पाय काळानें विच्छिन्न केले आहेत. पण तरीही अजून ते डगमगले नाहींत. या मंदिराच्या बाह्य भागाचें आणखी एक आकर्षण म्हणजे प्राणिसंमेलन. वाघ, वानर, हत्ती, अशा अनेक प्राण्यांची तिथें हजेरी लागली आहे. सभोंवतीं अकरा फूट उंचीचा तट असून त्यावर तीन कोनांना तीन सुबक मेघडंबऱ्या दिसतात. चौथी म्हणजे डाव्या हाताची पुढची कोणत्या तरी वर्षींच्या महापुरांत गोदावरीनें वाहून नेली म्हणे. 'नारोशंकरची घंटा' म्हणतात ती याच देवळापुढची. वसईच्या संग्रामांत तिथल्या पोर्तुगीजांच्या चर्चेवरून तिचें इथें स्थलांतर झाल्याचें सांगतात. तिच्यावर १७२१ असा आंकडा आहे. तटावरून चढून जाऊन लहान पोरालासुद्धां प्रचंड घंटेचा नाद उठवितां येईल. पण या देवळांत यात्रेकरूंची 'जा-ये' असली तरी पंचवटींतलें मुख्य मंदिर मात्र हें नव्हे.

तो मान काळ्या रामाचा आहे. याचें दर्शन न घेणारा कोण करंटा यात्रेकरू असूं शकेल! मी तिथें पोंचलों ती वेळ रात्रीच्या पहिल्या प्रहराची होती. मंदिरांत सर्वत्र प्रकाश पसरला होता. राजीवलोचन श्रीराम भक्त-भाविकांना नेत्रोत्सव करण्यासाठीं सुवेष सालंकृत होऊन उभा होता. त्याची मुखमुद्रा निहाळतां मला असें वाटलें कीं, तो जणुं प्रत्येकाला म्हणतो आहे, 'तूं आलास? ये. मी तुझीच प्रतीक्षा करीत होतों.' स्थानाचा प्रभाव का मनांतला भाव कोण जाणे! पण त्या मूर्तीपुढें उभा राहतांच हृदयस्थ आत्माराम सुप्रसन्न झाला हें मात्र खरें. रामचंद्र या जोड शब्दांत 'रम्' धातु आहे तो रमवणारा आहे. 'रामो रमयतां वरः!' आणि 'चंद्र' आहे तो तर आल्हादकच. 'सप्तलोकैकवीर' ही रामप्रभूची बिरुदावलि असली तरी त्याचें दर्शन वृत्तींना चेव आणीत नाहीं; तर अंतःकरण शांत आणि समाहितच करतें.

मीं त्या मूर्तीवर डोळे जडवले. पहातां पहातां तिथलें देऊळ अदृश्य होऊन त्या जागीं एक पर्णकुटी उभी झाली. सभोंवतीं वेतांचीं बेटें डोलूं लागलीं. वृक्षवेली बहरल्या. कडेवर एक घागर घेऊन रातोत्पलां-सारख्या आरक्त पावलांची सीता त्या तणारांतून हळूच बाहेर आली. गोदावरीचें पाणी आणून तिनें नुकत्याच स्वहस्तें लावलेल्या बालतरूंचें शिंपणें सुरू केलें. कृष्णसार हरिण सभोंवतीं घोटाळून तिच्या कामांत गोड अडथळा आणूं लागले. काम संपतें न संपतें तोंच तिचा 'रघुकुलतिलक' आला. शिकारीहून तो दमून भागून आला होता. त्याला श्रमपरिहारासाठीं थोडा वेळ आंग टाकायचें होतें. त्यासाठीं तो एका लताकुंजाकडे वळला, तशी सीतामाईलाही तिकडे जाण्याची लगबग झाली. तिनें आपली 'सुवृत्त' मांडी आपल्या आर्य रामभद्राची उशी केली. गोदावरीच्या तरंगांवरून आलेल्या शीतल वायुलहरींनीं त्याच्या मुखावरचे घर्मबिंदु सुकवले आणि आपोआप त्याचीं नेत्रदळें मिटलीं.

हा एक भावरम्य प्रसंग माझ्या डोळ्यांपुढें चित्रित झाला आणि त्यांतलें मुग्धमधुर काव्य मी आस्वादायला प्रवृत्त होतों तोंच दुसऱ्या एका दारुण घटनेनें त्याची जागा घेतली.

मारीच मायामृग होऊन तिथें आला. सीतेला त्याच्या कातड्याची कांचोळी हवीशी वाटली. रामानें त्याचा पाठलाग आरंभला. पाठोपाठ रावण याचकवेषानें तिथें प्रगटला आणि त्यानें सीतेचें हरण केलें. प्रभु राम परत येतो तों आश्रम सुना. सीता कुठें दिसेना आणि हांकेला प्रत्युत्तर येईना. त्याच्या मनांत कुशंकांचें काहूर उठलें. सीता हातची गेली असें वाटलें. रामप्रभु प्रियावियोगानें कासावीस झाला. वृक्षलतांना मिठ्या मारीत सैराट भटकूं लागला. डोळ्यांत संतत अश्रुधारा आणि मुखांत 'हा सीते' हा करुण विलाप! बिचाऱ्या मुक्या वेलींनीं दक्षिण दिशेचे पल्लव हालवून सीतेचा मार्ग सुचवला. हरिणींनीं मुखांतले दर्भकवल टाकून दक्षिणेकडे टक लावली. पण रामाला उमज पडेना. तो दिवसभर भटकला आणि रात्रीं निराश होऊन एका शिला-

खंडावर टेकला. सृष्टीवर पसरलेलें सौम्य रुपेरी चांदणें पाहून तो लक्ष्मणाला म्हणतो—

"लक्ष्मणा! उन्हांत काय बसला आहेस वेड्यासारखा! असा सावलींत ये ना."

"दादा, हें ऊन्ह आहे का? हें तर चंद्राचं चांदणं वरसतं आहे. तो पहा आभाळांत मृगलांछन चंद्र!—"


"काय म्हणालास? मृग? मग माझी मृगनयना कुठें रे?"

आणि रामाला पुनश्च शोकाचा उमाळा आला—'हाय! माझी सीता! जनकाची लाडकी कन्या! वडिलांची आवडती सून!

**मज राजकन्यके तूं वरूनियां पावलीस न सुखातें**
**खातें हें चित्तातें सांगूं कोणास मी स्वदुःखातें.'**

रामरायाचा हा वियोग-विलाप सर्व महाकवींनीं हृदयांतल्या द्रवानें लिहिला आहे. त्या प्रसंगाची साक्ष पुरवायला आज तीं हरिणें आणि त्या वृक्षवेली नाहींत. पण गोदामाईच्या अंतरांत शिरलांत तर ती तुम्हांला या सगळ्या गोष्टी पाझरत्या डोळ्यांनीं सांगेल. अयोध्येंतल्या सिंहासनाधिष्ठित राजा रामापेक्षां पंचवटींतला वनवासी राम माझ्या भक्तीला अधिक पटतो. त्याच्या देवपणांतलें माणूसपण इथेंच प्रगट झालें आहे.

काळ्या रामाचें हें वैभवशाली मंदिर ओढेकर जहागिरदारांनीं बांधलें. १७८२ सालीं त्यावर कळस चढला. त्याआधीं पुरतें एक तप त्याचें काम चाललें होतें. रोज दोन हजार माणसांचा घाम गळत होता. तेवीस लाख रुपये त्या कामीं खर्च झाले. या मंदिरावर कलाकुसर नाहीं. आहे तो भव्यपणा आणि डोळ्यांत भरण्यासारखा नितळपणा. त्याला लागलेले एकजात सगळे दगड रामशेजेच्या डोंगरावरून आणलेले आहेत. मंदिराभोंवतीं दगडी प्राकार असून त्याला लागून चारी दिशांना अग्रशाळा बांधलेल्या आहेत. समोरचें मारुतीचें मंदिरही मुख्य मंदिराला साजेसेंच आहे.



नाशिक–पंचवटींतलीं हीं बहुतेक मंदिरें पेशवेकालीन आहेत. आपलीं पवित्र क्षेत्रें मुसलमानांच्या तावडींतून सोडवण्याचें महत्कृत्य पेशव्यांनीं तडीला नेलें. शाहूमहाराजांनीं दक्षिणेंत आल्यावर मोंगल सम्राटाकडे त्र्यंबकेश्वराची मागणी केली होती. पण तिला वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. पेशव्यांच्या मनांत ही गोष्ट सलत होती. १७५० च्या सुमारास त्यांनीं हीं दोन्ही महाक्षेत्रें मराठी राज्यांत आणलीं. त्यासरशीं तुडवली गेलेली सांस्कृतिक भावना पुनश्च उसळून वर आली. पेशव्यांचे अनेक सरदार, जहागिरदार क्षेत्राची अवकळा घालवण्यासाठीं पुढें सरसावले. त्यांनीं आपली संपत्ति शतधारांनीं इथें ओतली. पाडलेल्या जागीं पुनश्च नव्या सुंदर मंदिरांची उभारणी झाली. महाराष्ट्राचें कलावैभव पुनश्च तळपूं लागलें. स्वाभिमानावरची काजळी झडली. यात्रिकांचें विषादशल्य उपटून निघालें.

इथलीं प्रसिद्ध मंदिरें हेमाडपती आहेत. हेमाडपंताचें शुद्ध नांव हेमाद्रि. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हा यादवांच्या राज्यांत करणाधिप होता. आपल्या अधिकारकालांत शेंकडों मंदिरें उभारून त्यानें

लोकांच्या धर्मभावनेला बहर आणला. त्यानें रचनेची जी एक विशिष्ट पद्धति स्वीकारली तिला पुढें हेमाडपंती असें नांव पडलें. अशा प्रकारच्या मंदिरांचे दगड सांधण्यासाठीं चुना वापरलेला नसतो. भूमितिशास्त्राला अनुसरून काटकोन, त्रिकोण, चौकोन अशा आकारांत दगड कापायचे आणि एकमेकांत घट्ट बसवायचे. त्यामुळें मंदिराला सहजच कंगोरे निर्माण होतात. दुसरा विशेष म्हणजे खांबांवर, घुडावर आणि सभामंडपांत रामायण–महाभारतांतले प्रसंग चित्ररूपानें कोरायचे. चालुक्य, द्रविड आणि जैन शिल्पांतले कांहीं प्रकार या पद्धतींत एकत्र आढळतात. पूर्वकालांतल्या हेमाडपंती देवळांत मूर्तींची विपुलता दिसते तर उत्तरकालीं काटकोन-त्रिकोणांचें नक्षीकाम अधिक आढळतें. नाशिक–पंचवटींतल्या या मंदिरांची रचना पुढीलप्रमाणें सांगतां येईल—

समोरचें महाद्वार आणि बाजूचीं दोन पक्षद्वारें. प्रत्येक दरवाजावर द्वारमंडप आणि वर त्याला शोभेशी बैठी घुमटी. त्यापुढें चौरस सभामंडप. त्यावरही आंतून पोखरलेला तसाच घुमट. त्यामागें वर्तुलाकृति देवमूर्तीचें गर्भागार आणि त्यावर चौकोनीच निमुळतें उंच शिखर. द्वारमंडप कमी रुंद असतो आणि गर्भागाराची रुंदी सभामंडपापेक्षांही अधिक असते. अशा विषम रचनेचें हें बांधेसूद शिल्प किती प्रेक्षणीय असतें तें पाहिल्यावांचून कळायचें नाहीं.

नाशिक क्षेत्रांत बारा महिने यात्रा असते. भरतखंडांतल्या सर्व जनांना हें क्षेत्र पावन वाटतें. दर बारा वर्षांनीं सिंह राशीला गुरु येतो तेव्हा तर इथें यात्रिकांचा महापूर लोटतो. उभें वर्ष नाशिकचें वातावरण गोदेच्या जयघोषानें दुमदुमून रहातें. त्या वर्षीं गंगा-यमुनादि सप्तसरिता दक्षिणेंतल्या या गोदाताईच्या घरीं पाहुणेराला येतात असा पूर्वापार संकेत आहे. ‘सिंहस्थपर्वणी’ म्हणतात ती हीच. प्रयागचा कुंभमेळा तसें नाशिकचें सिंहस्थ.

नेहमींसुद्धां सकाळपासून तों तिसऱ्या प्रहरापर्यंत रामकुंडाभोंवतीं दाटी असतेच. आबालवृद्ध तिथें आपले मलिन देह बुडवून काढतात. पुलाखालून पात्रांत एक खोल असा पाट खोदून राम–लक्ष्मणांच्या कुंडांत

पाणी नेलेलें आहे. एवढ्या माहात्म्याचें हें रामकुंड; पण त्या मानानें तें विस्तृत नाहीं. कित्येक 'सत्पुत्र' आपल्या पितरांची 'उद्धरगत' व्हावी म्हणून त्यांच्या अस्थि इथेंच आणून विसर्जित करतात. घाटावर ठायीं ठायीं पिंडदान चालू असतें. आपल्या मण मण वजनाच्या तांबड्या वह्या पोटाळून 'गंगापुत्र' मोक्याच्या जागा धरून बसलेले असतात. त्यांची 'पोटार्थी' नजर चौफेर भिरभिरत असते. मी गेलों त्या दिवशीं सिंधी यात्रिकांचा बराच मोठा पाळा तिथें लोटला होता. घाटावरच त्यांच्या कांहीं मुलांची 'जनोई' (मुंज) चालली होती. स्थंडिलावर अग्नि सिद्ध झाला होता. बाजूला लांकडी उपकरणें मांडलेलीं होतीं. मेखलाबंधन केलेल्या बटूभोंवतीं नातलग स्त्री-पुरुषांचे घोळके बसले होते आणि त्याला नव्या वस्त्राभरणांनीं सजवीत होते. तें दृश्य जितकें लोभसवाणें तितकेच त्यांच्यां शेजारीं चाललेले प्रकार निर्दय होते. त्याच मुहूर्तावर कांहीं सिंधी आईबापांनीं आपल्या मुलींचेंही चौल उरकून घ्यायचें ठरवलें होतें. दोन-अडीच वर्षांच्या त्या कोवळ्या गोजिऱ्या मुलींच्या मस्तकावर नापिताचा वस्तरा सरसर चालत होता. त्या पोरी हातपाय झाडून आक्रंदत होत्या. तो कोरडा घाट नेत्रधारांनीं भिजवीत होत्या. आयाबायांनींच त्यांना गच्च दाबून धरलें होतें. बरोबर आहे; पुरुषांपेक्षां बायकांनाच पुण्याची 'गणना' अधिक! तें संस्कारकृत्य जेव्हां 'सफाई' उरकलें तेव्हां कुठें मातृहृदयाला पान्हा फुटला आणि मग त्या मुंडित अर्भकांची आंजारणीगोंजारणी सुरू झाली. घाबरून, यातना भोगून अर्धमेलीं झालेलीं तीं अश्राप बाळें सुटकेचा श्वास सोडून आयांच्या उराशीं बिलगलीं.

काळ्या रामाच्या देवळापासून जवळच एका वटवृक्षाच्या छायेंत 'सीतागुंफा' आहे. तिच्या मुखावर एक धर्मशाळा बांधलेली आहे. तिथला हक्कदार असलेला एक गोसावी अर्धा आणा घेऊन लोकांना गुहेंत सोडतो. त्या निरुंद विवरमार्गांतून आंत उतरतांना बसून घसटत घसटतच जावें लागतें. जाणारा माणूस येणाऱ्याचा मार्ग बंद करतो.

सातआठ पायऱ्या असें भूगर्भांत उतरल्यावर एका मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशांत राम–लक्ष्मण–सीतेच्या मूर्ति दिसतात. त्याच गुहेला खालीं डाव्या हाताला दुसरा एक फांटा फुटलेला आहे. त्याच्या बुडाशीं एका शिवलिंगाचें दर्शन होतें. तिथें हवा येण्याला दुसरी वाट नाहीं; तरी पण जीव घाबरा होत नाहीं. तसा कांहीं अपाय असता तर खर-दूषणांच्या समरप्रसंगीं रामरायानें आपली चित्कला जानकी हिला तिथें दडवून ठेवलेंच नसतें. या गुहेंतून रामशेजेच्या डोंगरापर्यंत एक भुयार खोदलेलें आहे अशी किंवदंती आहे. पण या बाबतींत खऱ्या-खोट्याची शहानिशा कोण करणार!

मी गुहेंतून बाहेर पडलों आणि पंचवटीच्या पूर्वेला तपोवनाकडे निघालों. पादत्राणें एका सुरक्षित ठिकाणीं ठेवलीं होतीं तीं घेण्याचें राहूनच गेलें. खडे, कांटे पायांत रुतायला लागले तेव्हां त्यांची आठवण झाली. पण मीं मनाला शिकवलें कीं, झालें तें एका अर्थी योग्यच झालें. ‘ विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम!’ राजा दुष्यंत कण्वाच्या तपोभूमींत पाय देतांना रथांतून खालीं उतरला होता. मग मला निदान अनवाणी तरी जाणें भागच नव्हतें का?

हें ऋषींचें तपोवन असलें तरी पुराण्या काळीं इथें राक्षसांचाही मोठा तळ होता. ते कधीं प्रच्छन्नपणें तर कधीं उघडपणें इथें नासधूस करींत होते. खर, दूषण आणि त्रिशिरा या तीन मातबर सेनापतींच्या आधिपत्याखालीं चौदा हजार निवडक राक्षससैन्य रावणानें इथें ठेवून दिलें होतें. दक्षिणेंतलें वालि–सुग्रीवाधिष्ठित वानरराष्ट्र त्या काळीं महाबळी होतें. उत्तरेकडच्या आर्य राष्ट्रांचा तर रावणाला नेहमींच धाक वाटत होता. या नर–वानरांचा एकमेळ झाला तर आपल्या पोटावर पाय यायला उशीर लागणार नाहीं हें धूर्तपणें ओळखून रावणानें या उभय राष्ट्रांच्या मध्यें ही राक्षससैन्याची पाचर ठोकली होती. रामापूर्वी ही पाचर कोणत्याही आर्य वीराला उपटून टाकतां आली नाहीं. रामानें मात्र हें काम लीलेनें करून टाकलें. खर, दूषण, त्रिशिरा हे तिन्ही सेनापति याच तपोवनांतून त्यानें यमाच्या घरीं पाहुणे धाडले

आणि उरलेल्या चौदा हजारांचाही धुव्वा उडवला. हा प्रदेश तूर्त उजाड दिसतो. तपोवनाची निसर्गसंपदा इथें आढळत नाहीं. कदाचित् राक्षसांच्या रक्त-मांसाचें अजीर्ण होऊन इथला निसर्ग करपून गेला असेल.

बऱ्याच आधुनिक सुशिक्षिताचा अनेक गोष्टींवर विश्वास नाहीं, तसाच राक्षसजातीवरही नाहीं. राक्षसांचीं वर्णनें वाचतांच 'पुराणांतल्या अद्भुत गप्पा' अशा शब्दांनीं ते त्या वर्णनांची संभावना करतात. पण धरतीमाता एखादे वेळीं आपल्या ठेवणींतून अशा कांहीं चिजा बाहेर काढून दाखवते कीं, माणसानें अश्रद्धा झाडून नव्या विचाराला प्रवृत्त व्हावें. १८९० सालीं याच गोदावरीच्या तीरावर एक खाण उपसण्याचें काम सुरू झालें आणि मानवशरीराचे कांहीं अजब अवशेष हातीं लागले. त्यांत जी एक डोक्याची कवटी सांपडली तिची रुंदी तीन हात होती. दोन दांत गवसले ते अर्ध्या फुटाहून अधिक लांब होते. भूमीनें पुराणवाङ्मयाचा पुरावा म्हणून जतन करून ठेवलेला हा मुद्देमाल आजमितीस ब्रिटिश म्यूझियमध्यें सुरक्षित आहे. यावरून रामकाळीं असले अजस्र उभे प्राणी इथें वास्तव्य करीत होते हें सिद्ध व्हायला आणि

"ते बलाहकसंकाशा महाकाया महाबलाः"

हें वाल्मीकीनें त्यांचें केलेलें वर्णन सत्य मानायला अडचण पडूं नये. मग तुम्ही त्यांना राक्षस म्हणा किंवा मानव म्हणा !

सीतागुंफा, तपोवन, नाशिकमधला पेशव्यांचा सरकारी वाडा, भद्रकाळीचें देवालय, मुसलमानी राजवटीचे मशिदी वगैरे त्या पुण्यक्षेत्रावरचे व्रण आणि इतर बऱ्याच गोष्टी पाहून होईतों संध्याकाळ झाली. विश्रामसुखासाठीं पुनश्च गोदावरीच्या पात्रांत येऊन मी तिथल्या 'भव्य शेंदूरलेपन' मारुतीच्या शेजारीं आसन ठोकलें. या हनुमंताला दोन्ही बाजूंनीं मुखें आहेत. पंचवटीला सन्मुख असलेला मारुति करसंपुट जोडून नम्र आहे. कारण त्या दिशेला त्याचा स्वामी आहे. आणि नाशिकाकडे तोंड करून असलेला जंबुमाळ्याच्या मस्तकावर पाय देऊन उभा आहे.

नाशिक हें समुद्रसपाटीपासून सुमारें दोन हजार फूट उंचीवर असल्या-मुळें स्वभावतःच थंड प्रकृतीचें आहे. तशांत सायंकालीन वसंतवायूच्या लहरी, आणि त्यांतही पौर्णिमेकडचें पिठोरी चांदणें; मग श्रमपरिहाराला काय उशीर! मी बसलों होतों तिथूनच गोदावरीचा एक प्रवाह मंथरगतीनें खालीं वाहत होता. किती तरी मुलें माणसें घाटावरच्या यशवंतराव-महाराजांच्या विस्तीर्ण पटांगणांत आणि गोदावरीच्या अंकावर विहरत होतीं. त्या सर्व आसमंतावर लोभाविष्ट दृष्टि टाकतांना पुनश्च माझ्या वैखरीवर चंद्रशेखर अवतरले —

**" मधुमासामाधिं मधुर हवा ती स्पर्श मधुर तव मधुर चवी**
**सायं प्रातः सेवियली ती साखर वानिल केविं कवी ? "**

उभय बाजूंच्या घाटांवर विविध वस्तूंचा बाजार मांडला होता. दिवे झगमगत होते. अस्पष्ट कोलाहल अनुस्यूतपणें उठत होता. त्यांतच मंदिरांतून येणारे घंटानाद मिसळत होते. पात्रावरच्या बैठ्या दगडी बांधावरून माणसें 'ऐलथडी पैलथडी' करीत होतीं. मधून मधून सांचलेल्या पाण्यांत आभाळांतलीं नक्षत्रें तीर्थोपाध्यायांचा डोळा चुकवून स्नान करीत होतीं. एका पुण्यक्षेत्रांत असल्याची जाणीव आणि नव्या वातावरणाचा अनुभव; यांमुळें माझ्या हृदयांत सुखाचीं सुगंधी 'भुईचाफीं' उगवत होतीं. किती तरी वेळ मी त्या पात्रांतच होतों. अनेक जागीं स्थलांतरें करीत होतों. मला वाटलें होतें कीं, एखादें दांपत्य मुलांबाळांना घेऊन रात्रिभोजनासाठीं इथें येईल. इथल्याच एखाद्या स्वच्छ, प्रशस्त शिलाखंडावर मंडलाकार पंगत धरील. सोडलेल्या शिदोरींत चंद्रामृताचे कोवळे कण मिसळून पदार्थांची रुचि वाढवील. मग मी हळूच तिथें जाऊन लाजभीड न धरतां त्या प्रेमभोजनांतला एक ग्रास मागून घेऊन मुखीं लावीन आणि त्या रसिक कुटुंबाला म्हणेन, 'मधु मधु मधु! सुमधु! सर्वान्नं मधु!' पण या सगळ्या आकांक्षा कल्पनेंतच राहिल्या आणि म्हणूनच अजूनही त्या चवदार आहेत.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं टांगा ठरवून मीं पांडवलेण्यांचा मार्ग धरला. पण मला त्यांची उत्सुकता असली तरी टांग्याच्या घोड्याला

ती नव्हती. खरें म्हणजे त्या मुंबई–आग्रा राजपथावर त्यानें चारी पायांनीं पळायला हवें होतें. तिकडे जातांना मात्र वाटेंत द्राक्षांचे मळे भेटले. तो तर द्राक्षांचा ऐन हंगाम होता. कालिदासाच्या उपमांसारखे आणि जयदेवाच्या मधुर अष्टपद्यांसारखे द्राक्षांचे घड मांडवाखालीं लोंबत होते. खाऊन तृप्ति सगळेच मिळवितात. पण मी तर पाहूनच तृप्ति पावलों. नगरसीमा ओलांडून कोसभर गेल्यावर मीं माझ्या सारथ्याला विचारलें---

"अजून किती लांब जायचं आहे ?"

"हा काय समोर दिसतो तो डोंगर—"

तो म्हणाला, माझ्या डाव्या-उजव्या हाताला अंतरा-अंतरावर जे उभे सुळके दिसत होते, त्यांतल्या एका 'मध्यस्था'च्या पायथ्याशीं आणून त्यानें टांगा उभा केला. मीं समोर पाहिलें तों त्या डोंगराला मध्यभागीं एक लांबच्या लांब आडवी खांच दिसत होती. दहाबारा मिनिटांत मी तेवढी चढण चढलों. नाशिकच्या नैर्ऋत्येला पांच मैलांवर मी उभा होतों. आणि माझ्या डोळ्यांसमोर चोवीस लेणीं हारीनें उभीं होतीं. पहायला कुठून सुरवात करावी हाच संभ्रम पडला आणि त्याचा निर्णय होण्याच्या आंतच समोरच्या डाव्या हाताच्या एका गुहेंत मी अभावितपणें ओढला गेलों. त्या गुहेला बाहेर पडवी होती, तिला भरदार खांब होते आणि त्यांना यशोदेच्या घुसळणाच्या डेऱ्यासारखी बैठक होती.

काळा कातळ फोडून या गुहा खोदलेल्या आहेत. कांहीं उथळ तर कांहीं राक्षसाच्या बेंबीसारख्या. कांहीं निरुंद तर कांहीं राजवाड्यांतील दिवाणखाना शोभतील अशा. एकदोन ठिकाणीं मधल्या दालनाला दोन्ही बाजूंनीं लहान लहान ओवऱ्या दिसल्या. त्या बहुधा बौद्ध भिक्षूंच्या साधनेसाठीं असाव्या. इ. स. पूर्वी दोनशें वर्षांपासून तों इ. स. च्या चौथ्या शतकापर्यंत हें खोदकाम अखंड चाललें होतें. कारागिरांच्या पिढ्यांमागून पिढ्या छन्नी-हातोडा घेऊन इथें खपल्या आहेत.

डोंगराची संपूर्ण एक बाजू कलावैभवानें नटली आहे. केवढा विशाल दीर्घोद्योग ! जणुं दुसरा भगीरथप्रयत्नच.



ख्रिस्त शकापूर्वी नाशिक क्षेत्राला फार मोठें राजकीय महत्त्व असलें पाहिजे. कारण सगळ्या दक्षिणेसाठीं एक धर्ममंत्री तिथें रहात होता. त्यांतलें एक लेणें त्यानें कोरलें आहे. दुसरें एक इथल्या त्या काळच्या धान्यव्यापाऱ्यांनीं निर्मिलें आहे. ही सगळी बौद्ध धर्मीयांची कारागिरी आहे. पांडवांचा तिच्याशीं संबंध जोडणें हें इतिहासाचें परंपरागत अज्ञान समजलें पाहिजे. अगदीं पहिल्याच लेण्यांत पशूंच्या मजेदार आकृति कोरलेल्या आहेत. आपल्याच मागच्या पायांचें इंद्रगेळ कुरतडणारा बैल, नरभक्षक वाघ, उधळलेला गजराज, स्वतःच्या खुरानें स्वतःचेंच तोंड ओरबाडणारें हरिण, आणि अशा आणखी कांहीं. पण आजमितीस त्या तितक्याशा स्पष्ट दिसत नाहींत. त्यांचें वर्णन ग्रंथांतरींच वाचावें लागतें. दुसऱ्या एका लेण्यांत दुतर्फा उभ्या केलेल्या खांबांच्या मध्यभागीं एक बुद्धस्तूप आहे. आणखी एका खोल आणि रुंद

लेण्यांत एक महाकाय बुद्धप्रतिमा आहे. दोन्ही पाय एका कमळावर सोडून बुद्ध भगवान् त्या ठिकाणीं उच्चासनावर अधिष्ठित आहे. डोंगराच्या पायथ्याशीं त्या तथागत बुद्धाचा कोणी तरी पुजारी असावा. तो त्याच्या-शेजारीं दिवा तेवता ठेवतो आणि दारांतल्याच पांढऱ्या चांफ्याचीं चार फुलें त्याला वाहतो. एका लेण्यांत शिवलिंगही आहे. त्या ओसाड, शिलामय डोंगराच्या काळजांत द्रव असेल अशी कल्पनाच करवत नव्हती. पण एका कपारींत निर्मळ वापी पाहून मन शीतल झालें.

इथल्या भिंतींवर आणि खांबांवर मिळून प्राकृत भाषेंत सत्तावीस शिलालेख कोरलेले आहेत. मी ते वाचण्याच्या भरीला पडलों नाहीं. कारण माझ्याआधींच इतिहासवेत्त्यांनीं ते वाचून विवंचिले आहेत. त्यांतला एक नमुना जातां जातां तुमच्यापुढें ठेवणें उचित ठरेल—

**" सादनवाहनकुले कन्हे राजिनी नासिकेन।**
**संमणेन महामातेण लेण कारितं । "**

' सातवाहनकुलांतला कृष्णराजा राज्य करीत असतां नाशिक येथील श्रमण महामात्यानें लेणें करवलें ' हें त्याचें भाषांतर. १९ व्या लेण्यांतला सर्वांत जुना म्हणजे ख्रिस्तपूर्व ११० वर्षांचा हा शिलालेख आहे.

तिथून बऱ्याच अंतरावर असाच आणखी एक सुळका डोंगर दिसतो, त्यांतल्या लेण्यांना चांभारलेणीं म्हणतात. इथें बुद्धाच्या, तशा तिथें जैन तीर्थंकरांच्या मूर्ति आहेत. अकराबाराव्या शतकांत या बाजूला जैन धर्माची चढती कळा होती त्या वेळीं हीं लेणीं कोरलेलीं आहेत. नाशिकच्या उत्तरेस पांच मैलांवर हें स्थान येतें.

नाशकाहून परत येतांना सिन्नरच्या पुढें एका खेडेगांवांत जत्रा भरली होती. झाडाझुडपांच्या बारक्या डहाळ्या तोडून आणून देवळा-पुढें मांडव घातला होता. जवळच्याच मोठ्या माळावर एक अभिनव प्रयोग चालला होता. लहान पण भरीव चाकांचा एक बैठा गाडा. त्याच्या धुरेला एका अंगाला बैल जोडलेला तर दुसऱ्या अंगाला घोडा. हातांत कासरा धरून वर एक तगडा जवान उभा. असें

तें विचित्र वाहन मैदानांतून पळत होतें. घोडा आणि बैल. दोघांच्या आकारांत आणि स्वभावांत जमीन-अस्मानाचें अंतर. त्या दोघांना एका जोखडाखालीं आणून पळवण्यांत कल्पकता तर होतीच; पण चातुर्य त्याहून अधिक होतें. सभोंवतीं लिंबोणीच्या झाडांखालीं पुंजके करून उभे असलेले ग्रामीण प्रेक्षक डोळे ताणून ती दौड पाहत होते. आमची गाडी थोडा वेळ तिथें थांबली म्हणून मीही तो खेळ पाहूं शकलों. त्या मैदानाचें भलें थोरलें रिंगण घेऊन तो गाडा मूळ ठिकाणीं येत होता. बैलाचे पाय आंखूड आणि बांधा अटकर; त्यामुळें घोड्याच्या गतीशीं मेळ घालणें त्याला जमत नव्हतें. घोड्याला नाखुषीनेंच आपल्या गतीचा संकोच करावा लागत होता. दोघेही आपापल्या परी कुचंबत होते. पण त्यांना असहकार मात्र पुकारतां येत नव्हता. कारण त्यांचा 'दादा' आसूड घेऊन वर उभा होता ना! महाराष्ट्राचें तें कणखर मनगट मधेंच कासरा खेंचीत होतें आणि मधेंच सैल सोडीत होतें. तळपत्या उन्हांत तो मर्द गडी घामानें पुरता निथळत होता. त्यानें आपला प्रयोग पुरा केला. लोकांनीं आरोळ्या ठोकून आणि टाळ्या पिटून त्याचा 'उदो उदो' केला. लोकांचे कौतुकाचे दृष्टिपात झेलीत त्यानें खालीं उडी टाकली. दोन्ही मुक्या प्राण्यांची पाठ थोपटली. खरोखर उत्साहाला शींग आणणारें दृश्य होतें तें. आमची मोटार चालू झाली तेव्हां मला वाटलें तें हें—

आम्ही शहाणेसुर्ते लोक. महाराष्ट्रांत राहतों. महाराष्ट्राचा अभिमानही वाहतों. पण आपण महाराष्ट्र पाहिलेला नाहीं. महाराष्ट्राचा आत्मा कोण-कोणत्या पाकळ्यांनीं फुलतो तें आम्हांला बहुशीं अज्ञात आहे.

---

# ५. ब्रह्मगिरीचा महिमा

नाशिक आणि त्रिंबक. ऐतिहासिक कालापासून हीं दोन्ही नांवें जोडीनें उच्चारलीं जातात. यात्रेकरू हीं दोन्ही क्षेत्रें एकाच वेळीं करतात. पण मला मात्र नाशिकच्या पाठोपाठ त्रिंबक करतां आलें नाहीं. मी दुसऱ्या खेपेला ज्येष्ठमासीं मृगनक्षत्र लागण्यापूर्वीं तिथें गेलों. नाशिक ते त्रिंबक अवघें अठरा मैलांचें अंतर असून अलीकडच्या चार मैलांवरची बाणगंगा ही क्षेत्राची पूर्वसीमा मानलेली आहे.

तिच्याआधीं अंजनेरी पर्वत लागतो. हा डोंगर ज्यानें एकदां पाहिला, त्याच्या तो चिरकाल स्मरणांत राहील. कारण त्याच्यावरची ती काळी, महाकाय वानरी. आपल्या बछड्याला उराशीं धरून ती पाठमोरी बसलेली दिसते. हालत नाहीं कीं डोलत नाहीं. निळ्या आभाळाखालीं रहाते आणि वाऱ्याचे झोत पिऊन जगते. याच ठिकाणीं दीर्घ तप आचरून वज्रकौपीन हनुमंताला जन्म देणाऱ्या अंजनीचें निसर्गानें उभारलेलें हें एक पाषाणरूप स्मारक आहे. मूळचा हा इंद्र-पर्वत. पण अंजनीच्या इथल्या वास्तव्यानें त्याचें मूळचें नांव लोपलें आणि आजमितीस तो अंजनागिरि म्हणजेच ‘ अंजनेरी ’ म्हणून प्रसिद्ध आहे.

हा एक गिरिदुर्ग आहे. तीन बाजूंना कडे तुटलेले असल्यामुळें तिथून वर चढायचा प्रयत्न करणाऱ्याला त्याच्याही वरची स्वर्गाची पायरी चढावी लागेल. दक्षिणेची बाजू तेवढी सुगम आहे. आज तिथें वेणुकुंज निर्माण झालें असलें आणि कारवीच्या झुडपांनीं दाटी केली असली तरी जुन्या काळीं अभीर राजांची ही राजधानी होती. पेशव्यांच्या अमदानींत राघोबादादासुद्धां इथें वसंतविहारासाठीं मुक्काम करीत असे.

६

त्र्यंबकेश्वर हें क्षेत्र पुरातन खरें ; पण त्या काळीं इथें मनुष्यवस्ती नव्हती. सुमारें पांचशें वर्षांपूर्वी त्रिंबक खेड्याची स्थापना झाली ; पण तेंही ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं वसल्यामुळें देवापासून थोडें दूरच होतें. त्र्यंबकेश्वर त्या वेळीं 'वृक्षवल्ली आम्हां सोयिरीं वनचरें' असें मानून राहिलेला होता. झाडावरून स्वाभाविकपणें गळणारी 'फूल-पत्री' आणि 'द्विज'गणांच्या कूजनाचे मंत्र हीच त्याची 'यामपूजा' होती. नागमोडी वाट आणि चोरांचिलटांचें भय यांमुळें यात्रेकरू येत ते सुरक्षित ठिकाण म्हणून अंजनेरीलाच मुक्काम करीत. तिथून सकाळीं जमावानें त्र्यंबकेश्वराच्या दर्शनाला जात आणि क्षेत्रविधि करून संध्याकाळीं पुनश्च अंजनेरी गांठीत.

या क्षेत्राचा खरा उदयकाल आला तो पेशवाईत. नानासाहेब पेशव्यांनीं आपल्या उत्तुंग यशाला साजेसें त्र्यंबकेश्वराचें मंदिर बांधलें. त्रिकाळ पूजेची व्यवस्था केली. जोगळेकर आडनांवाच्या एका सद्गृहस्थांना तिथले कारभारी नेमलें. ब्राह्मण आणि इतर सेवेकरी देवाच्या सान्निध्यांत राहूं लागले. ब्रह्मगिरीच्या पायथ्याचें खेडेंही उठून तिथेंच आलें. क्षेत्र माणसांनीं गजबजलें. त्याची सुव्यवस्थित रचना झाली. इथलें मुख्य तीर्थकुंड कुशावर्त हें होळकर सरकारचे फडणवीस श्री. पारनेरकर यांनीं आठ लक्ष रुपयांवर उदक सोडून बांधून काढलें. १८६६ सालीं इथें नगरपालिकाही स्थापन झाली. प्रत्येक यात्रेकरूकडून चार आणे कर वसूल केला जाऊं लागला. १८७१ सालीं श्री. काशिनाथपंत थत्ते यांच्या खटपटीनें नाशिक ते त्रिंबक पक्की सडक तयार झाली. यंत्रयुग सुरू होण्यापूर्वी या सडकेवर गाडीला जोडलेल्या ढवळ्या-पवळ्यांच्या गळ्यांतले घुंगुर वाजत असत. आजमितीस मोटारींचीं कर्कश शिंगें वाजतात.

संध्याकाळीं पांचाच्या सुमारास मी तिथें पोंचलों. देवळाच्या तटाजवळच गाडी उभी झाली. इथेंसुद्धां पहिली धूळभेट झाली ती शिवाची नव्हे ; तर शिवगणांची. शृंगी, भृंगी, रिटि, तुंडी, इत्यादि कैलासावरचे शिवगण या क्षेत्रांत तीर्थोपाध्याच्या रूपानें अवतरले असल्याचें स्कंदपुराणांत

चक्र लिहून ठेवलें आहे. अनेक वर्षांच्या सरावानें चेहऱ्यावरून जाती-पोटजातीसुद्धां ओळखण्यात ते तरबेज झाले आहेत. माझ्यापुढें उभा राहिलेला उपाध्या कोंकणस्थ होता आणि मी त्याच्याच जातीचा असल्याचें त्यानें नक्की हेरलें होतें. माझें कुळगोत्र आणि पूर्वजांची नामावळ विचारून घेऊन त्यानें आपलें वहीखातें उघडलें. पण त्यांत कोणाचाच मागमूस लागेना. वस्तुतः तेवढ्यावर त्यानें मला सोडायचें; पण तसें न करतां तो नवें पौरोहित्याचें अधिकारपत्र लिहून द्या म्हणून हटून बसला. मीं त्याला शिताफीनें टाळलें आणि पुढें जातां जातां मोरोपंतांच्या शब्दांत स्वतःला शाबासकी घेतली—

**'जेणें न चित्रगुप्ता, लावुं दिला टांक आपुल्या वहिला'**

श्री. गोपाळराव मराठे या सद्‌गृहस्थांच्या घरीं मी उतरलों होतों. माझें आगत-स्वागत केल्यावर ते मला म्हणाले, 'अजून थोडा दिवस आहे. तुम्ही नीलपर्वतावर जाऊन या आणि तसेच त्र्यंबकेश्वराच्या मंदिरांत चला. तोंवर प्रदोषपूजेचा समय होईल.'

गांवाच्या उत्तर सीमेला लागूनच ही टेकडी आहे. दगडी पायऱ्या बांधलेल्या असल्यामुळें चढायला सोपी आहे. विराट् त्र्यंबकाची ही डावी मांडी समजली जाते. दत्त अवधूतानें इथें तप केलें. महेंद्रपर्वताप्रमाणेंच परशुरामाची हीही एक तपोभूमि होती. इथला नीळकंठेश्वर त्यानेंच स्थापिला आहे. मला वाटलें, समुद्राला मागें हटवून कोंकणची भूमि तयार करण्याचे मनोरथ परशुरामानें इथेंच बसून केले असतील का? केवढा क्रांतिकारी अद्‌भुत प्रयोग होता तो! त्याला लागणारें सामर्थ्य आणि वरप्रदान ज्वालामुखीच्या रूपानें याच ज्योतिर्लिंगानें दिलें असेल का? कारण हें स्थान कोंकण आणि मावळ यांच्या सीमारेषेवरच आहे. इथली नीलांबिका देवी स्वयंभू अतएव ओबडधोबड शिला आहे. तिलाच भजकांनीं कानडोळे तयार करून इतर भागाला शेंदूर माखला आहे. तिच्या डाव्या हाताला मटंबा देवीचें लहानसें मंदिर आहे. 'मटंबा' या शब्दाची व्युत्पत्ति मला कळली नाहीं. कोणी सांगणाराही भेटला नाहीं. ही नीलांबिका म्हणजे

तरी कोण ? कोण्या अज्ञात काळीं ज्वालामुखींतून उद्भवलेली आणि गगनाच्या ‘ निळावंती ’ला चाटूं पहाणारी निळी अग्निज्वाला तर नव्हे ?

याच देवीच्या शेजारीं नंग्या साधूंचा ‘ दसनाम आखाडा ’ आहे. यात्रिकांकडून देवाच्याबरोबर त्यांनाही दिडकी–आणेली मिळते. देवीची पत्रावळ तिथें यांचा द्रोण. मी प्रदक्षिणा करून आणि देवद्वारींच्या डेरेदार बकुळीखालीं थोडा वेळ विसावून खालीं निघालों तेव्हां माझ्यापुढें कांहीं गुर्जरी उतरत होत्या आणि सुरांत सूर मिळवून आपल्या ‘ डाकोरजी ’-च्या बाललीलांचें कसलें तरी गाणें म्हणत होत्या. मला वाटलें, त्रिपुर-विजयाचीं गाणीं गात किन्नरींचा समुदायच हिमाचलाच्या शिखरावरून खालीं उतरत आहे. फक्त वेणुरंध्रांतून सप्तसुरांच्या रूपानें बाहेर पडणाऱ्या वाऱ्याची साथ आणि मेघांच्या धिमधिमत्या मृदंगाचा ताल एवढीच काय ती उणीव.

मी त्र्यंबकेश्वराच्या मंदिरांत येण्यापूर्वींच सूर्यानें प्रतीचीच्या मंदिरांत पाऊल टाकलें असलें तरी अजून तिनें दार लावून घेतलें नव्हतें. आरक्त संधिप्रकाश सर्वत्र खेळत होता. तेवढ्या अवधींत मला सगळें पाहून घेणें शक्य होतें. ते दिवस आगोटीचे असल्यामुळें ढगांचीं टेहेळणीपथकें गगनांत इतस्ततः संचरूं लागलीं होतीं. त्यांचा पुढारी शोभेल असा एक कृष्ण मेघ नेमका देवळाच्या माथ्यावर रेंगाळत होता. कालिदासाच्या यक्षानें ‘ कुठें काय कर ’ तें विज्ञापून पाठवलेला संदेशहर मेघ तो हाच असें मीं कां म्हणूं नये ? आतां या प्रदोषकाळीं शिवशंकर तांडव आरंभील. हा त्याच्या पाठीवर डवरून त्याची ओलें गजचर्म पांघुरण्याची गरज भागवील. आणि याची ही शिवभक्ति पाहून प्रसन्न झालेली पार्वती याच्यावर कौतुकाचे कटाक्ष टाकील. आमचे डॉ. श्रीखंडे आपल्या मेघदूताच्या अनुवादांत काय सांगतात पहा—

> “ रक्ततेज संध्यारुण शोभणारें
> जास्वंदिच्या रक्तसुमासमान
> रक्तार्द्र ऐसें गजचर्म ल्यावें
> ही शंभुकांक्षा हर तूंचि पूर्ण ”

मी महाद्वारांतून शिरून गाभाऱ्यापर्यंत पोंचलों. आंत समया जळत होत्या. उदबत्त्यांचा घमघमाट सुटला होता. मधोमध अभिषेकपात्र टांगलेलें होतें; पण त्याखालीं शिवलिंग मात्र दिसत नव्हतें. मीं म्हटलें, अभिषेक काय नुसत्या शाळुंकेलाच? पण खरा प्रकार तसा नव्हता. इथें शिवलिंग शाळुंकेच्या वर नाहीं; तर घागरभर पाणी मावेल एवढ्या उखळासारख्या खोलगट जागीं आहे. आणि तेंहि एक नसून अंगुष्ठमात्र अशीं तीन आहेत. ब्रह्मा-विष्णु-महेश. रज, सत्त्व आणि तम. विधाता, पाळिता, आणि संहर्ता अशा तीन अधिकारांचे तिन्ही देव एकत्र. त्यांत त्र्यंबकेश्वर महादेव मुख्य. त्याच्या मस्तकावर एक लहानशी चीर आहे. त्यांतून गंगेचा द्रव निघत असतो. तें उखळ पुसून टिपून कोरडें केलें तरी थोड्या वेळांत तिथें पाणी सांठतें. तिथूनच कधीं काळीं सिंहनाद उठतात. क्वचित् प्रसंगीं ज्वालाहि उमटतात. लिंगस्थान तापून निघतें. पंचामृताच्या घागरी ओतल्या तरी त्या कुठल्या कुठें गडप होतात. कांहीं वेळानें मग त्रिपुरांतक शांत होतो. ज्वाला अदृश्य होतात आणि पूर्वी ओतलेला गोरस उद्गाररूपानें बाहेर निघतो. चिकित्सक म्हणतात कीं, खालीं भूगर्भांत ज्वालामुखी असला पाहिजे. भाविक म्हणतात, 'अहो, ज्वालामुखी कसला? त्र्यंबकानें तिसरा अंबक म्हणजे डोळा उघडला कीं त्यांतून या ज्वाला निघतात.'

वसिष्ठमुनीचा मंत्र म्हणत मीं साष्टांग नमस्कार घातला.

**"त्र्यंबकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम्**

**उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात्"**

आंगिरस कुत्साचें तें वैदिक सूक्त मला पाठ येत होतें. तो म्हणतो, 'रुद्र म्हणजे साक्षात् पराक्रम! किती सुंदर त्याचा जटाभार! भुजदंड कसे वज्रासारखे दणकट. तो गौरवर्ण आहे. त्याचा किरीट प्रकाशमय आहे. तो नानारूपें धारण करतो. त्याच्या हातांत धनुष्यबाण आणि गळ्यांत पुष्पहार शोभतात. तो सिंहासारखा उग्र असून त्याचा क्रोध जाज्वल्य आहे.'

गृत्समद त्याच्याकडे मागणें मागतो. स्वतःसाठीं नव्हे, तर सर्व जनांसाठीं-'हे रुद्रा! पुत्रपौत्र आणि सेवक यांच्यासह आमची अभिवृद्धि कर. आम्हांला औषधांचें ज्ञान देऊन आमच्या जखमी सैनिकांचे घाव बुजव. आमच्यावर अभीष्टसिद्धींचा वर्षाव कर. आमच्यांतली द्वेषबुद्धि नाहींशी कर. आमच्या ज्ञानसूर्यावर आभाळ येऊं देऊं नको!'

हीं स्तोत्रें आणि या प्रार्थना वैदिक ऋषींनीं केलेल्या असल्या तरी वैदिक आर्यांना लिंगपूजा मान्य होती, असें मात्र कोणीं समजूं नये. भग-लिंग हें पूजनीय प्रतीक म्हणून स्वीकारायला वैदिक ऋषींचें संस्कारी मन तयार नव्हतें. त्यांना त्या गोष्टीचा तिटकाराच होता.

"मा शिश्नदेवा अपिगुर्ऋतं नः"

'शिश्नपूजक आमच्या सत्कर्मांत विघ्नें न करोत' अशा त्यांच्या स्पष्ट प्रार्थना आहेत. पण पुढें परिस्थिति अशी आली कीं, ज्याला नांवें ठेवलीं तेंच ग्राह्य म्हणून वाखाणावें लागलें. वैदिक आर्य सोडले तर भारतांत आणि इतर अनेक देशांत त्या काळीं लिंगपूजा सर्वत्र रूढ होती. पृथ्वीतलावर सर्वत्र लिंगपूजकांचाच भरणा होता. या गोष्टीच्या खुणा आजही जगभर सापडतात. भारतांतहि बहुसंख्य जाती-जमाती लिंगपूजकच होत्या. बारा ज्योतिर्लिंगें हीं भरतखंडांतल्या आदिवासींचीं प्रमुख क्षेत्रें असलीं पाहिजेत. यात्रा, उत्सव, पर्वे, इत्यादि प्रसंगीं त्या त्या भागांतले लोक या ज्योतिर्लिंगांच्या दर्शनासाठीं जमत असले पाहिजेत. पुढें आर्य लोक भरतखंड व्यापूं लागले. बहुसंख्य लिंगपूजकांशीं त्याना हरघडी प्रसंग येऊं लागला. एवढ्या मोठ्या जनसमूहाशीं कायमचा दुरावा ठेवण्यापेक्षां त्यांना प्रेमानें वश करून आपल्या संस्कृतींत आणणें हेंच हितावह होय असें त्यांनीं ठरविलें. त्यांना स्वीकारायचें, आपल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत बसवायचें, तर त्यांच्या उपास्य देवतेसह त्यांना जवळ करणें भाग होतें. आर्यांनां लिंगपूजा स्वीकारली खरी; पण तिच्यांतला ग्राम्यपणा काढून टाकला. शाळुंका हें भगाचें प्रतीक नसून यज्ञवेदीचें आहे आणि त्यावरचा महादेव हा लिंगाचें प्रतीक नसून यज्ञीय अग्नीच्या ज्वालेचें

प्रतीक आहे अशी नवी कल्पना त्यांनीं बसवली. मूळच्या लिंगपूजकांचेंही मन जसजसें विकसित होऊं लागलें, तसतशी त्यांच्याही उपासनेंतील लिंगविषयक अश्लील कल्पना धुऊन निघूं लागली आणि कालांतरानें लिंगपूजेचें पूर्णतया पवित्रीकरण झालें. आर्यांनीं आपला रुद्र आणि अनार्यांचा लिंगदेव यांना एकरूप करून टाकलें. वेदांतलें रुद्रवर्णन लिंगावर आरूढ केलें. यजुर्वेदांतल्या रुद्राध्यायाच्या पठनानें लिंगावर अभिषेकाची धार पडूं लागली.


पूर्वकाळीं हीं लिंगें भव्योत्तुंग असत. काशीविश्वेश्वराचें प्राचीन लिंग सत्तर हात उंच होतें अशी माहिती मिळते. कित्येक ठिकाणीं एखाद्या गिरिशिखरालाच शिवलिंग मानल्याचें दिसून येतें. कैलासाचें गौरीशंकर शिखर हें त्यांपैकींच एक आहे. त्रिंबकच्या ब्रह्मगिरीचे जे पांच उभे सुळके आहेत तेहि लिंगरूपच मानलेले आहेत. सद्योजात, वामदेव, ईशान, अघोर आणि तत्पुरुष अशीं त्यांचीं नांवें आहेत. या सर्वांना मिळून विराट् त्र्यंबकेश्वर म्हणतात.

पुढें बौद्ध धर्माची भारतव्यापी लाट उसळली. बौद्धांनीं धनिक श्रेष्ठींच्या औदार्याच्या बळावर मोठमोठे विहार बांधले. डोंगर पोखरून प्रशस्त, सुंदर आणि कलाकुसरीचे चैत्य आकाराला आणले. त्यांतून बुद्धस्तूप आणि पुढच्या काळांत बुद्धमूर्ति स्थापल्या गेल्या. त्याच अनुरोधानें नंतर हिंदु देवतांचींहि मंदिरें निर्माण होऊं लागलीं. त्यांतच शिवोपासकांनीं आपल्याहि आराध्य लिंगासाठीं मंदिररचना केली. एखादें गिरिशिखर अथवा साठसत्तर हात उंचीचें शिवलिंग अर्थातच त्या मंदिरांत बसणें शक्य नव्हतें. प्रतीकाएवढें देऊळ मोठें होणें अशक्य तर मंदिरांत मावेल, शोभेल अशा बेतानें प्रतीकच लहान करणें हाच उपाय सोयस्कर ठरला. अशा रीतीनें भक्तपराधीन महादेव ‘ घरासारखा पाहुणा ’ बनला.

इतर देवतांचीं प्रतीकें निर्माण होण्यापूर्वीं शिवाचें प्रतीक निर्माण झालें म्हणूनच त्याला आदिदेव अशी संज्ञा मिळाली आहे. पुढें आर्य-अनार्य संकेत आणि कल्पना एकत्र करून त्या घटक द्रव्यांनीं महादेवाला सगुण साकार करण्यांत आलें. कैलास ही त्याची वतनवाडी ठरली.

स्मशान ही क्रीडाभूमि झाल्यामुळें चिताभस्माचें चर्चन त्याच्या 'कपाळीं' आलें. पांच मुखें, तीन डोळे अशा विषम अवयवांची मूर्ति, गळ्यांत नरमुंडांच्या माळा, अंगावर नागभूषणें, मस्तकीं गंगा हें त्याचें 'ध्यान' ठरलें. 'रोदयति सर्वं अंतकाले इति रुद्रः' ही व्याख्या जमेस धरून विश्वाच्या संहारणीचें क्रूर कर्म त्याच्याकडे सोंपविलें गेलें. त्याच्याभोंवतीं अनेक कथांचा पट विणण्यांत आला. हळूहळू आर्यांच्या अंतःकरणांतलें त्याच्याविषयींचें 'परावेपण' लोपून रामायण-महाभारतकालीं महादेव पूर्णपणें शरण्य झाला आणि सर्वांच्या हृदयांत भरून उरला.

त्र्यंबकेश्वर वीतराग जोगी. आपल्या आकिंचनपणाचा त्याला अभिमान आहे. 'कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः' असें तो समजतो. बहुजन-समाजाच्या देवानें असेंच असलें पाहिजे. पण पेशव्यांनीं त्याला इथें श्रीमंत केलें आहे. वार्षिक बारा हजारांवर त्याचें उत्पन्न आहे. मंदिराला पांच सोन्याचे कळस आहेत. पंचमुखी सुवर्णाचा मुखवटा आहे.



सणावारीं घालायचा त्याचा रत्नजडित मुकुट अलंकारिक भाषेंत बोलायचें तर पृथ्वीमोलाचा आहे. हा मुकुट मूळचा म्हैसूरचा. मुसल-मानांनीं तो दिल्लीस नेला. आणि पेशव्यांनीं त्यांच्या जामदारखान्यांतून खेचून काढून त्र्यंबकेश्वराच्या मस्तकीं कृतार्थ केला.

दर्शन करून प्रदक्षिणेसाठीं मी बाहेर आलों. श्रीयंत्राकार असें तें मंदिर सर्व बाजूंनीं पाहिलें. नाशिक येथील मंदिराप्रमाणेंच हेंही मंदिर हेमाडपंतीच आहे. भोंवतीं तट आहे. हजारों लोक सुखेनैव बसूं शकतील असें चारी बाजूंनीं पटांगण आहे. इथली स्वच्छता ताबडतोब लक्षांत येतें. आपण पुण्यक्षेत्रांत आलों आहों, हें मनाला बळें बळें शिकवावें लागत नाहीं. समोर शुभ्र पाषाणाचा नंदी आहे. आणि मागच्या बाजूला निर्मल जलाची पुष्करिणी आहे. अभिषेक हा शंकराचा सर्वांत आवडता उपचार. ‘ जलधाराप्रियः शिवः । ’ कधीं काळीं विश्व-कल्याणासाठीं प्राशन केलेल्या हालाहलाचा दाह शमवण्यासाठीं त्याला मस्तकावर पाण्याची धार धरलेली हवी असते. अशाच अभिषेकासाठीं एक ब्राह्मण त्या पुष्करिणींतल्या जलाच्या घागरी देवळाच्या पृष्ठभागीं एका कंगोऱ्याजवळ नेऊन ओतीत होता. हा काय प्रकार आहे अशा जिज्ञासेनें मी जवळ गेलों. तें देऊळ बांधतांनाच तिथें एक दगडाची पन्हळ ठेवलेली आहे आणि बाहेरच्या बाजूस एक लहानसें कुंड केलेलें आहे. त्यांत पाणी ओतलें कीं, पन्हळीच्या द्वारें सरळ जाऊन तें गाभाऱ्यांतल्या हौदांत सांठतें. पूर्वेला मंदिराचें मुख्य द्वार असून त्या बाजूला कोरीव नक्षीकाम उत्तम प्रकारचें आढळतें. पक्षद्वारांच्या घुमटीला बाहेरच्या बाजूनें कमळें कोरलेलीं आहेत. तीं दगडाचीं असूनहि कोमल, नितळ आणि टवटवीत दिसतात. फक्त उणीव काय ती सुगंधाची. पण त्या बाबतींत त्या शिल्पकारांचा इलाज नव्हता. कारण,

**“ तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ”**

नगरखान्याच्या महाद्वारांतून बाहेर पडतों तर तिथें कांहीं गुजराती स्त्री-पुरुष यात्रिकांचा घोळका उभा होता. दोन क्षेत्रोपाध्ये आपापल्या वह्या दाखवून त्या लोकांना आपापल्या घरीं ओढण्याचा प्रयत्न करीत होते. एक जण सांगत होता, ‘ हें पहा, तुमच्या वडिलांचें नांव माझ्या वहीवर आहे. ’ पण यजमानाला तें पटेना. तो म्हणत होता, ‘ तारुं नाम खोटुं छे ! ’ भटजी म्हणत होता, ‘ खोटुं केम ? खरुं छे ’ ! मीं मनांत

म्हटलें. नाम–रूपें सगळींच खोटीं आहेत. त्यासाठीं ही तोंडातोंडी कशाला ? त्यापेक्षां नाम-रूपातीत जो त्र्यंबकेश्वर, त्यालाच शरण जाणें बरें नाहीं का ?

सकाळीं एक मार्गदर्शक बरोबर घेऊन मी ब्रह्मगिरीच्या वाटेला लागलों. सकाळ सुंदर होती. मनांत उल्हास होता. शरीर ताजेंतवानें होतें. पहाड चढण्याची त्यानें हिंमत बांधली होती. एका मैलाचा फेरा वांचवून माझा वाटाड्या मधल्या वाटेनें मला नेमका पायथ्याशीं घेऊन जाणार होता. करवंदीच्या जाळीमधून आमची पाऊलवाट जात होती. पायथ्याच्या टेकड्यांवर मधून मधून काळे चौकोनी चट्टे दिसत होते. तिथल्या डोंगरी शेतकऱ्यांनीं पालापाचोळा घालून ती जमीन भाजून ठेवली होती. पावसाच्या पहिल्या ओलीवर ते त्यांत नाचणी पेरून रोपें काढणार होते आणि नांगरलेल्या किंवा खणून घेतलेल्या प्रांतभूमीवर तीं रोपें उपटून लावणार होते. समतळ भागांत भात आणि डोंगरावर नाचणी–वरी हीं इथलीं मुख्य पिकें. आमच्या गोमंतकांतही डोंगरावरची जमीन भाजून नाचणी पेरतात ; पण इथल्यापेक्षां तो प्रयोग महान् आणि सामुदायिक असतो. बारके बारके उंचवटे चढत उतरत आम्ही एका आमराईत आलों आणि उभ्या ब्रह्मगिरीच्या पायाशीं ठाकलों. आतां पुढचें पाऊल टाकायचें त ब्रह्मगिरीच्या देहावर. कल्पना येतांच मन चरकलें. आणि याला कारण पुराणांत वाचलेली एक कथा.

एक दिवस ब्रह्मा-विष्णु एकत्र झाले. सुखसंवाद करीत असतां ब्रह्मदेवानें आढ्यता मिरवली, 'शिवमहिमा अगम्य म्हणतात ना ? पण मीं तो जाणला आहे.' श्रीहरीला नवल वाटलें. 'असंख्य वर्षें तप आचरूनहि मला जें आकळलें नाहीं तें तुला सहजासहजीं कसें कळलें ?' त्यानें विचारलें. चर्चा होतां होतां शेवटीं तो प्रश्न निकरावर आला. दोघांत एक पैज ठरली. विष्णूनें शिवाच्या चरणांचा ठाव पहावा आणि विधात्यानें मस्तकाचा शोध घ्यावा. जो स्वीकृत कार्यांत यश मिळवील त्यानेंच शिवमहिमा जाणला असें समजावें. दोघेहि आपापल्या मार्गांनीं

निघाले. कांहीं काळानें वैकुंठनायक निराशा पदरीं घेऊन परत आला. ब्रह्मदेवाचीहि तीच गत झाली होती; पण त्यानें बेधडक सांगितलें कीं, 'मी शिवमस्तकावर फूल वाहून आलों. हवी तर या धेनूची आणि केतकीची साक्ष घे.' विष्णूचा त्यावर विश्वास बसणेंच शक्य नव्हतें. त्यानें तें प्रकरण खुद्द महादेवापुढें नेलें. सर्वसाक्षी ईश्वराला विधात्याची लबाडी उमगली. 'ज्या अर्थीं तूं असत्याचा आश्रय केलास त्या अर्थीं आजपासून जनांना तूं अपूज्य होशील!' शंभु शापवाणी वदला. ब्रह्मदेवाचा अहंभाव डिवचला गेला. त्यानें क्रोधानें फुंफाटत शंकराला प्रतिशाप दिला कीं, 'तूं पृथ्वीवर जड पर्वत होऊन पडशील!'

मीं आतां या पर्वतावर चढायचें म्हणजे ज्याच्या चरणीं ललाट घासायला आलों, त्यालाच पायदळीं तुडवायचें. पण ऐन वेळीं तत्त्वज्ञानानें हात दिला. हा पर्वत जर शिवरूप; तर मीहि तसाच नाहीं का? 'तत्त्वमसि' हें महावाक्य काय सांगतें?

**"तुज मज ऐसी परी। जैसे तरंग सागरीं"**

सागराच्या पृष्ठभागावर लाटा उंचावतात; पण तिथें कोणावर कोण चढलें? कारण दोन्ही मिळून एकच जल. चढण्याची क्रिया मानायची तर आपणच आपल्या खांद्यावर चढलों असें म्हणावें.

झालें. शंका आली तशी गेली. मीं चढायला प्रारंभ केला. पंजाबांतल्या दोन उदारधी धनवंतांनीं १९०८ सालीं पांचशें पायऱ्या बांधून हा ब्रह्मगिरि सुगम केला आहे. पूर्वीं पुष्कळसे यात्रेकरू दुरूनच त्याला नमस्कार करीत. पण आज सामान्य शक्तीच्या व्यक्तीलाही तो अल्पायासानें चढतां येतो. पण ज्यांना एवंढीहि धमक नाहीं किंवा ज्यांचा खिसा गरम आहे त्यांच्यासाटीं इथें पाळणे मिळतात. खांद्यावर पाळण्याचा दांडा आणि हातांत आधारदंड घेऊन इथले कोळी चालतीं बोलतीं ओझीं वर नेऊन खालीं आणतात. पण ब्रह्मगिरि असा खडतर आहे कीं, ठराविक जागीं तो हे ओझ्याचे पाळणे वर चढूंच देत नाहीं. पैशानें 'बस-ऊठ' करणारा नवकोट नारायण असला तरी त्याला पाळण्यांतून उतरून त्या

शिडीसारख्या उभ्या शेंदीडशें पायऱ्या स्वतःच्या पायांनींच चढाव्या लागतात.



आम्ही थोडेंसें चढतों तोंच आजूबाजूच्या कपारींतून कांहीं माकडें पुटपुट बाहेर आलीं आणि त्यांनीं आमची पाठ धरली. माझ्याकडून कांहीं तरी 'चांव म्यांव' मिळेल या आशेनें तीं येत होतीं. पण माझा खिसा रिकामा होता. गांवांतून निघतांना मला कोणीं तरी तशी सूचना दिली असती तर मीं कांहीं तरी आणलें असतें. बिचाऱ्यांची निराशा झाली आणि बऱ्याच वेळानें तीं मागें परतलीं. दोघां माकडांनीं खालच्या झाडावर उडी मारून त्याच्या डहाळीला लोंबकळतांना माझ्याकडे अशा तुच्छतेच्या दृष्टीनें पाहिलें कीं, "तीं पहा, खालून आणखी माणसें वर येत आहेत. तूं दिलें नाहींस तर तीं देतील. 'एक घर उणं तर दस घर पुणं.'"

डोंगर चढतांना मधून मधून सिंहावलोकन करण्यांत मोठी गंमत असते. टप्प्याटप्प्याला नवे नवे प्रांत दिसूं लागतात. क्षितिजाचा घेर वाढतो.

आपण जगापेक्षां उंच असल्याची ऐट चढते. क्षणभर विश्रांति घेतल्यानें धापावणारें हृदयही प्रकृतीवर येतें. खालून पहातांनी ब्रह्मगिरीची मेखला शोभेल असा हिरव्या झाडीचा आडवा पट्टा ज्या ठिकाणीं दिसत होता, तिथें आतां आम्ही येऊन पोंचलों होतों. सूर्याच्या खालच्या भागाचे ढग वितळले होते. एवढा वेळ धूसर दिसणाऱ्या खालच्या त्रिंबक गांवावर प्रकाशाचा झोत पडत होता. वृक्षशिखरांच्या फटींतून किरणबाण खालीं घुसत होते. अपर्णेचे वाटोळे आरसे शोभतील असे ते खालचे गौतमालय आणि गंगासागर हे दोन्ही तलाव तेजानें निथळत होते. सूर्यनारायणाचा तो 'चिद्विलास' खरोखरीच नेत्रदीपक होता. पण तो फार वेळ टिकला नाहीं. नव्या दमाच्या मेघांनीं आक्रमण करून सूर्याला आच्छादून टाकलें.

मी पठार गांठलें आणि समुद्रसपाटीपासून सव्वाचार हजार फूट उंच झालों. तिथल्या वाऱ्याच्या वाहणींत एक निराळेंच चैतन्य अनुभवायला मिळालें. विचार केल्याअंतीं तें वायूंचें प्रयाग होतें. देशावरचा अन् कोंकणचा असे दोन वारे त्या ठिकाणीं उराउरीं भेटत होते. उभयतांचें द्वैत मोडत होतें. कोंकणांतल्या वाऱ्यानें हापूस आंब्याचा आणि कापऱ्या फणसाचा स्वादुगंध आपल्या देशावरच्या भावाला उपायन म्हणून आणला असावा. देशावरच्या वाऱ्यानें कशाची बरें प्रतिभेट आणली असेल? कोंकणचा वारा 'झूंझूं' या शब्दानें सागरतांडवाच्या फेंसाळ गोष्टी आपल्या दादाला सांगत होता. देशावरचा भाऊ गोदाप्रवाहाचें आणि मावळभूमीचें इत्थंभूत वर्तमान त्याला निवेदीत होता. आणि मी?—मी त्या 'येरयेरांच्य मिळणींत' जी आनंदकल्लोळांची वेणी पडत होती, तिच्यांतला एक पेड बनून झुलत लहरत राहिलों होतों.

पूर्वेला तोंड केलें कीं शिवबाच्या शिलेदारांची खाण मावळभूमि दिसत होती आणि पश्चिमेला वळतांच तुटलेले कडे, विखुरलेल्या टेंकड्या आणि गंभीर दरीखोरीं अशा स्वरूपांत ठाणें जिल्ह्यांतली कोंकणभूमि दृष्टिपथांत येत होती. मी जिथें उभा होतों तिथून पूर्व बाजूला अंतरा-अंतरावर अनेक डोंगर मधेंच उपटलेले दिसत होते. सर्वांची तऱ्हा एक. पूर्व बाजूनें उतार आणि पश्चिम बाजूनें तुटलेली कड. यांच्या जाडीमधें

आणि उभारणीमधें आश्चर्यकारक समता आहे. सर्वांचीं पठारें रुंद, समतळ आणि सारख्या उंचीचीं. एखाद्या विस्तीर्ण फरसबंदी गच्चीचे मधले चिरे खालून कोणीं तरी वर उचलावे, तशी या पर्वतश्रेणीची रचना आहे. हे पर्वत जन्माला घालतांना धरतीमातेला हृदयभेदक प्रसववेदना भोगाव्या लागल्या आहेत. सह्याद्रीचा हा सगळा पाश्चिम भाग कोण्या अज्ञात काळीं झालेल्या ज्वालामुखींच्या प्रचंड स्फोटांतून वर आलेला आहे. हीं उत्पाती डोंगरवाळें लटपटून पडूं नयेत म्हणून भूमातेनें त्यांना एका बाजूनें मायेचा हात दिलेला आहे. काळया फत्तरांच्या उंच सुळक्यांना पूर्वेच्या बाजूनें मातीच्या टेंकड्या चिकटलेल्या दिसतात तें मागाहून पृथ्वीनें आपलें उचललेलें अंग होय. या स्फोटापूर्वीं पाश्चिम सागर खरोखरीच सह्याद्रीचे पाय धूत होता.

**" युगयुगें घेउनी लोळण पायांवरी**
**गिरिकडे कशाची सागर विनती करी "**

हें श्री. काणेकरांचें काव्य एका काळीं यथार्थवचन होतें. पण या आकस्मिक उत्पातानें समुद्राचा तळ वर आला आणि पाणी मागें रेटलें गेलें. सह्य आणि समुद्र यांच्यामधें एक नवी भूमीची पट्टी तयार झाली. अपरान्त असें तिला नांव मिळालें. ठाणें जिल्ह्यांत ही पट्टी रुंद आहे आणि खालीं निमुळती झालेली आहे. यावरून स्फोटाचें मुख्य केंद्र या भागांतच असलें पाहिजे हें अनुमानानें जाणतां येतें आणि त्याला भूगर्भशास्त्राचा दुजोराही मिळतो.

ब्रह्मगिरीच्या या मुख्य पठारालाच किल्ला अशी संज्ञा आहे. आज तिथें किल्ल्यासारखें कांहीं विशेष आढळत नसलें तरी एका काळीं याला बावीस बुरूज आणि बारा गेटा होत्या. रणझुंजार पुरुष अजिंक्य आणि अभेद्य म्हणून या किल्ल्याला ओळखीत. यादवांनीं हा आणि असेच कांहीं किल्ले आजूबाजूंच्या सुळक्यांवर उभारून आपल्या राज्याला बळकटी आणली होती. पण अशा अभेद्य किल्ल्यांवर आधारलेलें यादवांचें राज्य केवळ संघटनेचा अभाव आणि फितुरी या दुर्गुणांमुळें कोलमडून पडलें. शिवाजीमहाराजांचा जन्म झाला त्याच वर्षीं हा किल्ला शहाजहाननें

काबीज केला. १७२० मध्यें त्याच्यावर निजामाचें आधिपत्य आलें. पुढें १७५२ सालांत मराठ्यांनीं तो आपल्या ताब्यांत घेतला. पेशव्यांच्या अमदानींत हा चांगल्या स्थितींत होता आणि इथें शिबंदीही होती. त्यानंतर इंग्रजांची धाड आली. इथल्या थोड्याशाच सैन्यानें खालून मारा करणाऱ्या इंग्रज सैन्यास बराच काळपावेतों दाद दिली नाहीं. पण अखेर इथेंही फितुरीच भोंवली आणि पेशव्यांना किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन करावा लागला. त्रिंबक किल्ला पडल्याची धास्ती इतरांनींही घेतली आणि याच्याचसारखे इतर सोळा बळकट किल्ले यत्किंचित् प्रतिकार न होतां इंग्रजांच्या हातीं पडले.




ब्रह्मगिरीच्या पलीकडच्या पालथणाला थोडेंसें खालीं उतरल्यावर आपण मूळगंगेच्या स्थानीं पोंचतों. गौतमऋषीच्या पापक्षालनासाठीं शंकराच्या आज्ञेनें गंगा इथें अवतरली. याच भागांत प्राचीन काळीं गौतमाचा आश्रम होता. मावळांत भात पिकवण्याचा पहिला यशस्वी प्रयोग केला, तो यानेंच. आजूबाजूला अवर्षण झालें तरी इथें पाऊस भरपूर पडे. गौतमानें पेरलेलें महामूर पिके. इतर ठिकाणीं दुष्काळानें पीडलेले ऋषि-मुनि गौतमाच्या तपोभूमींत आसरा घेत. एक दिवस एक रोडकी गाय त्याच्या शेतांत घुसली. पोटरीस आलेलें भात आडव्या

जिभेनें चाटूं लागली. हाडाच्या शेतकऱ्याला तें कसें सहन व्हावें ? त्यानें मुठींतला एक दर्भ तिच्या अंगावर फेंकला आणि दुर्दैव असें कीं, ती गाय तत्काळ गतप्राण झाली. गोहत्येचें पातक म्हणजे पंचमहापातकांपैकीं एक. गौतमाचें काळीज गलबललें. आत्मराज निस्तेज झाला. जवळच्या धर्मवेत्त्या ऋषींना त्यानें पापमुक्त होण्याचा उपाय विचारला. त्यांनीं शंकराची आराधना उपदेशिली. अनेक वर्षें देहाचें काष्ठ करून त्यानें महादेवाला आळवलें. एक दिवस शिव प्रसन्न होऊन 'वरं ब्रूहि' म्हणाला. गौतमानें त्याच्या जटेंतली गंगा मागितली. शिव म्हणाला, 'गंगे, खालीं उतर आणि या तपोधनाचें पाप धुऊन टाक.' गंगा तयार होईना. तिला शिवाची जवळीक सोडवत नव्हती. शेवटीं शंभु खवळला आणि त्यानें आपल्या जटा आपटल्या. गंगा निरुपायानें खालीं आली. गौतम तिच्या स्नानानें गोहत्येच्या पापांतून मुक्त झाला. गौतमानें आणली म्हणून लोक तिला 'गौतमी गंगा' म्हणूं लागले. पण गोदावरी या नांवानेंच ती विख्यात झाली. सांप्रत एका औदुंबराच्या झाडाखालीं एका खोलशा कुंडांत, पाऊलसुद्धां बुडणार नाहीं इतक्या प्रमाणांत ही मूळगंगा इथें दिसते. मी तिच्या जलानें नेत्रस्पर्श आणि मार्जन करून वर आलों. इथून थोड्याशा अंतरावर एका दगडावर कांहीं रेषा उमटलेल्या दिसतात, त्याच शंकराच्या आपटलेल्या जटा.

हीच गौतमी गंगा गिरिगर्भांतून प्रवास करून पर्वताच्या पूर्व भागाला प्रगटली. लोकांनीं त्या गंगाद्वारावर 'गायमुख' बांधलें. त्याच्या वरच्या बाजूस गंगेची मूर्ति स्थापून तिच्यावर लहानसें मंदिरही उभारलें. दोन उंच कडे एकमेकांना मिळाले आहेत अशा संधींत हें गंगाद्वार आहे. डाव्या कड्यावरची शिळा थेट घुमटाच्या आकाराची आहे. ब्रह्मगिरि याच ठिकाणीं खरा 'रौद्र' दिसतो. ठिबकणाऱ्या गंगेच्या शेजारचें वराहतीर्थ डोंगराच्या कपारींत आहे. तें जितकें पाण्यानें भरलें आहे, तितकेंच अंधारानेंही. त्याला लागूनच कोलांबिका देवी उभी आहे. गंगाद्वारापुढून एक पायवाट गोरक्षनाथांच्या गुहेकडे जाते. ज्ञानेश्वर ज्यांना 'योगाब्जिनी सरोवरू' म्हणून गौरवतात, त्या गोरखनाथांची

मूर्ति पाहून, सगळ्या नवनाथांची मालिका डोळ्यांपुढें उभी राहते. शिवापासून त्यांची परंपरा सुरू होते. ते शंकराला आदिनाथ म्हणतात. त्यांचें शिव हें उपास्य आणि योग हें साधन. उपास्य देवतेचें अनादिक्षेत्र आणि योगसाधनेला अनुकूल असें एकांतस्थळ, या दोन्ही दृष्टींनीं नाथ-पंथीयांची या स्थानावर भक्ति आहे. गोरखनाथांचे शिष्य गहिनीनाथही ब्रह्मगिरीवरच्याच कोणत्या तरी गुहेंत राहत होते. गहिनीनाथांचे शिष्य निवृत्तिनाथ. विलक्षण योगायोगानें या उभयतांची गांठ पडली. निवृत्तिनाथांचे वडील विठ्ठलपंत मध्यरात्रीं चारी मुलांना सांगातीं घेऊन ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करीत असतां पाऊस सुरू झाला आणि त्यांतच



वाघाची डरकाळी उठली. मुलें भयानें इतस्ततः पांगलीं. त्यांपैकीं एक चुकलेलें लेंकरूं–निवृत्तिनाथ–यदृच्छेनें गहिनीनाथांच्या गुहेंत पोंचले. गहिनीनाथांना अनायासें एक सच्छिष्य लाभला. त्यांनीं त्याला सात दिवस आपल्याजवळ ठेवून घेऊन 'तत्त्वमसि' या महावाक्याचा उपदेश केला. ज्ञानदृष्टि उघडून त्यांनीं त्याला परत पाठविलें. निवृत्तीचे

निवृत्तिनाथ झाले. पुढें ज्ञानेश्वरांचें गुरुपद त्यांनींच भूषविलें. शेवटीं समाधि घेण्यासाठींही ते इथें गुरुचरणांशींच आले. गंगासागर तलावाच्या पश्चिम तीरावर निवृत्तिनाथांचें हें समाधिमंदिर आहे. मला त्या स्थानाची विलक्षण ओढ होती. पण ज्या उल्हासानें मी तें पहायला गेलों, तो उल्हास प्रत्यक्ष दर्शनानें ओसरला. भावना विरजली. लक्षावधि भागवत-धर्मीयांच्या परमगुरूचें हें समाधिस्थान इतकें अचेतन, अव्यवस्थित आणि उपेक्षित दिसेल अशी मी कल्पनाच करूं शकलों नव्हतों. प्रसादाच्या ऐवजीं विषाद घेऊनच मी तिथून बाहेर पडलों.

गंगाद्वारापासून साडेसातशें पायऱ्या उतरून मी खालीं आलों होतों. एवढीं सगळीं तीर्थें, स्थळें करून कुशावर्तावर येईतों अकरा वाजून गेले होते. यात्रेकरूंचीं विधियुक्त स्नानदानें चाललीं होतीं. या क्षेत्रांतलें मुख्य तीर्थ तें हें. ब्रह्मगिरीवर उगम पावलेली गोदा भूगर्भांतून इथें प्रगट झाली आहे. कुशांनीं अभिमंत्रून गौतमानें तिला इथें बांधून टाकलें म्हणून या कुंडाचें कुशावर्त नांव पडलें. हें सर्व बाजूंनीं सुबद्ध असून उन्हाळ्यांतही याला पाणी भरपूर असतें. पण हल्लीं त्रिंबकच्या नगर-पालिकेनें कुंडांत उतरून स्नान करायला बंदी केली आहे. बादल्या भरून घ्याव्या आणि वरच्या बाजूला नेऊन स्नान करावें. क्षौर, पिंडदान, इत्यादि धर्मकृत्यें इथेंच करायचीं असतात. या तीर्थाच्या परिसरांत अनेक देवदेवतांची दाटी आहे. त्र्यंबकेश्वर चंद्रमौळी दर सोमवारीं पालखींत बसून स्नानासाठीं इथें येत असतो. याच्याजवळच गंगा-मंदिरासमोर कनखलतीर्थ आहे. गौतमऋषींचें भात कुटण्याचें हें उखळ अशी समजूत आहे. कोणी तरी वृद्ध यात्रेकरू स्नान करून धाबळी नेसतांना श्लोक म्हणत होता.

**“ गंगाद्वारे कुशावर्ते त्र्यंबके नीलपर्वते**
**स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते।”**

त्याचा जर पुनर्जन्म टळला असेल तर माझा तरी कां म्हणून शिल्लक उरावा? आतां पाय अगदीं थकले होते. कुशावर्ताहून मुक्कामाच्या

जागीं जाईपर्यंतसुद्धां देहाचा भार सोसण्यास त्यांची तयारी नव्हती. मी घरीं आलों आणि माडीवर जाऊन आधीं त्यांचें गाऱ्हाणें ऐकलें. ज्याच्यावर मी दोही अंगीं चढून उतरलों होतों तो ब्रह्मगिरि त्या माडीवरून मला दिसत होता. त्याच्याकडे टक लावून पाहतांना मला वाटलें कीं, मी आज इथें आलों तो आषाढांत आलों असतों तर—भरून आलेल्या आकाशाखालीं घनगर्ज वृष्टींत हा विराट् त्र्यंबकराज हाताहाता-वरून धाराप्रवाह खालीं लोटून देत असलेला पहायला मिळाला असता. पठारावर त्याच्याच वर्णाचे मेघ दाटून राहिल्यामुळें कधीं तो आहे त्यापेक्षां अधिक उंच दिसला असता. आणि वर्षून विरल आणि शुभ्र झालेल्या ढगांच्या प्रावरणाखालीं कधीं कधीं तो गूढरम्यही वाटला असता.

---

# सज्जनगड

सज्जनगडावर जाण्यासाठीं आम्ही सातार्‍याला गेल्यावर जीं जीं ओळखीचीं माणसें भेटलीं, त्यांनीं त्यांनीं आम्हांला म्हटलें, 'दासनवमी सोडलींत, सगळा उन्हाळा घालवलात आणि सज्जनगड बघायला आलांत ते या ऐन पावसाळ्याच्या दिवसांत.' त्या रात्रीं ज्या चार सरी कोसळल्या, त्यावरून त्यांचें म्हणणें बरोबर होतें हें पटलें. मी मनांत साशंक झालों. ठरवलेले टांगे दारापुढें येतील ना? आर्यांग्ल वैद्यक विद्यालयांतल्या दोन छात्रांनीं सकाळीं मला सोबत करायचें कबूल केलें आहे, त्यांच्या उत्साहावर तर पाणी पडणार नाहीं ना?

पण सकाळीं सगळें अगदीं ठरल्याप्रमाणें झालें. नरेंद्र रानडे आणि श्रीकृष्ण साने ही जोडी टांगे घेऊनच श्री. रघुनाथराव जोगळेकर यांच्या दारांत प्रगटली. त्यांनीं खाद्यपदार्थांबरोबरच उत्साहाचीही शिदोरी आणलेली पाहून माझा जोम वाढला. आम्ही आरूढ होतांच टांग्याचे श्यामकर्ण डोंगरचढणीला लागले. बोगद्याच्या पलीकडे गेलों मात्र; एवढा वेळ दडलेलें एक निराळेंच जग दृष्टीसमोर विस्तारलें. डोंगर-दर्‍या, नांगरटीची जमीन आणि मधून मधून तुरळक झाडींत जानपदवस्ती, असें त्याचें स्वरूप होतें. सपाट भूप्रदेशावर येतांच घोड्यांनीं आपल्या गतीची दुगुण केली. दुतर्फा जांभळीच्या झाडांमधून आमचा रस्ता जात होता. घोंसांनीं लटकणारी आपली फलसंपदा मानवाच्या मुखीं लावून तीं नुकतींच अकिंचन झालीं होतीं. आजूबाजूच्या शेतांतून पेरण्या झाल्या होत्या. धरित्रीच्या अंगावर हिरवे रोमांच उठले होते. भाताच्या शेजारीं बाजरी उगवली होती. मधेंच एखाद्या पट्ट्यांत अरगडीचे नवांकुर दिसत होते. वायुलहरी त्यांना 'डोल बाई डोल' करीत होत्या. पाऊस झोडपील का ऊन करपवील, तण झांकोळील का जनावर चाटील, यांपैकीं कसलीच काळजी त्या अंकुरांना दिसत नव्हती.

वाटेंत लागलेल्या पहिल्या गांवांत डाव्या हाताला एक देऊळ दिसलें. टांगेवाला म्हणाला, 'ही पदुबाई बरं का!' पदुबाई म्हणजे पद्मजा असावी बहुधा. शेजारचें भरलेलें तळें पाहून मीं टांगेवाल्याला विचारलें, 'हें नेहमींच असें तुडुंब असतें का?' तो उत्तरला, 'एका काळीं तें तसें होतें. पण एक दिवस एक 'बाहेरची बाई' त्याला शिवली आणि सगळें पाणी एकदम आटलें.' आतां जातां जातां एका लोककथेचा कण त्यानें माझ्या पदरांत टाकला होता. अशा अनेक लोककथा जनपदांतून आणि डोंगरवस्तींतून प्रचलित असल्या पाहिजेत. कुणीं तरी हें साहित्याचें 'मूलधन' गोळा करणें जरूर आहे. वाङ्मयाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनीं हें क्षेत्र नांगरलें तर महामूर पीक हातीं लागेल.

आणखी थोडेंसें पुढें गेलों आणि थोड्या अंतरावर दोन उपऱ्या वसाहती पाहिल्या. टांगेवाल्यानें माहिती पुरवली कीं, तिथें कानफाटे गोसावी राहतात. गवताच्या जाड चटयांचीं पालें दाटीवाटीनें उभीं करून ते तिथें राहिले होते. एवढें मैदान मोकळें असतांना लहानशा जागेंत पुंजका करून राहण्यांत त्यांची संघभावना दिसत होती. त्या पालांचीं तोंडें एकाच दिशेला नसून अष्टदिशांना होतीं. याचा अर्थ असा कीं, कुठल्याही दिशेनें संकट डोकावलें तरी तें नजरेंतून निसटूं नये. रानांत बसायचा प्रसंग आला तर गुरेंसुद्धां कोणत्या तरी उपजत प्रेरणेनें अशींच मंडलाकार बसतात. खण किंवा रंगीत तुकडे काठीला बांधलेले भाराभर ध्वज पालापासून चाळीस-पन्नास कदमांवर एकाच ठिकाणीं पुरलेले दिसले. तीं माणसें आजूबाजूच्या गांवांत भिक्षाटन करतात आणि झोळींत पडलेलें शिळेंपाकें बाहेरच्या बाजूला खाऊन मगच त्या ध्वजांनीं दर्शविलेल्या रेषेच्या आंत शिरतात. बाहेरचें उष्टेंमाष्टें आंत आणल्यास तें त्यांना बाधतें म्हणे.

उरमोडी नदीच्या पुलावर आणून टांगेवाल्यांनीं आम्हांला उतरवलें. पुढचा रस्ता ढोपरभर चिखलाचा असल्यामुळें त्यांचा इलाज चालण्यासारखा नव्हता. भारतीय युद्धांत भूमीनें रथचक्र गिळल्यामुळें कर्णाची जी अवस्था झाली तीच त्यांचीही झाली असती. सातारा ते सज्जन-

गडाचा पायथा या सहा मैलांच्या अंतरापैकीं आम्हीं पांच मैल तोडलें होतें. आतां सज्जनगड आमच्यासमोर उभा होता. शेतांतली एक पायवाट धरून आम्ही चालूं लागलों. पण ती एका ओढ्यांत उतरून गडप झाली. एक शेतकरी भेटला, त्यानें आमची चूक दुरुस्त केली. 'भलतीकडेच आलांत तुम्ही. आतां चढा असे तिरके वर; म्हणजे रस्ता भेटेल.' चूक खरी; पण ती आमच्या पथ्यावर पडली होती. तिनें आमची अर्ध्या मैलाची पायपीट वांचवली होती. नाहीं तर पायथ्याच्या गजवडी गांवाला वळसा घालून आम्हांला यावें लागलें असतें. आम्ही चढूं लागलों आणि एवढा वेळ झिम् झिम् करणाऱ्या पावसाला जोर चढला. आडव्या-तिडव्या सडसडाटांनीं तो आम्हांला झोडपूं लागला. हातांतल्या छत्र्या केवळ 'ओझ्याला काळ' ठरल्या. कपडे भिजून अंगाला बिलगले. पावसाला भिऊन एखाद्या झाडाच्या आसऱ्याला जावें तर त्याचे ओथवळे पावसाच्या थेंबापेक्षांही टपोरे. शेवटीं एक एक पाऊल पुढें टाकीत राहणें हेंच श्रेयस्कर ठरलें.

माझी लहानपणची आठवण जागृत झाली. आमच्या आंबेड्याला पंचक्रोशीची सामुदायिक श्रावणी व्हायची. तिच्यांतला स्नानविधि बसल्या जागीं केवळ मार्जनावर न उरकतां आम्ही त्यासाठीं गांवाबाहेरच्या मोठ्या ओढ्यावर जात असूं. तिथें प्रत्येक स्नानाला यथेच्छ डुंबून, ऋषींना पुजून आणि देव-पितरांना तर्पून नंतर उपाकर्मासाठीं परत मूळच्या जागीं येत असूं. येतांना बहुधा पाऊस असायचाच. आमचें ओलेतें अंग त्यानें पुन्हा भिजवायचें आणि त्याच्या धोधाटांत मध्याह्न सवन लावून वैदिकांनीं पर्जन्यसूक्त आरंभायचें.

**पर्जन्याय प्रगायत दिवस्पुत्राय मीळ्हुषे। स नो यवसमिच्छतु**

'आकाशपुत्र पर्जन्याचें यशोगान करा. आम्हांला धनधान्य देण्याची त्याला इच्छा होवो. तिन्ही भुवनें या पर्जन्याच्या आधारावर राहिलीं आहेत. सर्व ओषधींमध्यें हा फलबीज ठेवणारा आहे. म्हणूनच स्थावरजंगमाचा प्राण याच्यामध्यें राहतो. हात्र माझ्या सद्धर्मांचेंही शतावधि वर्षे रक्षण करो.'

दहा वाजायच्या सुमारास आम्ही किल्ल्याच्या महाद्वाराशीं पोंचलों. हें द्वार आग्नेयीच्या बाजूला आहे. तें ओलांडतांच आणखी एक कमान



लागली आणि पुढें गडाचें पठार सुरू झालें. पन्हाळा आणि ब्रह्मगिरि यांचीं पठारें थोड्याच कालापूर्वी मीं पाहिलीं होतीं. त्या मानानें हें अगदींच त्रुटित वाटलें. त्याचा घेर सहाशें फुटांपेक्षां अधिक नाहीं. उंची तर अवघी एक हजार फूट. सह्याद्रीचे जे लहानसहान फांटे सातारा जिल्ह्यांत पसरले आहेत त्यांतल्याच एकावर हा किल्ला बांधलेला आहे. गडावर यायला परळीच्या बाजूनें आणखीही एक वाट आहे. पण ती बिकट असल्यामुळें बहुतेक यात्रेकरू 'धोपटमार्गा सोडुं नको' या तत्त्वाचाच अवलंब करतात. हा किल्ला कोणीं आणि केव्हां बांधला याबद्दल इतिहासानें मुक्याचें व्रत घेतलें आहे. मात्र दक्षिणेंत मुसलमानांचा अमल सुरू होण्यापूर्वी तो अस्तित्वांत होता एवढें समजतें. कदाचित् तो इ. स. च्या १० व्या किंवा ११ व्या शतकांत शिलाहार राजांनीं बांधला असण्याचा संभव आहे. सातारचा अजिमतारा किल्ला आणि परळीचा हा गड हे दोन किल्ले या भागांतले जय-विजय शोभतात. दोन्ही बहुधा एकाच काळचे असले पाहिजेत. शिवाजीनें १६७३ त हा आणि याच्यापाठोपाठ अजिमतारा असे दोन्ही किल्ले विजापूर-करांच्या हातांतून हिसकले. समर्थ रामदास हे शिवाजीचे गुरु. ते त्या वेळीं कृष्णा-खोऱ्यांत मन मानेल तिथें राहत होते. शिवाजीला वाटलें,

आपल्या गुरुमाउलीच्या वास्तव्याला ही जागा छान आहे. निवांत, निर्वेध आणि सुंदर. शिष्यानें गुरूपुढें तसा प्रस्ताव केला. गुरूनें त्याला मान्यता दिली. समर्थ गडावरचे रहिवासी झाले. शिवाजीनें समर्थांच्या प्रेरणेनें महाराष्ट्रांतल्या संतमंडळीला गडावर प्रेमाचें पाचारण केलें. मोटा मेळावा जमला. यावनी शब्दांनीं कान किटलेल्या गडावरच्या झाडापेडांना ' बरवा नामघोष ' ऐकायला मिळाला. भजनांचे फड रंगले. कथा-कीर्तनांतल्या निरूपणांत परमार्थाची शीग लागली. ती संतांची प्रेमळ, पवित्र, रसवंती कानांनीं पिऊन गोब्राह्मण-प्रतिपालक शिवरायाचा आत्मा प्रसन्न, परिपुष्ट झाला. ही अध्यात्मसंपदा लुटून आणि संतसज्जनांचे ' अक्षै ' आशीर्वाद पदराला बांधून शिवबा आपला कर्मयोग आचरण्यासाठीं निघून गेला. इतक्या सज्जनांचा गडावर एक मास रहिवास झालेला पाहिल्यावर या किल्ल्याला ' सज्जनगड ' असें नांव ठेवणें शिवाजीला उचित वाटलें. समर्थ या गडावर उणींपुरीं आठ वर्षें राहिले आणि इथूनच त्यांनीं ' विश्रामधाम ' गांठलें.

पूर्वी होता ' अस्वलगड '. आतां झाला ' सज्जनगड '. पण या गडाचें बारसें एवढ्यावरच संपलें नाहीं. शिवाजीच्या अवसानानंतर औरंग-जेबानें दक्षिणेंत जोराची मुसंडी मारली. या भागांत येऊन त्यानें साताराच्या अजिमताऱ्याला वेढा घातला. परशुराम त्रिंबक प्रातिनिधि हे त्या वेळीं सज्जनगडावर कारभारी होते. अजिमताऱ्यावरच्या शिबंदीला त्यांनीं इथूनच रसद पुरवली. पुढें तेंच संकट सज्जन-गडावरही ओढवणार हें त्यांना समजतांच त्यांनीं इथलें रामपंचायतन वासोटा किल्ल्यांत नेऊन ठेवलें आणि समाधीचें द्वार चिणून टाकलें. मोंगलांनीं हाही किल्ला सर केला. बादशहानें त्याला ' नवरसतारा ' असें नांव ठेवलें. पण चक्रनेमिक्रम एवढ्यावर थांबतो थोडाच ! पुढें राजारामाच्या कारकीर्दींत याच परशुराम त्रिंबकांनीं पुनश्च या गडावर भगवें निशाण फडकवलें. वासोट्याहून मूर्ति परत आणल्या. त्यांची विधियुक्त प्रतिष्ठा केली. समाधीचें द्वार उघडलें. आणि त्यानिमित्त मोठें अन्नसंतर्पण करून ते गडाखालीं उतरले.

आमचीं पावलें त्याच समाधिस्थानाकडे वळलीं. मंदिरापुढें अशोक-वृक्ष बरेच आहेत. पण ते फुलांना पारखे आहेत. आमच्या कोंकणांतलीं



अशोकाचीं झाडें फुलांच्या घोंसांनीं मोहून येतात. लांब देंठाचें, बारीक पण जाड पाकळयांचें आणि लांब लांब केसर असलेलें तें पीतरक्त फूल उपेक्षणीय नसतें. त्यांतल्या मकरंदाच्या भोजनासाठीं तांबडे मुंगळे तर त्या झाडावर आपली वसाहतच उभारतात. देशावरचे अशोक मात्र सगळीकडे पुष्पहीन दिसतात. रमणीच्या नाजूक पदाघाताचीसुद्धां त्यांच्यावर मात्रा चालत नाहीं. त्या वृक्षराजीखालून पुढें होऊन आम्ही देवद्वार गांठलें. चौथऱ्यावर अगदीं समोर देवाकडे पाठ करून बसलेल्या गणपतिबाप्पानें आमची दखल घेतली. तो 'बृहदुदर' तर आहेच; शिवाय त्याचा नाभिप्रदेश पुढें येऊन खालीं वळला आहे. गणपति बहुधा महाद्वाराच्या चौकटीवर असतो. पण इथें महाद्वारच नाहीं. तेव्हां त्याला जमिनीवर बैठक मारणें भाग झालें आहे. देऊळ दगडी तर सभामंडप

लांकडी आहे. सभोंवार कमानी असून त्यांवर घुमट आहेत. गाभाऱ्यांत रामपंचायतन विराजत आहे.

आम्ही गाभाऱ्याच्या दाराशीं उभे राहून दर्शन घेत असतां भूगर्भांतून रुद्राच्या नमकाचे स्वर कानीं पडूं लागले. कुठून येत होता तो वेदध्वनि? कुठून म्हणजे? समर्थांच्या समाधिस्थानांतून. आम्ही उभे होतों, त्याच्याच खालीं भुयारांत तें स्थान होतें. सभामंडप संपून दगडी चौथरा लागतो तिथें मधोमध आंत जाण्याचा निरुंद दरवाजा होता. 'करीं मस्तक ठेंगणा' हा उपदेश ध्यानीं आणून आम्ही आंत प्रविष्ट झालों. प्रथम एक चौकोनी मोकळी जागा आणि पुढें समाधीचा गाभारा. भुयारं म्हणजे अंधाराचें काळीजच तें. एका समईचा तिथें काय पाड लागणार! आंत कांहीं तरी आहे एवढेंच ती 'धाकुटी दीपकळी' सांगूं शकत होती. त्या रुद्र म्हणणाऱ्या बुवानें दुसरी वात पेटवून ती हातांतच धरली तेव्हां कुठें आमच्या डोळ्यांवरचें पटल उडालें.

आमच्यासमोर एक लांबट-चौकोनी शिळा होती. तिच्यावर अभिषेकाची धार गळत होती. सभोंवतीं चार माणसांना प्रशस्तपणें वावरतां येईल इतका अवकाश होता. मी दरवाजाबाहेर उभा होतों तिथूनच करसंपुट जोडला—

> **"शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें**
> **वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें**
> **कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा**
> **नमस्कार माझा सद्गुरु रामदासा"**

मला अगदीं अनावरपणें वाटलें कीं, दोन्ही भुजा उभारून त्या समाधीला कवळावें. पण मी सुस्नात होऊन आलेला असूनही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' सोंवळा नव्हतों. आळंदीला ज्ञानेश्वरमाउलीच्या पायांजवळ मी जी सलगी करूं शकत होतों, ती त्याच परिस्थितींत इथें करणें मला अशक्य होतें. दोन स्थळांमधलाच नव्हे, दोन पंथामधलाही हा ठळक भेद आहे. सोंवळ्याओंवळ्याच्या कटाक्षानें पूजास्थानाबद्दल

आदर वाढत असेल कदाचित्. पण आदर म्हणजे ‘थोडेंसें भयच’ तें. भयाच्या सावटांत प्रेमाची वाढ खुंटते, हें सत्य विसरतां येणार नाहीं. ‘रामदासगुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं’ असें आपण भजन म्हणतों ना! मग आईच्या चरणीं मिठी घालायला बालकाला सोंवळें नेसून यावें लागतें का? देवाजवळ एक वेळ चालेल, पण संतांजवळ तरी सोंवळ्याचा निर्बंध नसावा असें मला प्रामाणिकपणें वाटतें.

ज्ञानेश्वरांचीही समाधिच आणि रामदासांचीही समाधिच ; पण दोहोंत अंतर आहे. आळंदीला ज्ञानेश्वर सदेह खालीं बसले आहेत ; तर इथें समर्थांच्या दहनभूमीवर हा चिरा निर्माण झाला आहे. नेत्रपातीं न लववतां मी ती समाधि न्याहाळूं लागलों. ती समाधि आणि तिच्यावरची ती राममूर्ति! समर्थ एकदां तंजावरास गेले असतांना राम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान अशा चार मूर्ति करविण्याबद्दल त्यांनीं मल्हार निंबदेव याला आज्ञा केली होती. त्यानें त्या तयार करवून केशव निःस्पृही याजबरोबर पाठवल्या. शके १६०३ माघ वद्य पंचमीस त्या गडावर आल्या. श्रींचें मुखावलोकन करून समर्थांना परम समाधान झालें. त्यांनीं त्या आपल्या शेजघरांत तात्पुरत्या मांडल्या. त्यांना त्यांची विधिपूर्वक स्थापना करावयाची होती. पण एवढ्यांत त्यांना ‘बोलावणें’ आलें. काळानें तशी सूचना दिली. चार दिवसांनंतर माघ वद्य नवमी उजाडली. भर दुपारचा समय झाला. समर्थ पलंगाखालीं उतरले. त्यांनीं उत्तर दिशेकडे मुख केलें. रघुकुळटिळकावर दृष्टि लावून ध्यान धरलें. आपण आतां पोरके झालों या जाणिवेनें अश्रु गाळणाऱ्या शिष्य-वृंदाला ‘माझ्या दासबोधांत मला पहा’ असें आश्वासन दिलें. आणि तो शेवटचा क्षण आला. महापुरुषाच्या महाप्रस्थानाचा तो क्षण! जितका उदात्त तितकाच गंभीर! रामनाम त्या क्षणीं वैखरीवर येणार नसेल तर जन्मभर साधना आणि उपासना यांचे कष्ट कशाला सोसायचे!

**तीन वेळां स्मरण केलें। अंबर अवघें गर्जिनलें।**
**रामनामें कोंदाटलें। जिकडे तिकडे ॥**

लांकडी आहे. सभोंवार कमानी असून त्यांवर घुमट आहेत. गाभाऱ्यांत रामपंचायतन विराजत आहे.

आम्ही गाभाऱ्याच्या दाराशीं उभे राहून दर्शन घेत असतां भूगर्भांतून रुद्राच्या नमकाचे स्वर कानीं पडूं लागले. कुठून येत होता तो वेदध्वनि? कुठून म्हणजे? समर्थांच्या समाधिस्थानांतून. आम्ही उभे होतों, त्याच्याच खालीं भुयारांत तें स्थान होतें. सभामंडप संपून दगडी चौथरा लागतो तिथें मधोमध आंत जाण्याचा निरुंद दरवाजा होता. 'करीं मस्तक ठेंगणा' हा उपदेश ध्यानीं आणून आम्ही आंत प्रविष्ट झालों. प्रथम एक चौकोनी मोकळी जागा आणि पुढें समाधीचा गाभारा. भुयारं म्हणजे अंधाराचें काळीजच तें. एका समईचा तिथें काय पाड लागणार! आंत कांहीं तरी आहे एवढेंच ती 'धाकुटी दीपकळी' सांगूं शकत होती. त्या रुद्र म्हणणाऱ्या बुवानें दुसरी वात पेटवून ती हातांतच धरली तेव्हां कुठें आमच्या डोळ्यांवरचें पटल उडालें.

आमच्यासमोर एक लांबट-चौकोनी शिळा होती. तिच्यावर अभिषेकाची धार गळत होती. सभोंवतीं चार माणसांना प्रशस्तपणें वावरतां येईल इतका अवकाश होता. मी दरवाजाबाहेर उभा होतों तिथूनच करसंपुट जोडला—

> "शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें
> वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें
> कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा
> नमस्कार माझा सद्गुरु रामदासा"

मला अगदीं अनावरपणें वाटलें कीं, दोन्ही भुजा उभारून त्या समाधीला कवळावें. पण मी सुस्नात होऊन आलेला असूनही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' सोंवळा नव्हतों. आळंदीला ज्ञानेश्वरमाउलीच्या पायांजवळ मी जी सलगी करूं शकत होतों, ती त्याच परिस्थितींत इथें करणें मला अशक्य होतें. दोन स्थळांमधलाच नव्हे, दोन पंथामधलाही हा ठळक भेद आहे. सोंवळ्याओंवळ्याच्या कटाक्षानें पूजास्थानाबद्दल

आदर वाढत असेल कदाचित्. पण आदर म्हणजे 'थोडेंसें भयच' तें. भयाच्या सावटांत प्रेमाची वाढ खुंटते, हें सत्य विसरतां येणार नाहीं. 'रामदासगुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं' असें आपण भजन म्हणतों ना! मग आईच्या चरणीं मिठी घालायला बालकाला सोंवळें नेसून यावें लागतें का? देवाजवळ एक वेळ चालेल, पण संतांजवळ तरी सोंवळ्याचा निर्बंध नसावा असें मला प्रामाणिकपणें वाटतें.


ज्ञानेश्वरांचीही समाधिच आणि रामदासांचीही समाधिच; पण दोहोंत अंतर आहे. आळंदीला ज्ञानेश्वर सदेह खालीं बसले आहेत; तर इथें समर्थांच्या दहनभूमीवर हा चिरा निर्माण झाला आहे. नेत्रपातीं न लववतां मी ती समाधि न्याहाळूं लागलों. ती समाधि आणि तिच्यावरची ती राममूर्ति! समर्थ एकदां तंजावरास गेले असतांना राम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान अशा चार मूर्ति करविण्याबद्दल त्यांनीं मल्हार निंबदेव याला आज्ञा केली होती. त्यानें त्या तयार करवून केशव निःस्पृही याजबरोबर पाठवल्या. शके १६०३ माघ वद्य पंचमीस त्या गडावर आल्या. श्रींचें मुखावलोकन करून समर्थांना परम समाधान झालें. त्यांनीं त्या आपल्या शेजघरांत तात्पुरत्या मांडल्या. त्यांना त्यांची विधिपूर्वक स्थापना करावयाची होती. पण एवढ्यांत त्यांना 'बोलावणें' आलें. काळानें तशी सूचना दिली. चार दिवसांनंतर माघ वद्य नवमी उजाडली. भर दुपारचा समय झाला. समर्थ पलंगाखालीं उतरले. त्यांनीं उत्तर दिशेकडे मुख केलें. रघुकुळटिळकावर दृष्टि लावून ध्यान धरलें. आपण आतां पोरके झालों या जाणिवेनें अश्रु गाळणाऱ्या शिष्यवृंदाला 'माझ्या दासबोधांत मला पहा' असें आश्वासन दिलें. आणि तो शेवटचा क्षण आला. महापुरुषाच्या महाप्रस्थानाचा तो क्षण! जितका उदात्त तितकाच गंभीर! रामनाम त्या क्षणीं वैखरीवर येणार नसेल तर जन्मभर साधना आणि उपासना यांचे कष्ट कशाला सोसायचे!

**तीन वेळां स्मरण केलें। अंबर अवघें गर्जिनलें।**
**रामनामें कोंदाटलें। जिकडे तिकडे॥**

**ध्वनी जाली संपूर्ण । जाला अवतार हो पूर्ण ।**

.......................

याच जागीं पूर्वी एक खड्डा होता. कल्याणानें एकदां समर्थांना विचारलें होतें. 'हा खड्डा बुजवायचा काय?' त्यावर ते उत्तरले होते. 'नको. हाही कामास येईल!' समर्थांचा गर्भित हेतु ओळखून शिष्यांनीं त्यांच्या देहाला इथेंच अग्निसंस्कार केला. आणि तिसऱ्या दिवशीं रक्षा सावडतांना हा समाधीचा चिरा हाताला लागला.



पण याला मधोमध चीर कशी गेली आहे? अशनिपात झाला असेल का? का वीज आली भेटायला? वीज नाहीं; पण कल्याण आला होता. कल्याण म्हणजे आदर्श शिष्योत्तम. सेवाधर्माचें जागतें दैवत. समर्थांच्या अवतारसमाप्तीच्या वेळीं तो जवळ नव्हता. ती वार्ता त्याला कांहीं दिवसांनीं समजली. त्याच्या गुरुभक्तीला तें आव्हान होतें. आपण जवळ नसतांना गुरुमाउली विश्वांतून अदृश्य होते म्हणजे काय! आपली सेवा-शुश्रूषा काय फुकटच गेली? होता तिथूनच तो धांवत धडपडत आला आणि त्यानें या चिऱ्याजवळ धरणें धरलें. तो हालेना, निघेना,

तेव्हां शिष्याच्या ‘ जीवातळीं जीव अंथरणाऱ्या ’ सद्‌गुरूला प्रकृतीचा नेम मोडून प्रगटावें लागलें. चिरा दुभंग झाला आणि आंतून कल्याणाला यथापूर्व गुरुदर्शन झालें. अद्याप ती साक्ष त्या ठिकाणीं आहे. याच समाधीवर मागाहून देऊळ उभारलें गेलें. त्यामुळें आपोआपच हें भुयार बनलें. तिथून दुसऱ्या जिन्यानें आम्ही वर आलों.

प्रदक्षिणा करतांना वायव्येला आणखी एक समाधि दिसली. समर्थशिष्या वेणाबाई यांनीं तिथें चिरविश्रांति घेतली आहे. त्यांचें माहेर कोल्हापुरांत. सासर मिरजेंत. बालपणींच वैधव्य शिरावर आदळलें. आप्तेष्टांनीं जाचलें. निंदकांनीं कूट खाल्ली. जीवन असह्य झालें. पूर्व-संचित बळकट होतें, म्हणूनच त्यांना समर्थांची भेट झाली. जे पाय एकदां लाभले ते त्यांनीं कधींच सोडले नाहींत. समर्थांच्या आधीं त्यांच्या डोळ्यांदेखतां निर्याण साधून त्या आणखी भाग्यवान् ठरल्या.

मंदिर–प्राकारांतून आम्ही बाहेर निघालों. अकरा वाजले होते तरी ‘ घनःश्याम सुंदरा ’चीच वेळ दिसत होती. पावसानें मधली सुट्टी घेतली होती तरी सूर्यदर्शनाचा रंग नव्हता. वाढून येणाऱ्या कृष्णमेघांनीं सगळें किरणजाल ग्रासलें होतें. एखादा वैदिक ऋषि असता तर त्यानें म्हटलें असतें, ‘ पणींनीं इंद्राच्या धेनु चोरल्या. ’ झाडें अंग झाडीत होतीं. वारा म्हणत होता, ‘ पावसानें तुमचीं वस्त्रें भिजवलीं का? मी आतां तीं वाळवून देतों. ’ त्यानें वस्त्रें वाळवलीं हें खरें; पण इकडे देह गारठला, त्याची वाट काय ! क्षणाक्षणाला रोमांच उठत होते; पण तरीहि आम्ही फिरत होतों. एका रामदासी बुवानें समर्थ रहात होते त्या मठांत आम्हांला नेलें. मठाचा हल्लीं जीर्णोद्धार सुरू आहे. शेजघराच्या दारापाशीं आम्हांला उभें करून ते एक एक वस्तु बाहेर आणूं लागले. ‘ हें समर्थांचें वल्कल, हा जरीचा फेटा, हा लोटा......... ’

वल्कलाची घडी होती ; पण तें सुमारें तीनचार हात लांबरुंद असल्याचें त्यांनीं सांगितलें. हाताला जाड पण मऊ मऊ लागलें. हिमालयाच्या यात्रेंत त्यांना तें मिळालें असावें. समर्थांचा एक मोठाथोरला बदामी आकाराचा पानांचा डबा आहे. कफाची व्यथा असल्यामुळें समर्थ पान

खात असत. पांच-सहा घागरी पाणी सहज मावेल असा एक हंडा बुवांनीं पुढें काढला. ‘ कल्याणस्वामी उरमोडी नदीवरून हा हंडा भरून आणीत. ’ ते म्हणाले. विश्वास ठेवायला मी जरा आढेवेढे घेऊं लागलों. पण मन म्हणालें, ‘ श्रद्धस्व ! तुझ्या ताकदीवरून तीनशें वर्षांपूर्वी दह्यादुधाची आंघोळ करणाऱ्या त्या लोकांच्या ताकदीची तूं कल्पना करूं नको. ’

नंतर त्यांनीं काढली कुबडी. ती उभ्यानें कांखेंत धरण्याची आहे. समर्थांची उंची किती असेल त्याचा अंदाज त्या कुबडीवरून लागतो. ती निदान पावणेसहा फूट तरी असलीच पाहिजे. पण ही कुबडी दिसते तितकी भाबडी नाहीं. ती ‘ शस्त्रगर्भा भगवती ’ आहे. तिच्या पोकळींत एक दुधारी असिलता दबा धरून बसली आहे. कांखेखालीं ठेवायचें लांकडी अर्धवर्तुळ हीच तिची मूठ. आमचे सहयात्रिक रानडे यांनीं खस्‌कन ती बाहेर ओढली. पवित्र्यांत उभें राहून दोन हात करण्याचा आविर्भाव दाखवला. तरुण रक्त शस्त्रासाठीं किती उत्सुक असतें तें त्यांच्या मुद्रेवरून कळून आलें. त्यांच्या हातांतून ती आपल्या हातांत धरायला सानेहि तितकेच अधीर होते. शिवाजीनें एका सौदागराकडून वर्षाच्या दिवसांइतके होन देऊन हें शस्त्र हस्तगत केलें होतें. सर्व जण त्याची तारीफ करूं लागले तेव्हां शिवाजीला तें अधिकच प्रिय झालें. पण एक गणकभास्कर म्हणाला. ‘ राजा, शस्त्र अमोलिक खरें ; पण घातक आहे. तें तुझ्याजवळ नसावें. एखाद्या सत्पुरुषाच्या हातींच तें शुभप्रद होईल. ’ शिवाजीनें त्या भविष्यवाणीचा उपमर्द केला नाहीं. समर्थांना तें अर्पण करून तो मोकळा झाला.

समर्थ याच खोलींत झोंपत. शिवाजी आणि शिष्यमंडळी यांनीं अत्याग्रह करून त्यांना मंचकावर झोंपायला लावलें होतें. हल्लींचा पलंग नवा असून त्याचे चांदीचे पाय तेवढे तत्कालीन आहेत. तिथेंच भिंतीला टेंकून समर्थांची हातानें काढलेली एक तसबीर आहे. जुन्यांत जुनी तसबीर ती ही, असें सांगतात. याच मठांत रामाचा महानैवेद्य होतो. गडावरचे सेवेकरी इथेंच भोजन करतात. खालचें परळी गांव या मठाला इनाम आहे. त्यांतून हा भोजनप्रबंध आणि देवस्थानाचा खर्च चालतो.

मंदिरप्राकाराच्या बाहेर देवाकडे तोंड करून उभें राहिलें असतां उजव्या हाताला आक्काबाईची समाधि आहे. ही समर्थांची दुसरी पट्टशिष्यीण. समर्थांच्या मागून तशा त्या धामधुमीच्या काळांतही गडावरच्या देवस्थानाचा कारभार तिनें सुसूत्र चालवला हें तिचें कौतुक. मंदिराच्या समोरच थोड्या अंतरावर सोनाळें तळें आहे. काळ्या कातळानें वेढलेलें तें तळें म्हणजे अच्छोद-सरोवराचा एक तुकडाच असें वाटतें. समर्थांच्या स्नान-संध्येला 'उदंड पाणी' यानेंच दिलें असेल. त्याची निर्मळता पाहून असें वाटलें कीं, 'बाहेरि कर्मे क्षाळला, भीतरी ज्ञानें उजळला' अशा सत्पुरुषानेंच इथें पाय बुडवावे.

तिथून पुढें येऊन जरा खालीं उतरलें कीं उजव्या अंगाला देवीचें देऊळ आहे. समर्थांनींच ही देवी इथें स्थापिली. आंत शिरतांच डाव्या हाताला एक ओटा आहे. समर्थ त्यावर बसत.

**जीवांत जीव घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।**
**राहराहों शोध घ्यावा । परान्तराचा ॥**

असा लोकसंग्राहक उपदेश ते महंतांना आणि मठपतींना इथेंच बसून देत असावे. शिष्यांच्या आशंका इथेंच फेडीत असावे.

ते ऐक्याचा महाराष्ट्र-धर्म शिकवीत. अखंड सावधानता उपदेशीत. 'केल्यानें होत आहे रे' हा महामंत्र देत. कोणतीही चळवळ करायची तर आधीं 'हृदयांत राम' आणला पाहिजे असें बोधीत. समर्थांचा हा महाराष्ट्र-धर्म आज निःसत्त्व झाला आहे. द्वेष, असूया, अश्रद्धा, यांनीं त्याला आंतून पोखरलें आहे. रामदासी महंतांनाही तो जिवता-जागता ठेवण्याचें साधलें नाहीं. त्यांची भिक्षा उरली; पण दीक्षा मात्र सरली. 'हा सत्पुरुष-धर्म पुन्हा जागृत झाला तरच आपल्या समाजाचा उद्धार होईल' हे आचार्य कालेलकरांचे बोल चिंतनीय आहेत.

'देवांचा बंधमोचक' श्रीराम हें समर्थांचें उपास्य. शके १५३० मध्यें रामजन्माच्याच तिथीला त्याच वेळीं त्याच क्षणीं जन्म घेऊन त्यांनीं रामाचें आणि आपलें नातें सूचित केलें. औरंगाबाद जिल्ह्यांत गोदावरीच्या उत्तरतीरीं तीन कोसांवर असलेल्या जांब गांवीं एक कुळकर्ण्यांचें घराणें

यांनीं जन्मून उजविलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, द्विजांनीं 'सावधान' म्हणतांच लग्नमंडपांतून पळालेले समर्थ जीवनांतून मात्र पळाले नाहींत. विराट् संसार करण्यासाठीं त्यांनीं हा भातुकलीचा संसार मांडायच्या आधींच मोडला. टाकळीस बारा वर्षें पुरश्चरण करून त्यांनीं 'भगवंताचें अधिष्ठान' मिळवलें. तपाच्या जोडीनें विद्याही साधली. विद्येबरोबरच बलही संपादिलें. मग तीर्थयात्रा केल्या. सारें भरतखंड 'चक्षुर्वै सत्यं' पाहिलें. या भारत-भ्रमणांत त्यांना काय दिसलें? उत्तरेस मोंगलांचा धिंगाणा, दाक्षिणेस पोर्तुगीजांचा जाळता--मारता धर्मच्छळ. आणि त्यांच्या स्वतःच्या महाराष्ट्रांत? आदिलशाही, कुतुबशाही अशा अनेक शाह्यांचा जीवघेणा उपद्रव. महाराष्ट्र उरीं घाव लागून निश्चेष्ट पडला होता. महाराष्ट्राचें राष्ट्र-पणच भंगलें होतें. स्वाभिमान दुर्भिळ झाला होता. माणुसकी मरणाच्या पंथाला लागली होती.

अशा परिस्थितींत ते कृष्णातीरीं वास्तव्य करायला आले. धर्मसंस्थापनेची मुहूर्तमेढ रोवायला त्यांना कृष्णातीर पसंत पडलें. काय होतें कृष्णातीरीं असें विशेष? त्या भागांत स्वराज्याचा अरुणोदय झाला होता. आशेची ज्योत काय ती तिथेंच लुकलुकत होती. शिवाजीनें हिंदवी स्वराज्याचें तोरण तिथेंच बांधलें होतें. समर्थांची तिथेंच खरी गरज होती.

ते रानावनांत हिंडत. डोंगर-कडे वळंघत. घळींत विश्रांति घेत. पहात, विचार करीत, मार्ग शोधीत. लोक त्यांना 'पिसाट रामदास' म्हणूं लागले. पण त्यांचें दैवी स्वरूप लवकरच जनांना प्रतीत झालें. जन-समुदाय त्यांच्याभोंवतीं गोळा होऊं लागला. आपलीं दैन्यदुःखें डोळ्यांत पाणी आणून त्यांना निवेदूं लागला. समर्थ कळवळले. त्यांनीं अमृतवाणीनें त्या गांजलेल्या जनतेला आश्वासन दिलें.

**"धीर धरा धीर धरा तकवा हडबडूं गडबडूं नका**
**काळ देखोनि वर्तावें सांडावें भय पोटिंचें"**

अकरा मारुति स्थापून त्यांनीं दुबळ्यांना बलोपासनेच्या मार्गाला लावले. जागोजाग मठ उभारून धर्माचा प्रचार आरंभिला. त्यांचे मठ म्हणजे तीं लोकशिक्षणाचीं विद्यापीठेंच होतीं. एकेक महंत म्हणजे धर्मध्वज

होता. त्यागी, संयमी, सेवक आणि चतुर. हरिकथेंतून राजकारण करणारा. सर्वविषयीं सावधपण बाळगणारा.

समर्थांचा सारा जीवभाव शिवाजीवर जडलेला होता. 'तुझा तूं वाढवी राजा' म्हणून ते देवीला अनन्यभावें प्रार्थीत. देवीनें त्यांची प्रार्थना ऐकली. रामप्रभूनें त्यांचा हेतु सफळ केला. दास्यमुक्त महाराष्ट्र त्यांनीं याच गडावरून पाहिला. त्यांचें रामराज्याचें स्वप्न, सुवर्णाचे पंख लावून महाराष्ट्र-भूमीवर उतरलें.

आमचेंही सज्जनगड पहाण्याचें वांछित सफल झालें. तिथें नवीनच तयार केलेली पुष्पवाटिका पाहून आम्ही परत आलों आणि शिदोरी सोडली. पोटपूजा आणि थोडीशी विश्रांति झाल्यावर परतीचे वेध लागले. आम्हांला आतां पायीं चालून सातारा गांठायचा होता. पावसाची सर केव्हां थांबेल याचीच आम्ही वाट पहात होतों. येतांना देवीच्या देवळा-जवळच्या कड्यावर उभें राहून पाहिलें. आमच्यासमोर तसलाच एक डोंगर उभा होता. फळयावर काढलेल्या खडूच्या रेघेसारखे लहान लहान जलप्रपात त्याच्यावरून खालीं धांवत होते. एक. दोन. तीन. ...... किती मोजावे! कांहीं अवखळ मुलांसारखे धडाधड उड्या घेत होते, तर कांहीं नागमोडी वळणांनीं उतरून खालच्या खोऱ्यांत पसरत होते. मेघराजाच्या स्नेहसौजन्यानें सगळे डोंगर मृदु झाले होते. शुभ्र पण विरळ अशा मेघपटलांनीं कांहीं पर्वतांभोंवतीं गूढरम्यता निर्माण केली होती. जणुं कालिदासाची व्यंजना. शब्दांच्या तलम झिरझिरीत प्रावरणांतून अर्धस्फुटपणें डोकावणारी. कांहीं टेंकड्यांच्या दरीमुखांतून धूर निघावा, तशीं अभ्रें वर उठत होतीं. तीं पाहून एखाद्या नव्या नैयायिकानें अनुमान मांडलें असतें : 'पर्वतो वह्निमान् धूमात्।' आकाश जणुं ठेंगणें झालें होतें. डोंगरांच्या माथ्यावर डंवरलें होतें. त्याच्यांत काळया रंगाचे लोंढेच्या लोंढे लोटत होते. खालीं उरमोडी नदी तांबडा पूर वाहवीत होती. आकाशाचें औदार्य पृथ्वीच्या पोटांत मावत नव्हतें. ती तें ओढ्यांना अन् नद्यांना समर्पीत होती. पहावें तिकडे वहाळ आणि वोहळ. वर-खालीं फक्त आपोदेवींचीच धांवपळ. अशाच एखाद्या उच्चस्थानीं उभें राहून मुक्तेश्वरानें

पर्जन्याचें असलें धारानृत्य पाहिलें असेल आणि त्याला ती दिव्योत्तुंग कल्पना स्फुरली असेल—

**"कीं पृथ्वीखंड त्या शाळुंका। अनेक पर्वत शिवपिंडिका**
**इंद्रें मांडिलें अभिषेका। जलधारा बरसुनी"**

आमच्या कड्याच्या खालीं जें दुसरें एक ठेंगणें पठार होतें, त्यावर गुरें संथपणें चरत होतीं. गुराखी 'स्थाणुर्वा पुरुषो वा' म्हणतात तसा त्यांच्या-मागें निश्चल उभा होता. आम्हांला वरून फक्त त्याची कांबळ्याची खोळ तेवढी दिसत होती. काळें आकाश, धूसर डोंगर, हिरवीं झाडें, दुधिया रंगाचे जलप्रपात आणि तांबूस भूमि अशी ही वर्षाऋतूची रंगपंचमी मांडली होती. केवढें विशाल गंभीर दर्शन! केवढें नेत्रांचें संतर्पण! इतर कोणत्याही ऋतूंत आम्ही इथें आलों असतों तरी आम्हांला हें 'रसार्द्र' काव्य दिसलें नसतें. जेवढे कष्ट अधिक तेवढें फळही मोठें!

---

# ७. मोरगांवचा मयूरेश्वर

आम्हां कोंकणच्या माणसांना गणरायाचें कौतुक सर्वांत अधिक. वर्षाच्या सगळया सणांत गणेशचतुर्थी हा आम्ही प्रमुख सण मानतों. आम्ही गाणपत्य नसलों तरी गणरायाच्या प्रतिवार्षिक आगमनानें आम्हांला जो उत्साह येतो तो वर्णायला त्याच्याचकडून मति मागून घ्यावी लागेल. कांगोण्या, कुडेफळें, शुभ्र शिर्वेदळें, पिकल्या पोफळांचे घसघशीत घोस आणि कालोद्भव फळावळ यांनीं सजवलेल्या मांडवी-खालीं शृंगारलेल्या देव्हाऱ्यांत आणि समयांच्या स्निग्ध प्रकाशवलयांत प्राणप्रतिष्ठित गणराज विराजले कीं आम्हांला जन्म-जन्मांतरींचा आधार-स्तंभ पाठीमागें उभा झाल्यासारखा धीर येतो. कोंकण्या 'गडी' मुलखावर असला तरी गौरी-गणपतींना घरीं ओढून यायचाच असा सर्वसामान्य नियम आहे. कुळवाडी-माळवाडी त्या दिवसांत फेर धरून 'गीतं वाद्यं नृत्यम्' हे सगळे राजोपचार विघ्नहर्त्याला समर्पून आपला भक्त्युद्रेक शमवतात.

**"भाद्रपद शुद्ध चतुरथीला । गणरायाचा उत्सव मांडिला**
**नरनारी त्या होऊनि गोळा । गणपति आणिती पूजनाला**
**केशर कस्तुरी सर्व अंगाला । मोदक त्याच्या हातीं शोभला**
**....................."**

अशीं त्यांचीं फेरावरचीं गाणीं सुरू झालीं कीं त्यांच्या शरीरांतला अणुरेणु कसा उमलतो तें पाहण्यासारखें असतें. आमच्या गोव्यांतले लोक दिवाळीची प्रतिष्ठा न बाळगतां गणेशचतुर्थीलाच फटाके उडवून मोकळे होतात.

बारा ज्योतिर्लिंगें तसे अष्टविनायक. या आठही स्थानीं विघ्न-विनायक निरनिराळ्या नांवांनीं नांदतो. मोरगांव हें यांपैकीं गणपतीचें

आद्यक्षेत्र समजलें जातें. इथला गणराज हा मयूरेश्वर नांवानें प्रसिद्ध आहे. प्राकृत लोकांनीं त्याचाच 'मोरया' असा सुंदर अपभ्रंश साधला आहे. भीमेच्या कांठीं सिद्धटेकावर तो 'सिद्धिविनायक' झाला आहे. कुलाबा जिल्ह्यांतल्या पाली गांवीं त्याला 'बल्लाळेश्वर' संज्ञा मिळाली आहे. कर्जत–खोपोली रस्त्यावर महढ गांवीं सह्याद्रीच्या पायथ्याला तो 'वरदविनायक' बनला आहे. जुन्नरजवळच्या लेण्याद्रि डोंगरांत त्यानें 'गिरिजात्मज' अशी संज्ञा घेतली आहे. खेड तालुक्यांतल्या ओझर गांवीं तो 'विघ्नेश्वर' म्हणून प्रसिद्ध आहे. पुण्याजवळ थेऊर गांवीं त्याला 'चिंतामणि' ही उपाधि लाभली आहे. आणि घोडनदीच्या रस्त्यावर रांजणगांवीं तो 'गणपति' या नांवानें प्रख्यात आहे. हीं सगळीं विनायकस्थानें महाराष्ट्रांतच असल्यामुळें गणपति हें महाराष्ट्राचें प्रमुख दैवत ठरतें. महाराष्ट्रांत मारुतीचें माहात्म्य प्रस्थापित होण्यापूर्वी 'गांव तिथें गणपति' असा प्रकार होता. 'ते संवादचतुष्पथींचे। गणेश जाहले॥' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीवरून त्या काळीं प्रत्येक चवाठ्या-वर गजानन अधिष्ठित असावा असें अनुमान करतां येतें. वर उल्लेखिलेलीं गणेशक्षेत्रें या गाणपत्यांच्या तपोभूमि आहेत. एकच गणराज भक्तांना वर देण्यासाठीं आणि दुष्टांना दमवण्यासाठीं नाना नाम–रूपांनीं त्या ठिकाणीं अवतरला आहे.

भाद्रपदाप्रमाणेंच श्रावणाचेंही गणपतीच्या उपासनेंत महत्त्व आहे. गाणपत्यांना श्रावणांत मासव्रत असतें. तशांत विनायकी चतुर्थी म्हणजे विशेष पर्वणी. मीं म्हटलें, मोरगांवला जायचें तर असा हा दुप्पट पुण्य-काल साधणें बरें. त्या दिवशीं सकाळीं ११ वाजतां सरकारी वाहतुकीची मोटार आम्हांला घेऊन मोरगांवच्या मार्गाला लागली. वाटेंत प्रथम सासवड आणि नंतर जेजुरी लागली. पुणें जिल्ह्यांत सह्याद्रीची बाजू सोडली तर वनश्रीचें दुर्भिक्षच आहे. पण ठायींठायींच्या फलसंपदेनें या बाबतींतलें 'न्यून तें पुरतें' करून घेतलें आहे. अंजिराचीं झाडें फताड्या पानांचीं दिसत असलीं तरी त्यांच्या फळांचें माधुर्य कोण नाकारूं शकेल! मुसंबी मात्र ठेंगण्या-ठुसक्या सुंदर दिसतात. भूमींतला

रस शोषून त्या आपल्या अंगीं जें तारुण्य दाखवतात तें किती गहिरें असतें! आपलीं बाळेंसुद्धां त्या लीलेनें अंगाखांद्यावर खेळवतात. मुसंबीची बाग पाहिली कीं वाटतें, एखाद्या 'सहकारा'चें 'वन-ज्योत्स्ने'शीं लग्न लागायचें आहे आणि त्यानिमित्त हिरवे शालू नेसून ह्या लेकुरवाळ्या सुवासिनीच जमा झाल्या आहेत. पण त्यांच्यावरून दृष्टि काढून ती शेजारच्या डाळिंबीवर लावली कीं ती मात्र दयनीय दिसते. त्या 'तन्वी श्यामा' अंगनेला आपल्या वजनदार फळांचा भार झेपतच नाहीं मुळीं.

जेजुरीवरून मोरगांव फक्त दहा मैलांवर आहे. पण तो रस्ता पावसाळ्यांत दुर्गम होत असल्यामुळें मोटारीला वाल्हें, निरा आणि तिथून मोरगांव असा द्राविडी प्राणायाम करावा लागतो. निरेच्या कालव्याकांठीं बरेच उसाचे मळे दिसले. उसाच्या त्या जाड, खरखरीत आणि दाटी-वाटीनें वाढलेल्या पात्या, वाऱ्याशीं भांडणें प्रशस्त नव्हे म्हणून एकमतानें त्याला पाठ देत होत्या. श्रावणधारा वरच्यावर आटल्यामुळें अकालीं पिवळीं पडलेलीं पिकें आम्हांला विचारीत होतीं, 'तुमच्या तिकडे तरी पाऊस आहे का हो? आमच्यावर तर आभाळसुद्धां येत नाहीं.' मीं त्यांना म्हटलें, 'मेघाचा आणि गर्भाचा कांहीं नेम सांगवत नाहीं.' राजनीतिच केवळ लहरी नव्हे, लक्ष्मीच केवळ चंचल नव्हे, तर पाऊस-सुद्धां त्याच जातीचा.

श्री. सखारामपंत सोमण यांजकडे 'पडशी' टाकून आणि त्यांच्या गरम आतिथ्याचा आदर करून आम्ही चौथ्या प्रहरीं देवदर्शनाला गेलों. आमच्याआधींच थोडा वेळ मुंबईकडून एक कुटुंब तिथें आलें होतें आणि त्यानें मोरयाची महापूजा केली होती. गळ्यांत मंदारमाला, वर नवें क्षौम वस्त्र, कपाळीं रेखीव गंध, मस्तकीं दूर्वांची पेंडी आणि पुढें फळें, नारळ असा तो पूजेचा थाट होता. 'पेरूनि शेता जाईजे' तसा आम्हांला 'पूजोनि देव' पहायला मिळाला. मीं हात जोडून ध्यान धरलें.

**"एकदन्तं चतुर्हस्तं पाशमङ्कुशधारिणम्**
**रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम्**
**रक्तं लम्बोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ..."**

आकाराला येऊनंही निराकारपणा न सोडणारी ती गणरायाची तुंदिल तनु किती सुंदर आहे! धांवत्या दृष्टिक्षेपांत तिचें सौंदर्य प्रतीत होणार नाहीं. त्यासाठीं थोडा वेळ नजर स्थिर केली पाहिजे. सिंदूराचा लेप



देऊन देऊन तिला एवढी सर्वांगीं पुष्टि लाभली आहे. पण खरी मूळ मूर्ति कांहीं ही नव्हे. ती मृत्तिका, लोह आणि रत्न यांच्या अणूंची असून दृश्य मूर्तीच्या मागें अदृश्य आहे. द्वापराच्या अंतीं तीर्थयात्रा-प्रसंगानें पांडव इथें आले असतां पुढें कलीचा प्रादुर्भाव जाणून त्यांनीं त्या मूळ मूर्तीच्या पुढें तांब्याचा भक्कम पत्रा बसवला आणि लोकांच्या दर्शन–अर्चनासाठीं त्याबाहेर एक नवी मूर्ति स्थापली, अशी आख्यायिका तिथें सांगतात. तिच्यातले पांडव कल्पित असतील; पण बाकीची आख्यायिका सत्य मानायला हरकत नाहीं. परधर्म आणि


परक्यांच्या देवमूर्ति यांविषयीं क्रूर असहिष्णुता बाळगणाऱ्या विध्वंसक 'कालयवनां'च्या घणाघातापासून मूर्तीचें संरक्षण व्हावें म्हणून एखाद्या दूरांदेशी भक्तानें तिचें असें गोपायन केलें असणें शक्य आहे. एवढें कशाला ? या देवळाभोंवतींचा उंच कोट पाहिला म्हणजेही माझ्या वरील विधानाला पुष्टि मिळते.

हा कोट बेदरच्या बादशाहींत जामदारखान्यावर नियुक्त असलेले श्री. मोरेश्वर केशव गोळे या सद्गृहस्थांनीं उभारला. त्याच्या चारही कोनांवर चार लहानसे मिनार वाटतील असे स्तंभ उभे केलेले आहेत. मध्येंच डोकें वर काढणारें शिखर जर दुर्लक्षित केलें तर दुरून पहाणाराला तें देवस्थान एखाद्या मशिदीसारखें वाटेल. यांतही चकवण्याचाच उद्देश असला पाहिजे. विधर्मी राज्यकर्त्यांकडून आपलीं देवस्थानें अक्षत आणि अभग्न राखण्यासाठीं त्या वेळच्या बुद्धिमंतांना काय काय क्लृप्त्या लढवाव्या लागल्या असतील तें एक त्यांच्या देवालाच ठाऊक !

इतक्या लहानशा खेडेगांवाला एवढें मोठें देऊळ शोभत नाहीं. 'नाकापेक्षां मोती जड' म्हणतात तसें तें दिसतें. पेठेच्या तोंडाशीं येतांच दोन बाजूंना दोन दीपमाळा, मधें एक जयस्तंभ, तिथेंच चौघडा आणि त्याच्याच खालीं मूषकराजाचें महाबिल आहे. हें गजाननाचें पुढच्या दोन हातांत 'गुडलड्डू' घेऊन बसलेलें वाहन, दहा पायल्या दाणे सहज आपल्या पोटांत रिचवूं शकेल. मीं मनांत म्हटलें, हा उंदीर दगडाचा आहे म्हणून ठीक. नाहीं तर गांवांतल्या लोकांना बारा महिने तेरा काळ विनायकीचा उपवास घडवला असता यानें ! उंदराच्यापुढें बराच उंच दगडी चौथरा आहे. त्यावर पुढेंच एक भला भक्कम नंदी गणरायापुढें मोहर करून बसला आहे. मी म्हणालों, नंदीचें इथें काय प्रयोजन ? हा आपल्या धन्यावर रुसून त्याच्या पुत्राकडे कसलें तरी गाऱ्हाणें घेऊन आला आहे काय ? त्या वेळीं खुलासा झाला नाहीं. पण पुढें क्षेत्रवर्णनाचें पुस्तक वाचतांना तें प्रकरण मिळालें.

इथून सुमारें पांच कोसांवर भुलेश्वर नांवाचें एक शिवस्थान आहे. तिथल्या ग्रामस्थांनीं आपल्या देवळासमोर बसविण्यासाठीं हा नंदी

दुसऱ्या एका गांवीं घडवायला लावला होता. एका मोठ्या गाड्यावर चढवून गांवकरी त्याला घेऊन चालले होते. मोरगांवावरूनच त्याची वाट होती. पण आश्चर्य वर्तलें तें असें कीं, गणरायाच्या दारावरून जात असतां तो गाडा एकाएकीं मोडला. दुसरा आणला पण त्याचीही तीच गत झाली. लोकांना वाटलें कीं, गाड्यांना वजन पेलत नसेल. म्हणून त्यांनीं नंदी तासून--घासून लहान करायचें ठरवलें. पण त्याच रात्रीं



स्वप्न–दृष्टांत देऊन नंदीनें सांगितलें कीं, 'मला तिकडे नेण्याचा प्रयत्न करूं नका. तो साधणार नाहीं. मला इथेंच गणरायापुढें बसावयाचें आहे.' त्यामुळें लोकांचा निरुपाय झाला आणि ते त्याची इथें स्थापना करून निघून गेले. तो उघड्यावर बसतो हें पाहून, त्याला निवारा करणें क्रमप्राप्त झालें आणि तें काम कोण्या पानसरे नांवाच्या वाण्यानें केलें.

नंदीच्या चौथऱ्यापुढें देऊळ आणि त्याचा प्राकार यांचा दुसरा दगडी चौथरा लागतो. तो त्याहून थोडा उंच आहे. महाद्वारांतून आंत जातांच आणखी दोन दीपमाळा आणि त्यांपुढें देवालय आहे. सभामंडप,

मध्यगृह आणि गाभारा मिळून सगळें देऊळ पाषाणाचें आहे. तटाच्या आंतल्या अंगाला लहान लहान ओवऱ्या आहेत. ओवऱ्यांपुढें प्रदक्षिणेची चिरेबंदी वाट आहे. बेल, शमी, आवळी हे देवाचे आवडते तरुवर प्राकारांतच आहेत. शिखरावर प्रत्येक कोनाड्यांत गाणपत्य पुराणांतले कथाप्रसंग चित्रित केले आहेत.

देवदर्शन करून प्रदक्षिणेला निघालें कीं प्रथम देवाच्या उजव्या हातास मंदिराला चिकटूनच नग्नभैरवाचा कौलारू मंडप लागतो. नग्नभैरव हा असितांग, रुरु, इत्यादि सर्व भैरवांचा मुख्य आहे. वाराणसींत काळभैरवाचें जें काम तेंच इथें नग्नभैरवाचें. तो इथला क्षेत्रपाल आहे. देवळाच्या पृष्ठभागीं आदिशक्तीची पाषाणमूर्ति आहे. तिच्या भक्तिभावाला भुलून गजानन जवळच्याच कल्पवृक्षाखालीं साजिरें गोजिरें शिशुरूप घेऊन प्रकट झाला. वस्तुतः तें झाड तरटीचें आहे ; पण देवीचें वांछित त्याखालीं साकार झालें, म्हणून त्याला कल्पवृक्ष ही पदवी लाभली.

या प्राकारांत लहान-मोठ्या गणेशमूर्तींचें वैपुल्य आहे. रामानें लिंग स्थापलें तो रामेश्वर, सोमानें स्थापलें तो सोमेश्वर, हा जसा शिवभक्तीचा एक प्रकार तसाच इथें शिवपुत्राच्या बाबतींत दिसतो. एखाद्या भक्तानें यावें, अनुष्ठान करावें, साक्षात्कार घ्यावा आणि जातांना आपल्या नांवानें एक गणेशमूर्ति कुठें तरी स्थापून निघून जावें. इथें समर्थ रामदास आणि तुकोबा यांनीं स्थापलेलेही गणपति दाखवितात. पण समर्थ गणेशाबरोबरच मारुति, आणि तुकोबा राही-रखुमाबाईसहित विठ्ठल, हीं आपलीं आवडीचीं उपास्यें इथें उभीं करायला विसरले नाहींत. 'सुखकर्ता दुखहर्ता' ही गणपतीची लोकप्रसिद्ध आरती याच मोरयासमोर समर्थांच्या मुखांतून जन्म पावली असेंही सांगण्यांत येतें.

देवाच्या डाव्या हाताला विघ्नहराची ओवरी आहे. या ओवरीशीं एका परमहंस पुरुषाचें नांव निगडित आहे. सत्पुरुषांचें वास्तव्य नसेल तर केवढेंही मोठें क्षेत्र पोरकें भासतें. मूर्तीला माहात्म्य चढत नाहीं. त सत्पुरुष हे क्षेत्राचे प्राण आहेत. शके १५२० च्या सुमारास सौराष्ट्रां-

तल्या सोरटी सोमनाथाहून एक सिद्धयोगी इथें क्षेत्रवासाकरितां प्राप्त झाले. ते गणेशसंप्रदायाचे महान् आचार्य होते. त्यांना गणेश-योगींद्र म्हणत. त्यांनीं या ओवरींत राहून बारा वर्षे श्रींची आराधना केली. त्यांच्या मनांतून मुद्गल पुराणावर टीका लिहून गाणपत्य धर्माला नवीन उजळा द्यावा असें फार होतें. पण मूळ प्रतच कुठें गवसेना. त्यांनीं ती मिळविण्यासाठीं पुष्कळ परिश्रम केले आणि ते यशस्वी होत नाहींत असें दिसल्यावर मग देवाला सांकडें घातलें. भक्ताचें आर्त न पुरवील तर तो देव कसला! गणेशानें मग एक दिवस एका ब्राह्मणाच्या रूपानें ती पोथी योगींद्रांच्या हातीं आणून दिली. या देवस्थानाच्या ऊर्जितावस्थेंत गणेश-योगींद्रांचा फार मोठा हात आहे. तट आणि सभा-मंडप उभारणारे रा. गोळे हे योगींद्रांचेच शिष्य होते. पेशव्यांच्याही कांहीं पुरुषांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें होतें. योगींद्रांच्या आज्ञेवरून अमृतराव पेशवे यांनीं देवळाचें महाद्वार बांधलें आणि बाजीरावानें चौघडा ठेवला.



या ओवरीच्या भिंतीवर गणेश-योगींद्रांनीं स्वहस्तें काढलेलीं गणेश-लीलांचीं किती तरी चित्रें अजून पहायला मिळतात. एक सिंदूरचर्चित

गणपतिही तिच्यांत आहे. शेवटीं शेवटीं ते दिवसांतला बराच काळ समाधिस्थितींतच रहात. सिद्धेश्वर नांवाचा एक पट्टशिष्य त्यांची सेवा करी. गणेश-योगींद्रांच्यामुळें अनेक विद्वान् आणि सत्पुरुष या ठिकाणीं आले. किती तरी धर्मचर्चा आणि तत्त्वचर्चा रंगल्या. शके १७२७ माघ वद्य दशमीला त्यांनीं समाधि घेतली. त्यांच्यामागून तीन वर्षांनीं त्यांचे शिष्य सिद्धेश्वरहि समाधिस्थ झाले. करेच्या तीरीं गुरूच्या पायांजवळच शिष्याचीही समाधि बांधलेली आहे.

या क्षेत्राशीं आत्मनाम कायमचें निगडित करणारे दुसरे सत्पुरुष म्हणजे चिंचवडचे मोरया गोसावी. चौदाव्या शतकांत यांचा जन्म झाला आणि तोही नवसासायासानें. वामनभट्ट शाळिग्राम यांनीं याच मोरगांवांत तप केलें आणि वयाची पन्नाशी उलटल्यावर ते पुत्रवान् झाले. आठव्या वर्षीं मोरया गोसाव्यांचें उपनयन झालें. थोड्याच कालांत ते घनपाठी वैदिक झाले. गणेशाच्या प्रसादानें जन्मलेला पुरुष गणेशभक्त झाला नसता तरच नवल. थेऊर येथें त्यांनीं गणपतीची उग्र आराधना केली. गणाधीश त्यांजवर तुष्टला. लोक त्यांना गणेशाचे अवतार समजूं लागले. मूळचें आडनांव शाळिग्राम; पण लोक त्यांना देव म्हणूं लागले आणि तेंच पुढें त्यांच्या वंशाचें आडनांव झालें. त्यांनीं दर चतुर्थीला मोरगांवची वारी धरली. करा नदींत स्नान करतांना त्यांना एके दिवशीं अभोगत एक गणेशमूर्ति हातीं लागली. करेच्या तीरीं शमीवृक्षाखालीं त्यांनीं तिची पूजा केली. 'सर्वशाक' आणि पोळी यांचा महानैवेद्य समर्पिला. पुढें श्रींच्या आज्ञेवरून चिंचवडास ती मूर्ति स्थापून नवें संस्थान उभारलें. पुढें ते वर्षांतून दोनदांच म्हणजे माघी आणि भाद्रपदी चतुर्थीसच मोरगांवीं येऊं लागले. प्रतिपदेपासून चतुर्थीपर्यंत इथें राहून उपासना चालवायची, पंचमीच्या दिवशीं पारणा करायची, आचंडाल सर्वांना 'समाराधना' घालायची आणि नंतर परत फिरायचें असा त्यांनीं क्रम ठेवला. चिंचवड संस्थान संपन्न झालें तेव्हां तर 'पोंवळीं'त (करेच्या कांठचा एक भाग) सव्वा खंडीचें अन्न शिजूं लागलें. हीच प्रथा पुढें त्यांच्या वंशजांनींही चालू ठेवली. अद्यापही

भाद्रपदी–माघी यात्रेला चिंचवडहून 'देव' येत असतात. मोरगांवची सर्व व्यवस्था चिंचवड संस्थानांतूनच होत असते.

देवदर्शन झाल्यावर तीर्थदर्शन ओघानेंच आलें. गांवाला लागूनच करा नदी आहे. सिंहगडाच्या पूर्वेस पांच मैलांवर ही उगम पावते आणि पुरंदर-भीमथडी तालुक्यांतून पन्नास–साठ मैलांचा प्रवास करून बारामतीच्या आग्नेय कोपऱ्यांत नीरेला मिळते. आम्ही गेलों तर पात्र बरेंचसें कोरडेंच दिसलें. 'श्रावण–भाद्रपद वर्षा ऋतु' हें तिनें फक्त पंचांगांतच वाचायचें. दुर्दैवानें अशा एका भूभागांतून तिला वाटचाल करावी लागली आहे कीं, ज्यावर जेमतेम दहा–बारा इंचांपेक्षां अधिक पाऊस पडत नाहीं. त्यामुळें तिला तारुण्याची पुष्टि आणि मस्ती क्वचितच लाभते. कलाशेष चंद्र शोभत असला तरी सुकून ओहोळासारखी झालेली नदी मात्र शोभत नाहीं. दोन्ही तीरांना धडका देणारी, तीरस्थ वृक्षांचा आरसा बनणारी, 'आवर्त-बुद्बुद-तरंग' खेळविणारी अगाध सरिताच मनावर पुण्य संस्कार उमटवूं शकते.

आम्ही कांठाकांठानें जरासे हिंडलों. जवळच्याच एका शेतांत मोट चालू होती. तिच्या कोवळ्या कुरकुरीबरोबरच बैलांना आळवणारें कृषकाचें संगीतही सुरू होतें. शहरांतले मोटारींचे पोंगे आणि टांगेवाल्यांचे विचित्र आवाज ऐकून आंबलेल्या कानांना तें जनपदांतलें सनाद संगीत मोह घालीत होतें. एवढ्यांत कुठून तरी 'मोरोपंतांची केकावली' अकल्पितपणें कानीं पडली. आणि मग माझ्या लक्षांत आलें कीं, इथला विनायक मयूरवाहन आहे. इथें मोरांची बरीच वस्ती आहे. बरोबरच्या गृहस्थांनीं सांगितलें कीं, ते त्यांच्या परसदारींसुद्धां येतात आणि शेंगदाण्यांचें आमिष दाखवलें तर पिसारा फुलवून नाचतातही. एकाएकीं त्यांना वाचा फुटायला एक कारण घडलें होतें. सूर्यमंडलावर मेघांनीं आडंबर उठवलें होतें. तो सगळा प्रदेश मेघच्छायेंत आला होता. त्या बिचाऱ्या तिर्यक्‌जीवांना वाटलें असेल कीं, आतां पाऊस पडणार, आपला पिसारा ओला होणार. त्यांना कोणीं तरी सांगणें भाग होतें कीं, सगळीं माणसें जशीं सज्जन नसतात, तसे सगळे मेघही उदार नसतात.

पण सांगून तरी उपयोग काय! त्यांचें हें मूढपण सनातन आहे. प्राचीन काळीं हिमाचलाकडे जाणाऱ्या दिलीपाचा रथध्वनि ऐकूनही यांना मेघगर्जनेचाच भास झाला होता आणि षड्जसंवाद करणाऱ्या केका झोकून आतां जसें माझें, तसें त्या वेळीं दिलीपाचें मन त्यांनीं रिझवलें होतें.

करेहून आल्यावर मी इथल्यां योगींद्रमठाकडे वळलों. गणेश-योगींद्रांच्या शिष्यपरंपरेंतल्या गाणपत्यांनीं हा मठ स्थापला असून संप्रदायाचा पुरस्कार करणारें 'अंकुश' नांवाचें एक मासिकही चालवलें आहे. सांप्रतच्या मठपतींची भेट घेतल्यावर त्यांनीं मला क्षेत्रासंबंधीं पुष्कळ गोष्टी सांगितल्या —

"मोरगांव हें पुरातन क्षेत्र आहे. याला 'भूस्वानंद' अशी दुसरीं संज्ञा आहे. इथला गणराज हा 'स्वानंदेश' आहे. पांच देवांना वर दिला म्हणून तो 'पंचदेववरद' झाला आहे. त्रेतायुगांत मैथिल देशांत सिंधुदैत्य मातला. त्यानें सर्व देवांना 'त्राहि भगवन्' केलें. त्यांच्या बंदींतून सुटण्यासाठीं देवांनीं स्वानंदेश गणरायाची आराधना केली. त्यानें सिंधूला मारून देवांचें संकट निरसलें. देव परत या क्षेत्रीं येण्या-साठीं निघाला असतां सिंधुदैत्याचा सेनापति कमलासुर यानें त्याला वाटेंत गांठलें. दोघांचें तुंबळ युद्ध झालें. गणेशानें त्रिशूळ फेंकून त्याचें मस्तक उडविलें ते इथें येऊन पडलें. गणराज इथें आला आणि त्या मस्तकाचेंच आसन करून त्यावर अधिष्ठित झाला —"

बोलतां बोलतां गृत्समदाचा उल्लेख निघाला. गृत्समद हा वैदिक ऋषि पहिला गाणपत्य असें म्हणायला हरकत नाहीं.

"गणानां त्वा गणपतिं हवामहे
कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत
आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम् ॥"

ह्या गणेशपूजेंतला सर्वश्रुत आवाहनमंत्र त्याचाच आहे. तो म्हणतो—समुदायांचा प्रभु म्हणून तूं गणपति. ज्ञानी जनांत तूं अत्यंत ज्ञानी. कीर्तिवंतांमध्यें तूं वरिष्ठ. तूंच राजाधिराज. तुला आम्ही आदरानें बोलावतों. तूं आपल्या सर्व शक्तींसह ये आणि ह्या आसनावर विराजमान हो.'

पण गृत्समदानें प्रार्थिलेला हा गणपति त्या काळीं गजवदन नव्हता; तर ब्रह्मणस्पति होता. तो विघ्नेश नव्हता; तर विद्येश होता. अजून त्याला हत्तीची सोंड लागायची होती. ती मग पुराणकाळीं लागली.

एके दिवशीं पार्वतीनें आपल्या अंगाच्या उटण्याचा एक द्वाररक्षक बनवून बाहेर उभा केला आणि ती आंत स्नानाला गेली. थोड्या वेळानें शंकर आंत जाऊं लागला, तर हा त्याला सोडीना. धन्यावर चाकराची कुरघोडी म्हणजे काय गोष्ट आहे! शंकरानें क्रोधाच्या पहिल्या झटक्यास त्याचें शिर उडवलें. पण शिव कठोर झाला तरी पार्वतीला त्याच्याविषयीं माया होती. तिनें त्याला जिवंत करण्याबद्दल आग्रह धरला. मग शंकरानें गजासुराचें शिर छेदून आणलें आणि त्याच्या धडावर बसवलें. पार्वतीचा मानसपुत्र अशा प्रकारें गजानन झाला.

शैवांची शिवरात्र, वैष्णवांची एकादशी तशी गाणपत्यांची चतुर्थी. या चतुर्थींत एका रहस्याचें सूचन आहे. चतुर्थी म्हणजे जाग्रत्स्वप्न-सुषुप्तींच्या पलीकडची तुरीया अवस्था. जीवाचें परमसाध्य. त्या दिवशीं चंद्र पहावयाचा नाहीं म्हणजे चंद्राकडे पाठ करायची. चंद्र ही मनाची संतति आहे. 'चंद्रमा मनसो जातः।' ग्रहमालेंत चंद्र सगळ्यांत द्रुत गतीचा तर शरीरांत मनही तसेंच चंचल. हें मन जेव्हां उन्मन होईल, तेव्हांच तुरीयावस्था सिद्ध होते. साधूनें खळाची व्यंकटी मोडावी तसें गणेशोपासनेनें मनाचें मनपण मोडून तत्त्वाशीं गांठ घालायची. गणेश हेंच 'प्रत्यक्ष तत्त्व' आहे. तो अथर्वोपनिषदाचा कर्ता सांगतो, मी खोटें बोलत नाहीं. 'ऋतं वच्मि, सत्यं वच्मि.' गणेशसंप्रदायांतला हा गुरुगम्य ठाव आहे.

लिंगपूजेप्रमाणेंच गणेशपूजाही एका काळीं भूतलाच्या बऱ्याच

मोठ्या भागावर रूढ होती. जावा, बाली, इत्यादि बेटांत, अमेरिकेंतल्या मेक्सिको प्रांतांत, त्याचप्रमाणें आशिया खंडांत इतरत्रही ज्या गणेशमूर्ति वा कोरीव चित्रें संशोधकांनीं उजेडांत आणलीं आहेत त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. लॅटिन संस्कृतींतली 'जानुस' ही देवता आणि आपला गणेश यांच्यांतलें वर्णसाम्य उपेक्षणीय नाहीं. आपण जसा घराच्या वा मंदिराच्या मुख्य द्वारावर गणपति कोरतों तसेंच तेही आपल्या जानुसला कोरीत असत. तिबेटांत गणेशाला नारीरूपांत भजतात. तिबेटाप्रमाणेंच चीन, जपान, इकडे गणेशोपासना गेली ती बौद्धांच्या द्वारें. बुद्ध धर्मांतही तिला स्थान होतेंच. खुद् तथागत बुद्धानें आपल्या शिष्यांना 'गणपतिहृदय' उपदेशिलें होतें अशीही माहिती मिळते. पण पुढच्या काळांत मात्र बुद्धमूर्तीचें वाहन बनवून बौद्धांनीं तिची मानखंडना केली आहे. गणेश हा महादेवाच्या परिवारांतला आहे. महादेव आणि पार्वती यांचीं द्विविध रूपें कल्पिलेलीं आहेत. रुद्र–काली आणि शिव–उमा. गणपतिही तसाच आहे. विघ्नकर्ता तसाच विघ्नहर्ता.

ब्रह्मा आणि शिव यांनीं गणेश निर्माण केला आणि एका उपद्रवी गणांचें आधिपत्य देऊन त्याला जगांत विघ्नांचें पीक पिकवायला सोडून दिलें. मानवगृह्यसूत्रांत याचा दाखला मिळतो. पहिल्या प्रथम देव–दैत्यांच्या समुद्रमंथनप्रसंगीं मंदराचळाची रवी सागराच्या तळाशीं दडपून त्यानें आपलें विघ्नकर्तृत्व जाहीरपणें दाखविलें. स्कंद, विशाख, मेष, शकुनि, पूतना, इत्यादि विनायकगण बालग्रह उत्पन्न करणारा असें पुराणांत वर्णिलें आहे. पण पुढें मानवी मन जसजसें उत्क्रांत होत गेलें, देवताविज्ञानांत जसजशी प्रगति होऊं लागली, तसतसें गणराजाचें विघ्न-कर्तृत्व दृष्टीआड होऊन विघ्नविनाशक, संकल्पसाधक म्हणूनच तो जनांचा भक्तिविषय झाला. प्रत्येक कार्यारंभीं त्याचें पूजन होऊं लागलें. ग्रंथकार आपला ग्रंथ निर्विघ्न परिसमाप्त व्हावा म्हणून त्याचेंच मंगल करूं लागले. दशावतारी नाटकांत प्रथम त्याचेंच सोंग येऊं लागलें. कवनांत पहिलें नमन त्यालाच होऊं लागलें. लग्न-मुंजींत घाणा भरणें ही किती मामुली

गोष्ट! पण सुवासिनी मुसळाला हात लावतांना त्याचींच मंगळें गाऊं लागल्या—

**" घाणा भरियेला विडा ठेवियेला**
**आधीं नमियेला गणेराज "**

गणपतीला सकळ विद्यांचा स्वामी समजतात. हें त्याचें वैदिक स्वरूप आहे. 'ग म भ न' ची शिक्षापद्धति सुरू होण्यापूर्वी आपण विद्यारंभीं धूळपाटीवर 'श्रीगणेशा' गिरवीत होतों त्याचें कारण हेंच. गणपति लेखणीचा फर्डा होता हें आपल्याला महाभारतावरून कळतें. वेदव्यासांनीं आपला 'जय' ग्रंथ लिहिण्यासाठीं त्यालाच पाचारून आणलें. पण त्यानें एक अट घातली कीं, 'मी लिहीन; पण माझी लेखणी थांबतां कामा नये.' व्यासांनीं म्हटलें, 'ठीक आहे, पण श्लोकाचा अर्थ समजल्या-वांचून तूं लेखणी ओढतां कामा नये.' आणि मग व्यास मधें मधें एखादा कूट श्लोक रचूं लागले. गणपतीला त्याच्या अर्थाशीं कांहीं काल झगडत ठेवायचें आणि तेवढ्यांत पुढचे बरेच श्लोक रचून टाकायचे, अशा क्रमानें व्यासांनीं तो ग्रंथ पुरा करून घेतला. या घटनेवरून इतिहासाचा शोध घेणारे प्रज्ञावंत असा तर्क चालवतात कीं, त्रिविष्टपांत म्हणजे तिबेटांत 'लेख' नांवाचे गणेशोपासक लोक लेखनप्रवीण असावे आणि आपली लेखनकला आपण त्यांच्याकडूनच संपादिली असावी.

वेदांत्यांनीं आणि तत्त्वचिंतकांनीं तर गणपतीला वाङ्मयाच्या तळाशीं आणि नादाच्या मुळाशीं नेऊन बसवलें आहे. योगविद्येंत तो जसा 'मूलाधार' चक्रावर अधिष्ठित आहे तसाच वाग्विद्येंत तो ओंकाररूप आहे. ओंकार हें सर्व शब्दांचें मूळ असून तें गणेशाचें एक विशेषनाम आहे. ॐ आडवा असतो तो जर उभा केला तर तिथें गजवदनाची प्रतीति येते. आणि म्हणूनच ज्ञानेश्वर आपल्या मंगलाचरणांत गणेश-वर्णन करीत असतांना म्हणतात —

**" हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुरेख**
**जेथ वर्णवपु निर्दोष । मिरवित असे "**

तांडवनृत्य करीत असतांना शंकराच्या डमरूंतून जीं चौदा प्रत्याहार-

सूत्रें उमटलीं ते गण आणि त्यांचा स्वामी म्हणजे शिवपुत्र गणपति. प्रणवोपासना ही गणेशोपासना आणि गणेशोपासना ही साक्षात् ब्रह्मविद्या मानलेली आहे. गणपति-अथर्वशीर्ष वरवर ऐकलें तरी या गोष्टीची कल्पना येऊं शकेल. गणपतीचीं जीं इतर अनेक नांवें आहेत त्यांचाही तात्त्विकांनीं अध्यात्मपरच अर्थ लावून दाखवला आहे. आमच्या महाराष्ट्रसंतांनाही गणपति पार्थिव स्वरूपांत न दिसतां ब्रह्मस्वरूपांतच प्रतीत झाला आहे. 'वक्रतुंड' या नांवांतलें 'वक्र' ती माया आणि 'तुंड' तें ब्रह्म. वक्रतुंड म्हणजे मायेचा अधिष्ठाता. 'लंबोदर' शब्दाची व्युत्पत्ति नाथमुखानें ऐकण्याजोगी आहे—

**"तुजमाजीं वास चराचरा। म्हणोनि बोलिजे लंबोदरा**
**यालागीं सकळांचा सोयरा। साचोकारा तूं होसी**
**सुखाचें पेललें दोंद। नाभीं आवर्तला आनंद**
**बोधाचा मिरवे नागबंद। दिसे सन्निध साजिरा"**

गणपतीचा वर्ण तांबडा, रक्तवस्त्र, रक्तपुष्प आणि रक्तचंदन यांचीच त्याला आवड, या गोष्टींचीही उपपत्ति लावलेली आहे. ज्या मूलाधार-चक्राचा तो स्वामी तें चक्र आणि तिथलें कमळ हीं दोन्ही लाल आहेत. गणपतीचें ज्योतिःस्वरूप पाहिलें तर अग्नि आणि उदयारूढ सूर्य यांच्या वर्णांत लाल रंगच प्रमुख आहे. गणपति हा सृष्टिकर्ता म्हणजे रजोगुणी आणि रजाचा रंग तांबडाच मानतात. मुद्गलपुराण सांगतें कीं, गणेशानें आपल्यासारखें व्हावें म्हणून रक्तवर्णानें कठोर तप केलें आणि गणेशानें कृपावंत होऊन त्या वर्णाचा स्वीकार केला. सिंदूरासुराचें रक्त गणेशानें आपल्या अंगाला माखलें अशी दुसरी एक कथा आहे. ऐतिहासिकांचा तर्क असा कीं, गणपति आणि तत्सम वन्य देव, हे बलिदान केलेल्या पशूंच्या रुधिरानें रंगले आहेत.

गणपति हा ग्रहमालेंतल्या मंगळाचें प्रतीक असावें असा एक समज आहे. मंगळ जसा लाल रंगाचा, रजोगुणी, सेनापति आणि उत्पाती, तसाच गणपतिही आहे, हें साधर्म्य या समजुतीच्या मुळाशीं आहे. शिवाय अंगारकी (म्ह. मंगळवारीं येणारी) चतुर्थी गणेशविधानांत विशेष

महत्त्वाची असल्यामुळें तोही एक आधार जमेस धरला जातो. पण खगोलांत जर गणपतीचें मूळ शोधायचें तर मंगळाला वगळून सूर्याकडेच जावें लागेल. अथर्वशीर्षांत त्याला 'त्वं विष्णुस्त्वं सूर्यः' असें म्हटलें आहे. विष्णु आणि सूर्य हीं नांवें एकाच तेजोनिधीचीं आहेत. पूर्वक्षितिजावरचें आरक्त सूर्यमंडळ हें गजमुख. मोतिया रंगाचें प्रभामंडळ हा त्याचा झळाळता किरीट (corona) समजावा. या प्रभावलयाचा कांहीं भाग उंच असतो आणि कांहीं निरुंद असतो. त्यामुळें त्या निरुंद भागाला 'कानीं कुंडलें' म्हणायला कांहींच हरकत नाहीं. योगसंसिद्ध पुरुषांच्या सूर्यमंडलभेदी दृष्टीलाच लक्ष्य होणारा हा विषय असला तरी खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळीं सामान्यांच्या साध्या दृष्टीलाही ही किरीट-कुंडलांची शोभा गोचर होऊं शकते. सूर्याभोंवतीं वेढून असलेल्या दुसऱ्या एका क्रकचावरणांतून वर उफाळणारें लक्षावधि मैल लांबीचें तेजःशृंग तीच गणपतीची वांकडी सोंड. उदयाचल हें त्याचें उच्चासन. 'सर्वं जगदिदं त्वत्तो जायते' हें गणाध्यक्षाचें वर्णन सूर्यालाच यथार्थत्वानें लागू पडतें. सूर्य हाच आपल्या विश्वाचा जनक आहे. बुधापासून तों शेवटच्या प्लूटोपर्यंतची ग्रहमाला हा त्याचा गण. सूर्योपासनेंतलीं सप्त सामांचीं एकवीस अक्षरें याच गणरायाच्या एकवीस दूर्वा. विश्वाचें रंग-रूप कुरतडून टाकणारा रात्रीचा अंधार हाच निशाचर उंदीर. त्यावर आरूढ होऊनच तो उगवतो. सूर्याला ब्रह्मांडाचें द्वार मानतात तर गजाननाला दाराच्या चौकटीवर बसवून आपणही तोच आशय सूचित करतों. गणपतीचे चार हात या चार दिशा. सूर्याचे सहस्ररश्मि हीच गणेशाची सहस्रनामावलि. सूर्याच्या ठिकाणीं सांग सायुध गणेशरूप कल्पून त्याची उपासना करावी असें शास्त्रकर्ते सांगतात. आपल्या ऋषि-मुनींची प्रतिभा कशी अंतराळ भेदून जाऊं शकते आणि कसें ब्रह्मांडाचें आपोशन घेऊन उठते, तें या गणपतीच्या मूलशोधनावरून समजून घ्यावें.

हें झालें गणपतीच्या विभूतिमत्त्वाचें दिव्य अंग. त्याचें लौकिक अंगही तितकेंच मनोज्ञ आहे. संस्कृत कवींनीं त्यांतलें माधुर्य स्वतः चाखून

आमच्यासाठींही ठेवून दिलें आहे. गजानन हा शिवाचा पुत्र. उमेचा हृदयनंदन. कार्तिकेय षडाननाचा धाकटा भाऊ. कैलासशिखरावर शिव–पार्वतींच्या संसारांत तो अबोध बालरूपानें लुडबुडतो. शिव हा कर्पूरधवल. गिरिजा चांपेगोरटी. दोघांच्यामध्यें उभा राहून गणराज त्या दोघांच्या वर्णावर आरक्त छटा चढवतो. उरीं प्रेम दाटून बाळाचें चुंबन घेण्यासाठीं दोघांनीं दोन बाजूंनीं तोंडें जवळ आणलीं कीं या खट्याळानें आपलें मुख एकदम मागें घेतलेंच.

एके दिवशीं यानें आपल्या एकदंतानें नागाचें वारूळ पाडलें. त्यासरशीं आंतल्या नागोबाच्या फणामण्याचें किरणजाल उंच उठावलें. या अपक्वबुद्धीच्या बालकाला वाटलें कीं, तो एक रत्नस्तंभ असून आपण त्यावर गंडस्थळें घासावीं. तो तसें करायला गेला आणि मयसभेंतल्या दुर्योधनासारखी त्याची फजिती झाली. आईबापांना मग हसतां पुरेवाट. गजाननाला कमलनालाची आवडी विशेष हें सांगणें नकोच. शिवाच्या मस्तकींची रेषमात्र चंद्रकोर म्हणजे तेंच आहे असें समजून स्वारी एकदां त्याला झोंबायला लागली. पण चंद्रकोर तर हाताला आली नाहींच. शिवाच्या भालनेत्राचे चटके मात्र बसले. तशांत जटाबंधाच्या नागानेंही फुसकारून फणा उभारली. मग काय, एकदम किंकाळीच. आईनें धांवत येऊन जेव्हां हृदयाशीं घट्ट धरलें तेव्हां कुठें यानें डोळे उघडले. मोदक खायचा झाला तरी त्याला एक पुरत नाहीं; एकवीस हवेत. आपल्या आईला अनेक संकटांत उपयोगी पडून तो पुत्रधर्माला जागला आहे. त्यामुळें पार्वतीला त्याचा विलक्षण लळा आहे. गणेशचतुर्थीस तो मनुष्यलोकीं आला कीं पाठोपाठ चार दिवसांनीं ज्येष्ठानक्षत्रावर गौरी धांवून येते आणि लेकाला घेऊन जाते. गंगेच्या सवतीमत्सरानें आईचा जीव पोळतो हें कळून आल्यावर गंगेला कैलासावरून ब्रह्मगिरीवर काढून लावण्यांत या गणेशबाळाचेंच चातुर्य विजयी झालें आहे.

मला थोड्या वेळानें परत निघायचें होतें. माझी अथर्वशीर्षाची ‘ एकविशी ’ही संपत आली होती. गुरवानें प्रक्षाळपूजा केलेली ती दोंदिल विनायकमूर्ति माझ्या हृदयसिंहासनावर आरूढ होऊं लागली

होती. या मूर्तीवरचा थराथरांनीं चढलेला सिंदूरलेप सुमारें शंभर वर्षांनीं निखळून पडतो, ही नवलपरी कालच मला कोणीं तरी सांगितली होती. शके १७१० मध्यें हें लुकण झडल्याबद्दल एक श्लोक प्रसिद्ध आहे. त्यानंतर शके १८०४ सालीं तें पुनश्च पडलें. या लुकणाच्या आंतली मूर्ति कशी दिसत असेल, याबद्दल मनाचे उगीच चाळे सुरू झाले. मन हें अंतःकरण म्हणजे 'आंतलें इंद्रिय' आहे. अर्थात् प्रत्येक वस्तूच्या आंत रिगण्याची त्याची खोड स्वाभाविकच म्हटली पाहिजे. पण माझ्या मनाला हिच्याबरोबरच दुसरीही एक आंतर जिज्ञासा होती. या मंदिराच्या खालीं असलेल्या भुयारांत, एका काळीं या प्रदेशावर राज्य करणाऱ्या मयूरवर्म्यांचा पुत्र, राजा सुगीत समाधि लावून बसला आहे आणि तो कृतयुग लागल्यानंतर पुनश्च क्षात्रधर्म प्रवृत्त करणार आहे, असें जें मीं वाचलें होतें त्यांतलें तथ्य काय? मरु नांवाचा एक राजा योगारूढ स्थितींत कलापग्रामामध्यें बसला असून तो कलियुगाच्या अखेरीस सूर्यवंश पुन्हां चालू करणार आहे असा भागवतांतही एक उल्लेख आहे. वरील दोन्ही गोष्टी या एकाच जातीच्या आहेत. भारतीय युद्धानंतर भारत देशांत जवळजवळ 'निर्वीरमुर्वीतलम्' अशी अवस्था आली होती. सर्व जनता आपल्या भवितव्याबद्दल साशंक झाली होती. तिच्या मुखावर एकच प्रश्नचिन्ह उमटून राहिलें होतें-'आतां आमचा त्राता कोण?' मला वाटतें अशा वेळीं खचलेल्या समाजमनाला त्या वेळच्या भविष्यवेत्त्यांनीं वरील प्रकारें धीराचीं आश्वासनें दिलीं असतील. माणूस आशेवर दिवस काढतो हें काय सांगायला हवें!

ग्रंथ संग्रहालय ठाणे
७६१०
दा. क्र. ४२६९
ग्रंथ शाखा

REFBK-0007510